# लोकराज्य

एप्रिल २०१९/पाने ६८/किंमत ₹१०

लोकसभा निवडणूक २०१९

भारत निर्वाचन आयोग
Election Commission of India

# राष्ट्रीय महोत्सव

## मतदानासाठी महाराष्ट्र सज्ज



# सदिच्छादूतांचे आवाहन

## २०१९ च्या निवडणुकांसाठी सज्ज व्हा,

तुम्ही सुजाण नागरिक आहातच, आता सुजाण मतदारही व्हा!



"मतदान करा आणि लोकशाहीचा उत्सव साजरा करा!"

डॉ. अनिल काकोडकर
पद्मविभूषण आणि महाराष्ट्र भूषण पुरस्कार सन्मानित अणुशास्त्रज्ञ



"क्रिकेटमध्ये जसे प्रत्येक धावेला महत्त्व तसे लोकशाहीमध्ये प्रत्येक मताला महत्त्व!"

स्मृती मानधना
महिला क्रिकेटपटू



"सुख म्हणजे नक्की काय असतं? मतदान करा, स्वत: अनुभवा!"

प्रशांत दामले
अभिनेता



"आपल्या हक्काचा सन्मान करायलाच हवे मतदान!"

निशिगंधा वाड
अभिनेत्री



"लोकशाहीतील सर्वात मोलाचा शब्द 'मतदान' मी जाणले, तुम्ही जाणा आणि मतदान करा!"

मधु मंगेश कर्णिक
पद्मश्री पुरस्कार सन्मानित ज्येष्ठ साहित्यिक



"कोणी मागे राहू नका, प्रत्येकाने मतदान करा!"

गौरी सावंत
तृतीयपंथी कार्यकर्त्या



"जागरूक मतदार तोच ज्याला मतदानाचे महत्त्व पटेल!"

उषा जाधव
राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित अभिनेत्री




"मतदान करा, लोकशाहीला अधिक बळकट बनवा!"

ललिता बाबर
अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय महिला धावपटू

"आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडू या.. आगामी लोकसभा निवडणुकीत मतदान करू या!"

वीरधवल खाडे
अर्जुन पुरस्काराने सन्मानित जलतरणपटू



"मतदार असल्याचा अभिमान बाळगा, लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अवश्य मतदान करा!"

राही सरनोबत
कॉमनवेल्थ गेम्स सुवर्णपदक विजेती, नेमबाज



"जर चुकवाल मतदान तर गमवाल तक्रारीचा अधिकार!"

मृणाल कुलकर्णी
अभिनेत्री



"राष्ट्रहितासाठी आपले मत आहे अनमोल, कारणे देऊन घालवू नका त्याचे मोल!"

निलेश सिंगीत
दिव्यांग कार्यकर्ता



अधिक चौकशीसाठी हेल्पलाईन क्र. १९५० (टोल फ्री) वर संपर्क साधावा अथवा https://ceo.maharashtra.gov.in वर लॉग इन करा.

Follow us on

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे जनहितार्थ प्रकाशित

# अंतरंग




**सारे काही 'मतदारराजा'साठी १६**

मतदारांना सहज आणि सुलभतेने मतदार यादीत नाव नोंदवता यावे, दुरुस्त्या करता याव्यात, मतदान करताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी भारत निवडणूक आयोगामार्फत विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सुविधांचा लाभ अधिकाधिक मतदारांनी घेऊन मतदानाची टक्केवारी वाढेल, यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.



**सदैव दक्ष, तिसरा डोळा २२**

आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे आणि निवडणुका शांततेत आणि मुक्त वातारणात पार पाडण्याचे भारत निवडणूक आयोगाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी आयोगाने सिटीजन व्हिजिलन्स अंतर्गत 'सी–व्हिजिल' हे नवे मोबाइल ॲप नागरिकांसाठी उपलब्ध केले आहे.

**लोकशाहीचा महोत्सव ६**

भारत निवडणूक आयोगाने १० मार्च, २०१९ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ साठी कार्यक्रम जाहीर केला आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण ४८ लोकसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघांसाठी एकूण चार टप्प्यांमध्ये मतदान घेण्यात येईल.

**आदर्श आचारसंहिता २४**

**निवडणूक घोषित होताच आदर्श आचारसंहिता लागू होते. निवडणुका पारदर्शक, निर्भयपणे आणि निर्भीडपणे व्हाव्यात, सर्व उमेदवारांना समान संधी मिळावी, कुणावरही अन्याय होऊ नये, यासाठी आचारसंहिता महत्त्वाची भूमिका बजावत असते.**

**विश्वासपात्र आणि पारदर्शक १२**

देशाच्या निवडणूक प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. आता मतदाराला आपण दिलेले मत योग्य प्रकारे नोंदले गेल्याची खात्री करण्याची सोयही यंदा प्रथमच व्हीव्हीपॅट यंत्राच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे.



**निर्णायक शक्ती ५५**

महिला मतदारांचा निवडणुकीतील वाढता सहभाग लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी त्यांच्या मताचे योगदान अधोरेखित करणारा आहे.




| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| लोकशाहीचा महोत्सव | ६ | समाज माध्यमांवरील 'खलनायक' | २१ | निर्णायक शक्ती | ५५ |
| या आणि नाव नोंदवा | १० | सदैव दक्ष, तिसरा डोळा | २२ | अभिमान आहे मला, मतदार असल्याचा | ५८ |
| विश्वासपात्र आणि पारदर्शक | १२ | आदर्श आचारसंहिता | २४ | निवडणुकीतील परिवर्तन युग | ६० |
| निवडणूक प्रशिक्षण | १५ | २००९–२०१४ :लोकसभा निवडणूक | ३९ | महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक | ६२ |
| सारे काही 'मतदारराजा'साठी | १६ | निवडणुका : बदलते तंत्र | ५२ | एक मत, एक मूल्य | ६४ |
| करडी नजर पेड न्यूजवर | १९ | खर्च करा पण सांभाळून... | ५४ | | |

वर्ष ७० वे | अंक १० | एप्रिल २०१९

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन — मीनल जोगळेकर
- वितरण — मनीषा पिंगळे, मंगेश वरकड, अश्विनी पुजारी
- साहाय्य — स्वप्नाली जाधव, भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ९३७२२३०३२०
(सकाळी १०.३० ते ५.३० कार्यालयीन कामकाजा दिवशी)

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# सेवादलांसाठी मतपत्रिका


लष्करी, केंद्रीय आणि राज्य सशस्त्र पोलीस दलातील जवान (सर्व्हिस व्होटर्स) तसेच प्रशिक्षणासाठी किंवा शासकीय सेवेनिमित्त प्रतिनियुक्तीवर परदेशात असलेले भारतीय अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी भारत निवडणूक आयोगाने यंदाच्या निवडणुकीत ईलेक्ट्रॉनिकली ट्रान्समिटेड पोस्टल बॅलेट सिस्टिम (इटीपीबीएस) उपलब्ध करून दिली आहे. राज्यात आतापर्यंत १ लाख ८ हजारांहून अधिक सर्व्हिस व्होटर्सची नोंद झाली असून त्यांच्यापर्यंत इलेक्ट्रॉनिकरीत्या मतपत्रिका पोहोचवल्या जाणार आहेत.

भारत निवडणूक आयोगाने सी–डॅकच्या साहाय्याने इटीपीबीएस यंत्रणा विकसित केली आहे. २०१६ मध्ये पद्दुचेरी विधानसभेच्या नेल्लीथोप मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत पहिल्यांदा या यंत्रणेचा वापर करण्यात आला. त्या माध्यमातून मतपत्रिका ऑनलाइनरीत्या सर्व्हिस व्होटर्सपर्यंत पोहोचवल्या जातात. लष्करी दले अथवा अन्य सर्व्हिस व्होटर्स असलेल्या सेवांमधील नोडल अधिकारी इटीपीबीएससाठीचे अर्ज जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे (डीईओ) पाठवतात. डीईओंनी जिल्ह्यातील सर्व्हिस व्होटर्सची यादी संबंधित मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे (इआरओ) पाठवल्यानंतर इआरओ या अर्जावर निर्णय घेतात. मतदानाच्या साधारणतः १० दिवसापूर्वी सर्व्हिस व्होटर्सना इटीपीबी यंत्रणेद्वारे ऑनलाइन पद्धतीने मतपत्रिका पाठवल्या जातात. मतपत्रिकांचा पारंपरिक पद्धतीने पोस्टाद्वारे होणारा मतदारांपर्यंतचा एका बाजूचा प्रवास वाचण्यासह निवडणूक प्रशासनावरील बराचसा ताण कमी होतो. या मतपत्रिका डाऊनलोड करून आणि प्रिंट काढून मतपत्रिकेवर आपले मत नोंदवल्यानंतर विहित पद्धतीने पोस्टाने पाठवणे आवश्यक असते. पोस्टल मते पाठवण्यासाठी कोणतेही टपाल तिकीट लावण्याची आवश्यकता नसते.

**पात्र कोण :** ● सेवेनिमित्त आपल्या मतदारसंघाच्या बाहेर असलेले लष्करी, निमलष्करी दलातील जवान ● केंद्रीय सशस्त्र पोलीस बलांमधील जवान. ● निवडणूक कालावधीत राज्याबाहेर कर्तव्यावर असलेले राज्य शासनाच्या सशस्त्र पोलीस बलांमधील जवान ● जवानांबरोबर निवास करत असलेल्या त्यांच्या पत्नी ● परदेशात शासकीय सेवा बजावत असलेले भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी– कर्मचारी.

**वैशिष्ट्ये :** ● ईटीपीबीएस यंत्रणेला द्विस्तरीय सुरक्षितता लाभलेली आहे. ● इलेक्ट्रॉनिकली ट्रान्समिटेड पोस्टल बॅलट डाऊनलोडसाठी ओटीपी आणि पिन नंबर आवश्यक. ● युनिक क्यूआर कोडमुळे पोस्टल मतपत्रिकेची सुरक्षितता राखली जाण्यासह नक्कल होऊ शकत नाही.

या वर्षी प्रसिद्ध झालेल्या अंतिम मतदार यादीनुसार राज्यात १ लाख ४ हजार ४३५ इतक्या सर्व्हिस व्होटर्सची संख्या असून त्यात आतापर्यंत सुमारे ४ हजारांची भर पडली आहे. सर्व्हिस व्होटर्स नोंदणीची प्रक्रिया अद्यापही सुरू आहे. अंतिम मतदार यादीनुसार १ लाख २ हजार ६१७ पुरुष तर १ हजार ८१८ महिला सर्व्हिस व्होटर्स आहेत. सर्वाधिक सर्व्हिस व्होटर्स सातारा लोकसभा मतदारसंघात असून सर्वात कमी मुंबई उत्तर मतदार संघात आहेत.



# लोकशाहीचा महाउत्सव



**अश्वनी कुमार**
अपर मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

भारतीय राज्यघटनेने भारतीयांना मतदानाचा हक्क दिला आहे जो आपल्या लोकशाहीला अधिक सक्षम आणि समर्थ करणारा आहे. या हक्कानुसार १९५२ पासून लोकसभेची निवडणूक घेतली जाते. यंदा १७ व्या लोकसभेसाठी भारत निवडणूक आयोगाने देशस्तरावर आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांनी राज्यस्तरावर व्यापक तयारी केली आहे.

भारतासारख्या अतिशय मोठ्या लोकसंख्या असलेल्या देशात निवडणूक प्रक्रिया यशस्वीरीत्या राबवणे हे एक आव्हान असते. हे आव्हान भारत निवडणूक आयोग अत्यंत यशस्वीरीत्या प्रत्येक निवडणुकीत पार पाडत आले आहे. आपल्या देशातील निवडणूक पारदर्शक आणि विश्वासार्ह होण्यासाठी आयोगाने सातत्याने प्रयत्न केले आहेत. टप्प्याटप्प्यांवर विविध सुधारणा केल्या आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. त्यामुळेच आज सर्व जगात भारतातील निवडणूक ही सर्वोत्कृष्ट, सर्वसमावेशक, सुरक्षित आणि सुव्यवस्थित घडणारी प्रक्रिया समजली जाते. जगातील अनेक देशांना या प्रक्रियेचे कौतुक वाटते आणि त्याचा अभ्यासही केला जातो.

महाराष्ट्रात १७ व्या लोकसभेसाठी ११, १८, २३ आणि २९ एप्रिल अशा ४ टप्प्यांत निवडणुका होणार आहेत. त्यासाठी महाराष्ट्राची निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. यंदाची निवडणूक ही अधिक विश्वासार्ह आणि पारदर्शक व्हावी, यावर आम्ही विशेष लक्ष केंद्रित केले आहे. यंदा प्रथमच आपल्या राज्यात ९६ हजार व्हीव्हीपॅट (व्होटर व्हेरीफायबल पेपर ऑडिट ट्रेल) यंत्रांचा वापर केला जाईल. या यंत्रणेचा प्रभावी उपयोग व्हावा म्हणून ६ लाख कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षणसुद्धा दिले जात आहे. मतदाराने ज्या उमेदवारास मत दिले त्याची माहिती लगेच या यंत्राद्वारे मतदारास मिळणार आहे. त्यामुळे कोणत्याच शंकाकुशंकांना वाव राहणार नाही, तसेच मतदान यंत्राबाबतची वस्तुनिष्ठता आणि पारदर्शकता आणखी वाढण्यास साहाय्य होईल.

यंदा 'सी व्हिजिल' हे ॲप भारत निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिले आहे. या ॲपद्वारे आचारसंहितेचे उल्लंघन करणारी कोणतीही घटना, मतदार चित्रित करून तत्काळ आयोगाकडे पाठवू शकतो. या तक्रारीवर पुढच्या १०० मिनिटांत कार्यवाही करण्यात येईल. या ॲपमुळे निवडणूक प्रक्रियेतील अनुचित प्रकारांवर वचक बसण्यास मोठी मदत होईल. याशिवाय १९५० ही हेल्पलाइन मतदारांच्या साहाय्यासाठी कार्यरत राहील. यंदा दिव्यांग, तृतीयपंथीय यांनीही अधिकाधिक संख्येने मतदान करावे, यासाठी आम्ही स्वीप (सिस्टिमेटिक व्होटर्स एज्युकेशन ॲण्ड इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन) या कार्यक्रमाद्वारे विशेष प्रयत्न करत आहोत. दिव्यांगांना मतदार केंद्रावर येण्यासाठी सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. अधिकाधिक तृतीयपंथीयांची नोंदणी करण्यासाठी विशेष मोहीमसुद्धा राबवत आहोत. आम्ही गेले वर्षभर मतदार नोंदणीसाठी जाणीवपूर्वक विशेष प्रयत्न केले आहेत. त्या प्रयत्नांचे फळ म्हणून यंदा राज्यात ४२ लाख ४५ हजार ९४५ इतकी नवीन मतदार नोंदणी झाली. राज्यात एकूण ८ कोटी ७३ लाख मतदार आहेत. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत राज्यातील महिला मतदारांची संख्या वाढली आहे. २०१४ मध्ये हे प्रमाण एक हजार पुरुष मतदारांमागे ८८९ असे होते, तर २०१९ मध्ये हे प्रमाण एक हजार पुरुष मतदारांमागे ९११ असे आहे. ही महाराष्ट्रासाठी निश्चितच अभिनंदनीय व अभिमानाची बाब ठरते. महाराष्ट्रात ४ कोटी १६ लाख २५ हजार ८१९ महिला मतदार आहेत. ऑनलाइन नोंदणी करण्यातही राज्यातील मतदारांनी उत्साह दाखवून १२ लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी अर्ज केले, त्यापैकी ७ लाखांपेक्षा अधिक नागरिकांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहे. मतदार यादीत नाव असलेला कोणताही नागरिक मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी मतदार ओळखपत्र नसल्यास त्याऐवजी ११ दस्तऐवजांपैकी कोणतेही एक ओळखपत्र मतदाराकडे असल्यास ते ग्राह्य धरले जाईल.

यंदा महाराष्ट्रात ९५,४७३ मतदान केंद्रे स्थापन केली जातील. २०१४ सालापेक्षा ही संख्या सुमारे ६ हजाराने अधिक आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर आम्ही रॅम्प, पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह, वीज पुरवठा, प्रकाश योजना, दिव्यांगांसाठी योग्य रुंदीचा दरवाजा या सोयी उपलब्ध केल्या आहेत. दुर्गम भागातील मतदान केंद्रांवर विशेष काळजी घेतली जाईल. सर्वत्र सुरक्षिततेवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. त्या दृष्टीने यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे.

आता मतदारांनी अधिकाधिक संख्येने मतदान करण्यासाठी घराबाहेर पडणे आवश्यक आहे. मतदानासाठी मिळालेली सुट्टी ही आपणास मतदानाचा हक्क बजावण्यासाठी असून सहलीला जाण्यासाठी नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. स्वत: मतदान करणे, इतरांना त्यासाठी प्रवृत्त करणे हे राष्ट्रीय कर्तव्य समजले पाहिजे. या कर्तव्यात महाराष्ट्रातील नागरिक कोणतीही कसूर करणार नाही, याची खात्री आहे.

लोकराज्यच्या या अंकात आम्ही निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व बाजूंची व्यापक माहिती दिली आहे. लोकसभा निवडणूक २००९ आणि २०१४ ची आकडेवारी अभ्यासक/पत्रकारांना उपयुक्त ठरेल. आदर्श आचारसंहितेचे मुद्दे नागरिक आणि राजकीय पक्ष/नेते, उमेदवार व शासकीय यंत्रणा यांच्यासाठी दिशादर्शक ठरतील.

हा संग्रहणीय अंक आपणास आवडेल अशी खात्री आहे. आपण सर्व मिळून लोकशाहीचा हा महाउत्सव यशस्वी करू या !

**अश्वनी कुमार**
(अतिथी संपादक)

**दिलीप शिंदे,** भा.प्र.से.

निवडणूक यंत्रणेसह आचारसंहितेच्या कालावधीत होणाऱ्या प्रत्येक घडामोडीवर बारीक लक्ष ठेवले जाईल. निवडणूक आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे, कुठेही आचारसंहितेचा भंग होणार नाही, यासह प्रचार यंत्रणा, निवडणूक खर्च, उमेदवारांच्या प्रचार व जाहिरात मोहिमा, निवडणूक काळात होणारा गैरप्रकार यावर भारत निवडणूक आयोगाने विशेष लक्ष देण्याच्या सूचना यंत्रणांना केल्या आहेत. यासाठी आयोगाद्वारे काही नवीन गोष्टी पहिल्यांदाच या निवडणुकीत केल्या जात आहेत.

## आदर्श आचारसंहिता

निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाल्याने राज्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वेच्छाधीन निधीतून अनुदानाचे वाटप, मंत्र्यांचे दौरे व शासकीय वाहनांचा वापर, एकत्रित निधीतून शासकीय जाहिराती प्रसिद्ध करणे, नवीन कामांची किंवा नवीन योजनांची घोषणा करणे, शासकीय सार्वजनिक/खासगी संपत्तीचे विद्रूपीकरण इत्यादी बाबींवर निर्बंध लागू झाले आहेत.

आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत निवडणूक खर्चावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यात येईल. याकरिता राज्यस्तर आणि जिल्हास्तरावर नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. राजकीय पक्षांच्या व

**भारत निवडणूक आयोगाने १० मार्च, २०१९ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ चा कार्यक्रम जाहीर केला. राज्यात एकूण ४८ लोकसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघांसाठी एकूण चार टप्प्यांमध्ये मतदान घेण्यात येईल. ही लोकसभा निवडणूक अधिक पारदर्शक व शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी महाराष्ट्राच्या निवडणूक यंत्रणेने जय्यत तयारी केली आहे.**

# लोकशाहीचा महोत्सव



उमेदवारांच्या जाहिराती प्रमाणीकरणासाठी राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

सर्व राजकीय पक्ष, प्रसिद्धी माध्यमे आणि शासकीय विभाग प्रमुख यांच्यासोबत बैठका घेऊन त्यांना आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत सर्व माहिती देण्यात आली आहे.

आदर्श आचारसंहितेच्या काळात राजकीय पक्षांनी व उमेदवारांनी काय करावे किंवा करू नये याची माहिती मुख्य निर्वाचन अधिकारी, (महाराष्ट्र राज्य) यांचे https://ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. याशिवाय भारत निवडणूक आयोगाच्या https://eci.nic.in या संकेतस्थळावर निवडणुकी संदर्भातील सर्व सूचनांचा तपशील उपलब्ध आहे. उमेदवारांनी दाखल केलेली शपथपत्रे व खर्चाचे तपशील वेळोवेळी मुख्य निर्वाचन अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध होतील.

लोकसभा निवडणुकीसाठी प्रत्येक उमेदवाराला कमाल रुपये ७० लाख इतका खर्च करणे अनुज्ञेय आहे.

## मतदारांची संख्या

२०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या मतदार यादीच्या तुलनेत ३१ जानेवारी २०१९ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या अंतिम मतदार यादीनुसार महाराष्ट्रातील मतदारांची संख्या आहे. मतदार नोंदणीचा कार्यक्रम अद्यापही सुरू आहे. त्यामुळे ज्या पात्र नागरिकांची अद्यापपर्यंत मतदार नोंदणी झालेली नाही, असे सर्व नागरिक त्या त्या टप्प्यांतील उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या अंतिम दिनांकाच्या १० दिवस अगोदरपर्यंत दाखल करू शकतात. मतदार यादी अद्ययावत व अचूक करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाकडून सतत प्रयत्न करण्यात येत आहेत. याअंतर्गत आयोगाकडून काही खास कार्यक्रम राबवण्यात आले आहेत.

## मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या गृहभेटी


जून–जुलै २०१८ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी घरोघरी भेटी देऊन वंचित राहिलेल्या मतदारांकडून अर्ज प्राप्त करून घेतले तसेच भावी मतदारांची माहिती घेतली.


## विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रम

सप्टेंबर– नोव्हेंबर २०१८ या कालावधीत विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमाची माहिती जनतेला व्हावी यासाठी व्यापक प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली. सुट्ट्यांच्या दिवशी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमांतून शहरी भागांमध्ये अधिकाधिक मतदार जोडण्यात आले.

## मतदार जनजागृती कार्यक्रम

या कार्यक्रमांतर्गत मतदार जागृतीसाठी विशेष उपक्रम राबवण्यात




आले. शासकीय विभाग, अशासकीय संस्था व इतर यांच्या सहभागाने जास्तीत जास्त मतदारांपर्यंत संदेश पोहोचवण्यात आला.

## दिव्यांग मतदार

भारत निवडणूक आयोगाने या वर्षी दिव्यांग मतदारांचा सहभाग वाढावा या हेतूने 'सुलभ निवडणुका' हे घोषवाक्य जाहीर केले आहे. याअंतर्गत दिव्यांग कल्याणासाठी कार्यरत दिव्यांग कल्याण आयुक्तालय तसेच इतर अशासकीय संस्था यांच्या सहकार्याने जास्तीत जास्त दिव्यांग मतदारांची नोंदणी करून घेण्यात आली आहे.

**भारत निवडणूक आयोगाच्या या सर्व प्रयत्नांमुळे मतदार यादीमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे. मतदार यादी संदर्भातील ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत :–**


● २०१४ सालच्या तुलनेत मतदारांच्या एकूण संख्येमध्ये ६५,३१,६६१ इतकी वाढ झाली. ● २०११ च्या जनगणनेनुसार १००० पुरुषांमागे ९२५ महिला असे प्रमाण आहे. त्या तुलनेत २०१४ साली मतदार यादीतील महिलांचे प्रमाण ८८९ इतके होते. ● २०१९ मध्ये या प्रमाणात ९११ अशी लक्षणीय सुधारणा झाली. ● प्रथम मतदार १८–२२ वर्षे २५,१३,६५७ पुरुष, १७,३२,१४६ महिला, १४२ तृतीयपंथी अशा एकूण ४२,४५,९४५ नवीन मतदारांची नोंदणी झाली. ● सेनादलातील १,०४,४३५ इतक्या मतदारांची नोंदणी करण्यात आली. ● २०१४ साली मतदारांना वाटप करण्यात आलेल्या छायाचित्र मतदार ओळखपत्राचे प्रमाण ९०.४३% तर २०१९ मध्ये हे प्रमाण ९६.६८% इतके झाले. ● या वर्षी मतदार यादीमध्ये एकूण २,२४,१६२ इतके दिव्यांग मतदार समाविष्ट आहेत.


**१९५० क्रमांकाची हेल्पलाइन : राज्यस्तर तसेच जिल्हास्तरावर संपर्क केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. मतदारांना सर्व प्रकारची माहिती देण्यासाठी आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी १९५० या टोल फ्री हेल्पलाइन क्रमांकाची सुविधा सर्व जिल्ह्यांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यस्तरावर ही सुविधा २४ तास उपलब्ध असेल.**

## मतदान केंद्र

आयोगाच्या सूचनेनुसार प्रत्येक मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा, प्रकाश योजना, अपंगांसाठी रॅम्पची व्यवस्था, व्हील चेअर वरील अपंगांसाठी योग्य रुंदीचा दरवाजा व फर्निचर इ. किमान सुविधा पुरवण्यात येणार आहेत.

**मतदानाची टक्केवारी : २००९ व २०१४ साली झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये झालेल्या मतांची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे :-**




## निवडणुकीसाठी कर्मचारी

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी सुमारे ६ लाख इतका कर्मचारीवृंद नेमण्यात येईल. तसेच पुरेसे पोलीस तैनात करण्यात आले आहेत.

## ईव्हीएम-व्हीव्हीपॅट

राज्यातील सर्व लोकसभा मतदारसंघांच्या निवडणुकीमध्ये ईव्हीएम-व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात येईल. त्यासाठी राज्यात एकूण २.१५ लाख बॅलेट युनिट (बीय भू), एकूण १.२४ लाख कंट्रोल युनिट (सीयू) आणि एकूण १.३५ लाख व्हीव्हीपॅट यंत्रांचा वापर करण्यात येईल. या सर्व यंत्रणेची प्राथमिक तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. या मशिन्सचा वापर महाराष्ट्रात प्रथमच होणार असल्यामुळे त्या संदर्भात मतदारांमध्ये जागृती आणि विश्वासार्हता निर्माण व्हावी, या हेतूने मोठ्या प्रमाणात जनजागृती कार्यक्रम राबवण्यात येत आहेत.

सर्व मतदान केंद्रांच्या ठिकाणी मोबाइल व्हॅनच्या माध्यमातून प्रत्यक्ष मशिनवर जनतेला मतदानाची माहिती देण्यात येत आहे. हा उपक्रम सर्व न्यायालयांमध्ये, शासकीय कार्यालयांमध्ये, प्रमुख रेल्वे स्थानक, बाजार, चौक, इ. ठिकाणी राबवण्यात आला आहे. आतापर्यंत ५४.३० लाख जनतेने यात भाग घेतला असून त्यापैकी ३८.७० लाख जनतेने प्रत्यक्ष मतदानाची तालीम घेतली आहे. या जनजागृतीचा कार्यक्रम यशस्वी ठरला असून जनतेने यात सक्रिय सहभाग घेतला आहे.

## आयटी ॲप्लिकेशन्स

यंदाच्या निवडणुकीमध्ये विविध विषयांची प्रभावी अंमलबजावणी करता यावी व त्यावर नियंत्रण ठेवता यावे यासाठी आयोगाने काही ॲप्स विकसित केले आहेत.

**सी-व्हिजिल ॲप :** आदर्श आचारसंहितेच्या परिणामकारक अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी हे मोबाइल ॲप विकसित केले आहे. यामध्ये नागरिकाला एखाद्या ठिकाणी आचारसंहितेचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्या प्रसंगाचे या ॲपमध्ये छायाचित्र अथवा व्हिडिओ काढून तक्रार नोंदविता येईल.

**पीडब्ल्यूडी ॲप :** दिव्यांगांना मतदार नोंदणी करणे, मतदान केंद्राचा शोध घेणे, व्हील चेअरची मागणी नोंदविणे इ. सोयी उपलब्ध करून घेण्यासाठी हे ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## मतदानाची सज्जता

प्रत्यक्ष निवडणुकीच्या दृष्टीने लागणारी साधनसामग्री आणि मतदान केंद्रावर पुरवावयाच्या सोयीसुविधांकरिता योग्य ती कार्यवाही पूर्ण झाली आहे.

सुमारे सहा लाख कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने ही प्रक्रिया पार पाडली जात आहे. **नऊ मतदारसंघ राखीव :** नंदूरबार, गडचिरोली-चिमूर, दिंडोरी, पालघर हे चार मतदारसंघ अनुसूचित जमातींसाठी राखीव असून अमरावती, रामटेक, शिर्डी, लातूर आणि सोलापूर हे पाच मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी राखीव आहेत.

## मंत्रालयात नियंत्रण कक्ष

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मंत्रालयाच्या विस्तार इमारतीतील ५व्या मजल्यावर, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे. हा कक्ष २७ मे २०१९ पर्यंत २४ तास सुरू राहील.

नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्र.०२२-२२०४०४५१ / २२०४०४५४.

**नागपूर, शिरूर, पुणे, बारामतीत अधिक मतदार :** मावळ मतदारसंघात सुमारे २२ लाखांहून अधिक, शिरूर २१ लाखांहून अधिक, नागपूर २१ लाखांहून अधिक, पुणे आणि बारामती मध्ये प्रत्येकी २० लाखांहून अधिक मतदार आहेत.

मुंबईतील मुंबई-उत्तर मतदारसंघात १६ लाखांहून अधिक मतदार असून मुंबई-उत्तर दक्षिण मतदारसंघात १६ लाख ९८ हजार मतदार आहेत. तर मुंबई-उत्तर पूर्व मतदारसंघात १५ लाख ५८ हजार मतदार आहेत. मुंबई उत्तर-मध्य मतदारसंघात १६ लाख ४८ हजार आणि मुंबई दक्षिण-मध्य मतदारसंघात १४ लाख १५ हजार एवढे मतदार आहेत.

**मतदारसंघनिहाय मतदारांची संख्या (सुमारे) :** नंदूरबार-१८ लाख ५० हजार, धुळे-१८ लाख ७४ हजार, जळगाव-१९ लाख १० हजार, रावेर-१७ लाख ६० हजार, बुलडाणा-१७ लाख ४६ हजार, अकोला-१८ लाख ५४ हजार, अमरावती-१८ लाख १२ हजार, वर्धा-१७ लाख २३ हजार, रामटेक-१८ लाख ९७ हजार, भंडारा-गोंदिया-१७ लाख ९१ हजार, गडचिरोली-चिमूर-१५ लाख ६८ हजार, चंद्रपूर-१८ लाख ९० हजार, यवतमाळ-वाशिम-१८ लाख ९० हजार, हिंगोली-१७ लाख १६ हजार, नांदेड-१७ लाख, परभणी-१९ लाख ७० हजार, जालना-१८ लाख ४३ हजार, औरंगाबाद-१८ लाख ५७ हजार, दिंडोरी-१७ लाख, नाशिक-१८ लाख ५१ हजार, पालघर-१८ लाख १३ हजार, भिवंडी-१८ लाख ५८ हजार, कल्याण-१९ लाख २७ हजार, रायगड-१६ लाख ३७ हजार, अहमदनगर-१८ लाख ३१ हजार, शिर्डी-१५ लाख ६१ हजार, बीड-२० लाख २८ हजार, उस्मानाबाद-१८ लाख ७१ हजार, लातूर-१८ लाख ६० हजार, सोलापूर-१८ लाख २० हजार, माढा-१८ लाख ८६ हजार, सांगली-१७ लाख ९२ हजार, सातारा-१८ लाख २३ हजार, रत्नागिरी-सिंधुदुर्ग-१४ लाख ४० हजार, कोल्हापूर-१८ लाख ६८ हजार आणि हातकणंगले-१७ लाख ६५ हजार.

## देशात ८९ कोटी ८७ लाख मतदार

देशातील २९ राज्य आणि ७ केंद्रशासित प्रदेशांमध्ये आजमितीस एकूण ८९ कोटी ८७ लाख ६८ हजार ९७८ मतदार आहेत. यामध्ये ४६ कोटी ७० लाख ४ हजार ८६१ पुरुष मतदार आहेत तर ४३ कोटी १६ लाख ८९ हजार ७२५ महिला मतदार आहेत. देशभरात ३१ हजार २९२ तृतीय पंथी मतदार आहेत.

## सव्वा सात लाख मतदारांची ऑनलाइन नोंदणी

गेल्या वर्षी प्रसिद्ध झालेल्या अंतिम मतदार यादीनंतर आतापर्यंत राज्यात तब्बल १२ लाखांपेक्षा जास्त नागरिकांनी मतदार नोंदणीसाठी ऑनलाइन अर्ज केले असून त्यापैकी ७ लाखांपेक्षा जास्त नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत.

## मतदार यादीची निर्मिती

ऑनलाइनसोबतच ऑफलाइनदेखील नोंदणी साहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या कार्यालयात जाऊन केली जाते. अशा प्रकारे मतदार नोंदणी अर्ज करणाऱ्यांची संख्या ५५ लाख ७५ हजार आहे. त्यापैकी ४३ लाख ५१ हजार १३० अर्ज मान्य करण्यात आले. ३ लाख ४५ हजार ९०० अर्ज विविध बाबींची पूर्तता न केल्यामुळे नाकारण्यात आले आहेत. उर्वरित अर्जांवर निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. मतदार यादीत नाव समाविष्ट होण्यासाठी अर्ज भरल्यानंतर संबंधित सहायक मतदार नोंदणी अधिकारी अर्जदाराच्या पत्त्यानुसार त्यास मतदान केंद्र यादी भाग क्रमांक दिला जातो. त्यानंतर सॉफ्टवेअरमध्ये अर्जदाराच्या तपासणी करायच्या कागदपत्रांची यादी (चेकलिस्ट) तयार होते. ती संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडे दिली जाते. त्यांच्याकडून अर्जदाराच्या पत्त्यावर जाऊन पडताळणी केल्यानंतर सहायक मतदार नोंदणी अधिकारी व शेवटी मतदार नोंदणी अधिकारी यांनी अंतिम मान्यता दिल्यानंतर अर्जदाराचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यात येते.

**अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य**

## सर्वात जास्त
## सर्वात कमी

लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात सुमारे पावणे नऊ कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यात चार कोटी ५७ लाखांहून अधिक पुरुष मतदार असून चार कोटी १६ लाखांहून अधिक महिला मतदार आहेत.




मतदारांची संख्या लक्षात घेता सर्वात मोठा मतदार संघ ठाणे जिल्हा ठरणार आहे.

ठाणे मतदार संघात राज्यात सर्वाधिक सुमारे २३ लाखांहून अधिक मतदारांची संख्या असून १२ लाख ६० हजारांहून अधिक पुरुष मतदारांची संख्या आहे.




रत्नागिरी- सिंधुदुर्ग मतदारसंघात पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या अधिक असून १४ लाख ४० हजार मतदारांमध्ये सात लाख ३५ हजार ५९७ महिला मतदारांची संख्या आहे.




ठाणे येथे मतदान यंत्राबाबत जनजागृती करणाऱ्या चित्ररथाची पाहणी करताना अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी अश्वनी कुमार.

**मतदारांचे शिक्षण, प्रबोधन आणि त्यांचा निवडणूक प्रक्रियेतील सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी स्वीप म्हणजेच सिस्टिमेटिक व्होटर्स एज्युकेशन अँण्ड इलेक्टोरल पार्टिसिपेशन हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. ज्या मतदारांची नोंदणी झाली असूनसुद्धा जे मतदार मतदान प्रक्रियेपासून दूर राहतात किंवा ठेवले जातात त्या सर्वांना या प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्यासाठी या मोहिमेंतर्गत प्रयत्न करण्यात येत आहेत.**

# या आणि नाव नोंदवा

**शिरीष मोहोड**

मतदार जागृती मोहीम देशात पहिल्यांदा छत्तीसगढ मध्ये २००९ साली राबवण्यात आली. त्यानंतर मोहिमेचा पहिला टप्पा २००९ ते २013, दुसरा टप्पा २013 ते २०१६ यादरम्यान राबविण्यात आला. गेल्या लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत राज्यात ही मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेची २०१६ ते २०२० या तिसऱ्या टप्प्याची सुरूवात झाली आहे. या टप्प्यामध्ये शंभर टक्के मतदारांची नोंदणी करणे, मतदारांचा सहभाग वाढवणे तसेच त्यांचे प्रबोधन करणे ही प्रमुख उद्दिष्टे आहेत. शंभर टक्के मतदारांना मतदार ओळखपत्र (इपीआयसी) देणे, १८ वर्षांवरील सर्व युवकांना मतदार म्हणून नोंदवणे आणि त्यांचा प्रक्रियेतील सहभाग वाढवणे तसेच समाजातील वंचित घटकांना मतदार नोंदणीसह मतदानासाठी प्रोत्साहित करणे यासाठी या मोहिमेत भर देण्यात आला आहे.

'स्वीप' हा कार्यक्रम संपूर्ण राज्यभर राबवण्यात येत आहे. यासाठी प्रत्येक जिल्हा पातळीवर उपजिल्हा निवडणूक अधिकारी हे नोडल ऑफिसर म्हणून काम पाहतात.

मतदान प्रक्रियेत मुख्यत्वे दोन महत्त्वाचे घटक आहेत. मतदान केंद्राची सुसज्ज व्यवस्था, सुलभ मतदान करण्याची व्यवस्था तयार करणे, मतदारांना जागृत करून मोठ्या प्रमाणात मतदान केंद्रावर मतदान करण्यास आवाहन करणे आणि त्यासाठी नावीन्यपूर्ण जाणीव जागृती कार्यक्रमाचे आयोजन करणे.

आजपर्यंत या कार्यक्रमात स्वयंसेवी संस्थांद्वारे मुख्यत्वे पथनाट्य, चित्रकला स्पर्धा, शपथ समारोह, प्रभात फेरी इत्यादी पारंपरिक पद्धतीचा वापर केला जात होता. परंतु यंदाच्या लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी आणि मतदार जागृतीची शासन यंत्रणा उभी करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने काही नवीन संकल्पना सांगितल्या आहेत.

**चुनाव पाठशाळा :** गाव, वाड्या, वस्त्यांवर मतदार जनजागृती करण्यासाठी चुनाव पाठशाळा ही नवीन संकल्पना राबवण्यात येत आहे. या ठिकाणी मतदान केंद्र अधिकारी म्हणजे बीएलओ या पाठशाळेची स्थापना करतात. या पाठशाळेत सदस्यांना सक्रिय करून विविध उपक्रमांद्वारे ग्रामीण जनतेचे प्रबोधन करण्यात येते.

**महाविद्यालय स्तरावर मतदार जागृती मंडळाची स्थापना, प्रशिक्षण कामे व जबाबदारी:** महाविद्यालयातील तरुण मतदार म्हणजेच १८ ते २१ वयोगटातील तरुणांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग वाढवण्यासाठी आणि प्रोत्साहित करण्यासाठी महाविद्यालयस्तरावर या मंचाची स्थापना करण्यात येते. प्रत्येक महाविद्यालयस्तरावर ब्रँड ॲम्बेसेडर व नोडल ऑफिसर नेमण्यात येते. हे सर्व भारत निवडणूक आयोगाप्रमाणे महाविद्यालयांमध्ये मतदार जागृती करण्यासाठी सहकार्य करतात.

**माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर भविष्यातील मतदारांसाठी मतदान-मतदार जागृती मंडळाची स्थापना व प्रशिक्षण :** माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर म्हणजेच




कोल्हापूर येथे रांगोळीतून करण्यात आलेली मतदानाबाबत जनजागृती.

१४ ते १७ वयोगटातील इयत्ता नववी ते बारावीचे विद्यार्थी हे भविष्यातील मतदार आहेत. या मतदारांचे प्रबोधन, जाणीवजागृती या कार्यक्रमांतर्गत केली जाते.

## मतदार जागृती मंचाची स्थापना

सर्व राज्य शासकीय आणि केंद्र शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, सहकारी आणि राष्ट्रीयीकृत बँका, कारखाने, सर्व खासगी व्यवस्थापनाची आणि स्वयंसेवी संस्थांची कार्यालये या ठिकाणी मतदार जागृती मंचाची स्थापना करून जाणीवजागृती उपक्रम, चर्चासत्र, स्पर्धा, दृकश्राव्य साधनांद्वारे जागृती आणि सर्व कर्मचाऱ्यांची मतदान नोंदणी करणे हे या समितीचे मुख्य कार्य आहे.

## दिव्यांग मतदार जागृती कार्यक्रमाचे आयोजन




मतदान जागृतीसाठी प्रभातफेरी. (जि. सांगली)

या लोकसभा निवडणुकांचे ब्रीदवाक्य 'सुलभ निवडणुका' हे आहे. यात कोणत्याही प्रकारचा मतदार निवडणूक प्रक्रियेपासून दूर राहता कामा नये. दिव्यांग व्यक्ती, वयोवृद्ध नागरिक, शारीरिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती यांना प्रवृत्त करून त्यांच्यासाठी मतदार नोंदणी करण्यास मदत करणे. त्यांना मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करणे इत्यादी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या दिव्यांग जनजागृती कार्यक्रमांमध्ये निश्चित करण्यात आल्या आहेत.

**महाविद्यालयातील कॅम्पस ॲम्बेसेडरचा मतदार जनजागृतीमध्ये सहभाग-** महाविद्यालय स्तरावर सहभाग वाढवण्यासाठी आणि त्याचबरोबर तरुणांना प्रोत्साहित करून; स्थानिक समुदायांमध्ये जसे ग्रामस्थ, वस्ती- वाड्यांवर जनजागृतीच्या मोहिमांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे.

मतदार जाणीवजागृती व शिक्षण यामध्ये स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी विविध उपक्रम राबवू शकतात. यामध्ये सर्व गृहनिर्माण संस्था, सहकारी संस्था, पतसंस्था सहकारी संस्था इत्यादी ठिकाणी जाऊन मतदारांसाठी शपथ समारंभाचे आयोजन, पथनाट्य, चर्चासत्र, दृकश्राव्य साधनांद्वारे भारत निवडणूक आयोगाने तयार केलेल्या चित्रफिती, क्लिप्स, व्हिडीओ क्लिप्स, संदेश, चित्रसंदेश मतदारापर्यंत पोहोचविणे, स्पर्धांचे आयोजन करणे, विशेषत: महिला मतदार आणि युवक - युवती मतदारांचे मेळावे, चर्चासत्र आयोजित करणे, सोशल मीडियाचा उपयोग करून आदर्श आचारसंहितेचे पालन करत मतदारापर्यंत मतदान जागृती संदेश पोहोचवणे. खासगी संस्था, कंपन्या यांच्या मदतीने त्यांच्या कर्मचाऱ्यांमध्ये जागृती करणे.

मतदार जागृतीमध्ये आपल्या मतदान केंद्रावरील बीएलओ त्यांच्याशी सतत संपर्कात राहून त्यांना मतदार जागृती कार्यक्रम व मतदान नोंदणी अभियानात सक्रिय मदत करणे. मतदारांना वेगवेगळ्या माध्यमांतून मतदार नोंदणीची, मतदान करण्यासाठीची जागृती करणारे पोस्टर, बॅनर, होर्डिंग याशिवाय सोशल मीडिया म्हणजेच समाजमाध्यमे, रेडिओ, कम्युनिटी रेडिओ इत्यादी माध्यमांचा उपयोग करणे. प्रत्येक मतदारांना मतदार ओळखपत्र बीएलओद्वारा घेण्यासाठी मदत करणे आणि साहाय्य करणे. मतदार सहायक केंद्राद्वारे मतदारांना आपले नाव तपासून पाहण्याची सोय उपलब्ध करून देणे, राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या पोर्टलवरून मतदारांचे नाव यादीत आहे की, नाही याविषयी त्यांना माहिती करून देणे तसेच मतदारांना नैतिक मतदानाची माहिती व जागृती करून देणे, भारतीय लोकशाहीत नागरिकांचे कर्तव्य आणि मतदानाचे पावित्र्य राखण्यासाठी विविध माध्यमांद्वारे नैतिक मतदानाचे महत्त्व पटवून देणे, मतदान केंद्राची माहिती सामान्य जनतेला पोहोचणे, मतदान केंद्रासंबंधी साहाय्य करणे; आदी बाबींवर विशेष भर या वेगवेगळ्या माध्यमातून देण्यात येत आहे.

कुठलाही मतदार मतदानापासून वंचित राहू नये म्हणून समाजातील सर्व घटकांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढवण्यासाठी त्यांना आवश्यक ते सहकार्य करणे तसेच त्यांच्यात जनजागृती करण्याचे कामही स्वीपमार्फत केले जाते, यासाठी शासनाच्या विविध विभागांचा सहभाग घेतला जातो. याशिवाय मतदार जागृतीसाठी विविध माध्यमांद्वारे प्रचार-प्रसिद्धी केली जात आहे.

**अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी**



व्हीव्हीपॅट यंत्राची पाहणी करताना अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी अश्वनी कुमार.

**देशाच्या निवडणूक प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. मतदाराला त्याने दिलेले मत योग्य प्रकारे नोंदले गेल्याची खात्री करण्याची सोयही यंदा प्रथमच व्हीव्हीपॅट यंत्राच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदान यंत्राला दिलेली व्हीव्हीपॅटची जोड म्हणजे मतदान प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याच्या दृष्टीने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.**

# विश्वासपात्र आणि पारदर्शक

**जगदीश कुलकर्णी**

सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेत मतदान यंत्राचा सहभाग खूप महत्त्वाचा आहे. पूर्वी मतपत्रिकेद्वारे मतदान घेतले जायचे. पण यासाठी लागणारा कागद, मतदानाचा शिक्का उठवताना छोटीशी जरी चूक झाली तरी बाद होणाऱ्या मतांची संख्या, मतमोजणीसाठी लागणारा वेळ या सगळ्या गोष्टींचा विचार करून भारत निवडणूक आयोगाने मतदान यंत्र अर्थात ईव्हीएमद्वारे (इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिन) निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला.


## ईव्हीएमची रचना

ईव्हीएम म्हणजेच मतदान यंत्राचे प्रामुख्याने कंट्रोल युनिट (सीयू) व बॅलट युनिट (बीयू) असे दोन भाग पडतात. कंट्रोल युनिटचे नियंत्रण अर्थात त्या-त्या मतदान केंद्राध्यक्षाकडे असते. एकदा मतदाराने ईव्हीएमद्वारे मतदान केल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षाने कळ दाबल्याखेरीज दुसऱ्या मतदाराला मतदान करता येत नाही. एका ईव्हीएममध्ये २००० मतदानाची नोंद करता येऊ शकते तथापि, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार एका मतदान केंद्रावर १४०० पेक्षा जास्त मतदार असल्यास तात्पुरत्या स्वरूपात दुसरे मतदान केंद्र निर्माण करण्याची तरतूद आहे. त्यामुळे कोणत्याही एका मतदान केंद्रावर ईव्हीएमची क्षमता अपुरी पडण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. एका बॅलेट युनिटवर एकूण १६ उमेदवारांकरिता (नोटासह) मतदान करता येऊ शकेल, अशी व्यवस्था केली असते.

पूर्वी एम-२ ईव्हीएमच्या काळापर्यंत (२००६-२०१०) एका कंट्रोल युनिटला एकूण ४ बॅलेट युनिट जोडण्याची व्यवस्था होती. त्यामुळे ६३ +१ (नोटा) इतक्या उमेदवारांकरिता ही ईव्हीएम यंत्रे वापरता येत असत. परंतु आता २०१३ नंतर एम-३ ईव्हीएम यंत्रांचे युग सुरू झाले असून एका कंट्रोल युनिटला २४ बॅलट युनिट जोडण्याची व्यवस्था आहे. त्यामुळे नोटासह एकूण ३८४ इतक्या उमेदवारांकरिता मतदान घेता येऊ शकते. ईव्हीएम मशीन हे एकल पद्धतीने (स्टॅण्ड अलोन) व वायरच्या साहाय्याने जोडलेले असल्यामुळे इंटरनेट, वाय फाय, ब्लूटूथ, हॉटस्पॉट अशा बाह्य उपकरणांद्वारे कोणत्याही ईव्हीएमशी संपर्क स्थापित करता येत नाही. अशा प्रकारे कोणताही प्रयत्न झाल्यास मतदान यंत्र एरर मोडवर जाते. त्यामुळे निवडणुकीदरम्यान ते वापरता येत नाही.

## मतदान यंत्रांची देखभाल व वाहतूक

भारत निवडणूक आयोगाच्या मागणीनुसार भारत ईलेक्ट्रिकल्स लि. (बीईएल) व (ईलेक्ट्रॉनिक्स कार्पोरेशन ऑफ इंडिया लि. (ईसीआयएल) या भारत सरकारचा उपक्रम असलेल्या कंपन्यांकडून ईव्हीएम / व्हीव्हीपॅट संचांची निर्मिती केली जाते. या निर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर अत्युच्च सुरक्षेची काळजी घेतली जाते. कोणत्याही मतदार संघामध्ये निवडणूक अथवा पोटनिवडणूक घ्यावयाची झाल्यास त्या मतदारसंघामध्ये आवश्यक असलेल्या मतदान केंद्रांची प्रथम निश्चिती केली जाते. या लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात एकूण १,०३,०४० मतदान केंद्रे स्थापन करण्यात येत आहेत.



**देशात केरळ राज्यामध्ये ७०-पारुर विधानसभा मतदारसंघामध्ये १९८२ साली सर्वप्रथम ईव्हीएमद्वारे मतदान घेण्यात आले. नंतर टप्प्याटप्प्याने सर्व देशभरात ईव्हीएमद्वारे मतदान करण्याची प्रणाली लागू करण्यात आली. महाराष्ट्रात १९९९ मध्ये एकत्रित घेण्यात आलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांकरिता मुंबईमध्ये प्रथम ईव्हीएम यंत्रांचा वापर करण्यात आला.**

कोणत्याही जिल्ह्यामध्ये उपलब्ध असलेली मतदान यंत्रे प्रथमत: वापरण्यात येतात. जर अधिक मतदान यंत्रांची आवश्यकता असेल तर मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे अधिकच्या ईव्हीएमची मागणी करून वाहतूक व सुरक्षेच्या दृष्टीने नजीकच्या जिल्ह्यामध्ये जादा ईव्हीएम असतील तर तेथून मागवण्यात येतात. राज्यात आवश्यक ईव्हीएम नसतील तर नजीकच्या राज्यामधून ईव्हीएम मागवण्यात येतात.

निवडणुका चालू नसताना ईव्हीएम सुरक्षित ठेवणे हे मोठे जोखमीचे काम आहे. याकरिता भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या मापदंडानुसार गोडाऊन तयार करून घ्यावी लागतात. उदा. गोडाऊनला केवळ एकच प्रवेशद्वार असणे, गोडाऊनमध्ये पुरेशी हवा खेळती राहील याची व्यवस्था करणे, गोडाऊनला कोठेही अन्य द्वार अथवा खिडकी असेल तर ती पक्क्या विटा-सिमेंटच्या साहाय्याने कायमस्वरूपी बुजवून घेणे अशा अनेक मापदंडांचा यात समावेश आहे, ज्यायोगे ईव्हीएम सुरक्षित व सुस्थितीत राहतील.

जिल्ह्याच्या ठिकाणी ईव्हीएम प्राप्त झाल्यानंतर ते बनवणाऱ्या कंपनीच्या तंत्रज्ञांकडून जिल्हा निवडणूक अधिकारी व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीमध्ये त्यांची प्रथमस्तरीय तपासणी करण्यात येते. तपासणी झाल्यानंतर सर्व ईव्हीएम सीलबंद करून गोडाऊन सील केले जाते, ज्यावर सर्व संबंधित अधिकारी व मान्यताप्राप्त पक्षांच्या प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या असतात. ही गोदामे दुहेरी कुलूपबंद प्रणालीद्वारे बंद केली असल्यामुळे सर्व अधिकृत संबंधितांना अवगत केल्याखेरीज ईव्हीएम गोडाऊन उघडता येत नाही. वाहतुकीदरम्यानच्या सर्व टप्प्यांमध्ये ईव्हीएम संचाना २४ तास संपूर्ण सुरक्षा पुरवण्यात येते व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर जीपीएस यंत्रणा बसवून वाहतुकीची माहिती सातत्याने घेण्यात येते.

प्रत्येक ईव्हीएमला स्वत:चा अनुक्रमांक असतो व ईव्हीएमच्या प्रत्येक हालचालीची नोंद ईव्हीएम व्यवस्थापन प्रणाली सॉफ्टवेअरद्वारे ठेवण्यात येते. त्यामुळे एखादे ईव्हीएम पळवून नेऊन त्यामध्ये फेरफार करून नंतर गोदामात आणून ठेवणे अशक्य आहे. ज्या वेळी गोदामात असलेली ईव्हीएम (त्यांच्या अनुक्रमांकासह) व सॉफ्टवेअरमध्ये आपल्या गोदामात दिसत असलेली ईव्हीएम यांची संख्या/अनुक्रमांक जुळत नसतील तर ही बाब भारत निवडणूक आयोगाच्या तत्काळ निदर्शनास आणली जाते व गोदामात प्रत्यक्ष असलेल्या मशीन्स व संगणक आज्ञावलीत दिसत असलेल्या मशीन्स यांचा बरोबर मेळ कायम राखला जातो. मतदान यंत्रांच्या वाहतुकीनंतर ज्या ठिकाणी मतदान यंत्रे पोहोचली आहेत, त्या ठिकाणी पुन्हा संपूर्ण सुरक्षेमध्ये प्रथमस्तरीय तपासणी केली जाते.

## व्हीव्हीपॅट म्हणजे काय?

मतदान यंत्राद्वारे मतदानाची प्रक्रिया अधिक पारदर्शीपणे पार पाडण्यासाठी व्हीव्हीपॅट (व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल) हे ईव्हीएम प्रणालीला जोडण्यात येणारे स्वतंत्र यंत्र आहे. याद्वारे मतदारांना आपण कोणत्या उमेदवारास मतदान केले आहे हे ७ सेकंदाकरिता पाहता येते त्यानंतर ज्यावर मतदाराने कोणत्या उमेदवारास मतदान केले आहे याची नोंद असते, ती स्लीप व्हीव्हीपॅट मशीनला जोडलेल्या सीलबंद कप्प्यामध्ये पडते. ईव्हीएम व व्हीव्हीपॅट हे बॅटरीच्या साहाय्याने चालत असल्यामुळे मतदान केंद्रावर वीज गेली म्हणून मतदान प्रक्रियेत अडथळा निर्माण होण्याचा किंवा केलेले मतदान वाया जाण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. महाराष्ट्रासाठी सुमारे १ लाख ३५ हजार व्हीव्हीपॅट यंत्र उपलब्ध करून देण्यात येतील. त्यापैकी प्रत्येक मतदान केंद्रावर एक याप्रमाणे ९६ हजार यंत्रांचा वापर या निवडणुकीत केला जाणार आहे. तर अतिरिक्त व्हीव्हीपॅट यंत्र झोनल अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात येतील.



**व्हीव्हीपॅट यंत्राचे प्रशिक्षण.**

मतदान केंद्रांवर जाणाऱ्या सुमारे ६ लाख कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे. त्याचबरोबर ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रांबाबत मतदारांच्या मनामध्ये काही संभ्रम अथवा शंका राहू नये म्हणून सर्व शहरांमध्ये व गावागावांमध्ये ईव्हीएम व व्हीव्हीपॅटसह डमी मतदानाचे, मतमोजणीचे व निकालाचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात आले. व्हीव्हीपॅट यंत्रांचा वापर नागालँडमधील ५१-नोकसेन या राखीव मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या वेळी प्रथमत: करण्यात आला. या वेळी मात्र, देशात सर्व मतदान केंद्रांवर व्हीव्हीपॅट यंत्रासह निवडणूक होणार आहे.


## सर्वोच्च सुरक्षितता

मतदान यंत्र गोदामामध्ये आल्यापासून ज्या ज्या वेळी सीलबंद गोदाम उघडण्यात येतो, त्या प्रत्येक वेळी मान्यताप्राप्त व नोंदणीकृत राजकीय पक्षांचे नामनिर्देशित प्रतिनिधी त्या ठिकाणी उपस्थित असतात.

गोदाम उघडताना व नंतर बंद करताना त्यावर त्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या जातात. त्यामुळे कोणताही अधिकारी आपल्या मर्जीने गोदाम उघडून त्यातील मतदान यंत्रे हाताळू शकत नाही. मतदान यंत्र हे एक इलेक्ट्रॉनिक उपकरण आहे, त्यामध्ये तांत्रिक बिघाड होऊ शकतो, ही शक्यता गृहीत धरून भारत निवडणूक आयोगामार्फत आवश्यक असलेल्या बॅलेट युनिटच्या २१५ टक्के, कंट्रोल युनिटच्या १२५ टक्के व व्हीव्हीपॅटच्या १३५ टक्के इतक्या संख्येने मतदान यंत्रांचा पुरवठा सर्व जिल्ह्यांना केला जातो. त्यामुळे ऐनवेळी एखाद्या ठिकाणी मतदान यंत्रामध्ये बिघाड झाल्यास त्या जागी दुसऱ्या मतदान यंत्रांची तत्काळ व्यवस्था करता येते. मतदान यंत्रांची निर्मिती करणाऱ्या दोन्ही कंपन्यांच्या तंत्रज्ञांची पुरेशा प्रमाणात नियुक्ती करण्यात येते, ज्यामुळे मतदान यंत्रामध्ये किरकोळ बिघाड झाल्यास तत्काळ दुरुस्त करून ते मतदान यंत्र वापरता येते.

## मतदान यंत्रांबाबत केले जाणारे आरोप

ईव्हीएम मशीनमध्ये फेरफार केल्याचे, मतदान यंत्र मतदानाला येण्यापूर्वीच मतदान यंत्रामध्ये फेरफार करून कोणत्याही उमेदवाराला मतदान केले तरी एका विशिष्ट उमेदवारालाच मत पडत असल्याचे किंवा मतदानाला सुरुवात करण्यापूर्वीच या यंत्रामध्ये काही मतदान केले जाण्याचे आरोप केले जातात. परंतु वरील विवेचनावरून असे काही करणे केवळ अशक्य आहे. मतदान यंत्रे मतदानासाठी वापरण्यापूर्वी त्यांची दोन वेळा सरमिसळ केले जाते. पहिल्या टप्प्यामध्ये जिल्हा स्तरावरून प्रथम स्तरीय तपासणीमध्ये योग्य ठरलेल्या मतदान यंत्रांचे संगणक आज्ञावलीच्या साहाय्याने प्रथम सरमिसळ करून मतदारसंघांना मतदान यंत्रांचे वाटप केले जाते. त्यानंतर द्वितीय सरमिसळमध्ये मतदान केंद्रांना मतदान यंत्राचे वाटप करण्यात येते.




कोणते मतदान यंत्र कोणत्या मतदारसंघात मतदानाकरिता पाठविण्यात येणार आहे हे कोणालाही आधीपासून माहिती होणार नाही, याची पुरेपूर दक्षता घेण्यात येते. तसेच मतदान यंत्रांवर उमेदवारांच्या नावाची व चिन्हांची चिठ्ठी लावण्याच्या प्रक्रियेदरम्यानही सर्व संबंधित अधिकारी तसेच सर्व उमेदवारांचे प्रतिनिधी त्या ठिकाणी उपस्थित असतात. प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात होण्यापूर्वी संबंधित मतदारसंघातील उमेदवारांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीमध्ये अभिरूप (मॉक) केले जाते. त्याच्या निकालाची सर्व उपस्थित प्रतिनिधींसमोर खातरजमा घेतले जाते. त्यानंतर मॉक पोलचा डेटा मतदान केंद्राध्यक्षांद्वारे काढून टाकला जातो. मतदान यंत्रामध्ये सील करण्यापूर्वी कोणतेही मत आधीपासूनच टाकलेले नाही याची खात्री करण्यात येते. त्यानंतर मतदान यंत्र सील केले जाते व त्यावर उमेदवारांच्या प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या घेण्यात येतात.

मतदान यंत्रामध्ये बाह्य उपकरणांद्वारे फेरफार करता येणे शक्य आहे, अशा प्रकारच्या बातम्या, २०१७ च्या सुरुवातीस पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांनंतर, प्रसारित होऊ लागल्या. या सर्व आरोपांचे खंडन करतानाच भारत निवडणूक आयोगाने १२ मे २०१७ रोजी सर्वपक्षीय बैठक घेतली. मतदान यंत्रामध्ये बाह्य उपकरणाद्वारे फेरफार करण्याचे खुले आव्हान सर्व राजकीय पक्षांना दिले. ज्यामध्ये दोन प्रकारच्या आव्हानांचा समावेश होता. पहिले म्हणजे मतदान सुरू होण्यापूर्वी अथवा मतदान प्रक्रियेदरम्यान मतदान यंत्रामध्ये फेरफार करणे आणि दुसरे म्हणजे मतदान झाल्यानंतर परंतु मतमोजणीपूर्वी फेरफार करून निकाल बदलणे. या आव्हानासाठी कोणत्याही राजकीय पक्षास, त्यांनी ज्या ठिकाणी आपले उमेदवार उभे केले आहेत अशा मतदारसंघातील कोणत्याही ४ मतदान केंद्रांवरील मतदान केंद्रांची मागणी करणे, राजकीय पक्षांनी नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही ३ प्रतिनिधींद्वारे भारत निवडणूक आयोगामध्ये तंत्रज्ञांसमक्ष व प्रसारमाध्यमांसमक्ष फेरफार करणे, अशा प्रकारच्या आव्हानांचा समावेश होता.

या आव्हानासाठी ३ जून २०१७ ही तारीख निश्चित करण्यात आली होती परंतु कोणत्याही राजकीय पक्षाने भारत निवडणूक आयोगाचे हे आव्हान स्वीकारले नाही. काही पक्षांनी केवळ मतदान यंत्र तयार करणे, देखभाल, वाहतूक, सुरक्षा व्यवस्था इ. प्रक्रिया जाणून घेण्यामध्ये स्वारस्य दाखवले. यावरून भारतातील मतदान प्रक्रियेमध्ये वापरल्या जाणाऱ्या मतदान यंत्रांमध्ये कोणत्याही बाह्य यंत्रणेद्वारे फेरफार करणे शक्य नसल्याचे आणि त्यामुळे ईव्हीएम मशीन मतदार राजाच्या विश्वासास पात्र ठरली असल्याचे सिद्ध झाले आहे.

**मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, मुंबई**



**निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणार्थींना संबोधित करताना अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी दिलीप शिंदे.**

**निवडणुकांची पारदर्शी व प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना वेगवेगळ्या पातळ्यांवर प्रशिक्षण दिले जाते. निवडणुकीचे काम हे अतिशय जोखमीचे व जबाबदारीचे असते. या प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी हे प्रशिक्षण महत्त्वाचे असते.**

# निवडणूक प्रशिक्षण

निवडणूक आयोगामार्फत केंद्रीय संस्थेमार्फत राष्ट्रीय पातळीवर प्रशिक्षक तयार केले जातात. हे प्रशिक्षक राज्यस्तरीय यंत्रणेला मार्गदर्शन करण्याचे काम करतात तसेच राज्यस्तरीय प्रशिक्षक तयार करतात. हे प्रशिक्षक नंतर जिल्हास्तरीय व पुढे विधानसभा मतदारसंघनिहाय प्रशिक्षकांची फळी तयार करतात. निवडणुका जाहीर झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी या प्रक्रियेशी संबंधित प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणे आयोजित करतात. प्रत्येकाची किमान तीन प्रशिक्षण सत्रे होतात. त्यात वेगवेगळ्या प्रकारच्या प्रशिक्षणांचा समावेश असतो. पहिल्या दोन प्रशिक्षणांमध्ये सर्वसाधारण माहिती तसेच त्यांचे प्रबोधन केले जाते. निवडणुकीच्या दोन दिवस आधी मतदान केंद्रांवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेतले जाते. या प्रशिक्षणाच्या वेळी कर्मचाऱ्यांना ईव्हीएम व व्हीव्हीपॅट संबंधित तांत्रिक माहिती, प्रत्यक्ष हाताळण्याचे प्रशिक्षण तसेच मॉक पोल प्रक्रिया, निवडणुकीच्या संदर्भातील अहवाल, मतदानाच्या वेळी येणाऱ्या तक्रारींचे निराकरण तसेच एकूणच मतदान दिवसाची प्रक्रिया यांचे प्रशिक्षण दिले जाते. मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचेही स्वतंत्र प्रशिक्षण घेतले जाते.



**मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक बघताना वरिष्ठ सनदी अधिकारी डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी**

## ६ लाख कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

राज्यातील ९६ हजार मतदान केंद्रांवर काम करणाऱ्या ६ लाख कर्मचाऱ्यांना तीन स्तरावर प्रशिक्षण दिले जात आहे. महाराष्ट्रासाठी सुमारे १ लाख ३५ हजार व्हीव्हीपॅट यंत्र उपलब्ध करून देण्यात येतील. त्यापैकी प्रत्येक मतदान केंद्रावर एक याप्रमाणे ९६ हजार यंत्रांचा वापर या निवडणुकीत केला जाणार आहे. तर अतिरिक्त व्हीव्हीपॅट यंत्र झोनल अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात येतील.

# सारे काही 'मतदारराजा'साठी

**मतदारांना सहज आणि सुलभतेने मतदार यादीत नाव नोंदवता यावे, दुरुस्त्या करता याव्यात, मतदान करताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी भारत निवडणूक आयोगामार्फत विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सुविधांचा लाभ अधिकाधिक मतदारांनी घेऊन मतदानाची टक्केवारी वाढेल, यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.**

आपल्या राज्यघटनेने प्रत्येकाला मतदानाचा अधिकार दिला आहे. या मतदानाचे महत्त्व सर्वाधिक असून याद्वारेच आपण लोकप्रतिनिधी आणि लोककल्याणकारी शासनाची निवड करीत असतो. एकदा मतदार यादीत नाव नोंदवले म्हणजे झाले, असे नाही. वेळोवेळी निवडणूक आयोगाकडून मतदार यादी सुधारित करण्याचा कार्यक्रम राबवण्यात येत असतो. या वेळी आपले नाव मतदार यादीत आहे किंवा नाही हे तपासणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. विविध कारणांमुळे मतदार यादीमध्ये बदल होत असतात.

## खातरजमा करा

मतदार नोंदणी ऑनलाइन तसेच तहसील कार्यालयात अर्ज करून करता येते. ऑनलाइन अर्जासोबत आवश्यक पुरावे, छायाचित्र संगणकीय प्रणालीत अर्जदाराने भरणे आवश्यक आहे. या अर्जदारांची मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रत्यक्ष पत्त्यांवर जाऊन पडताळणी करतात. सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतरच मतदार यादीत नाव समाविष्ट होते. मतदार यादीत नाव नसल्यास मतदान नोंदणी अधिकाऱ्यांच्या कार्यालयात अर्ज भरून नाव नोंदणी करता येते.

मतदार यादीत नाव समाविष्ट केल्याची खातरजमा करण्यासाठी तसेच नाव, पत्ता यामध्ये बदल करण्यासाठी निवडणूक आयोगाने विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. याचा प्रत्येक नागरिकाने उपयोग करून वेळीच आपले नाव तपासून घ्यायला हवे. तसेच मतदानाचा हक्क बजावताना आयोगाने दिलेल्या यादीनुसार ११ प्रकारच्या ओळखपत्रांपैकी एक ओळखपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे.

## नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

■ वयाचा पुरावा (वय १८–१९ असल्यास) ■ निवासाचा पुरावा ■ छायाचित्र.

मतदारसंघनिहाय मतदार नोंदणी अधिकारी (नागरिकांनी आपला पत्ता कोणत्या विधानसभा मतदारसंघात आहे, ते पाहून संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.)

## मतदारयादीतील बदल

मतदार यादीत नवीन नाव नोंदवण्यासाठी फॉर्म ६ भरणे आवश्यक आहे. त्यासाठी मतदार हा भारताचा नागरिक असावा. त्याचे वय अर्हता दिनांकास ( त्या वर्षाची १ जानेवारी) १८ वर्षे पूर्ण असावे व तो त्या मतदारसंघातील रहिवासी असावा.

■ फॉर्म ६ सोबत मतदारांनी रहिवासी पुरावा व फोटो ओळखपत्र जोडावे.■ मतदार यादीतून नाव कमी करण्यास फॉर्म ७ भरावा.















## दिव्यांगांना मदत

दिव्यांग मतदारांची नाव नोंदणी, मतदान केंद्रांचा शोध, व्हील चेअरची मागणी इत्यादींसाठी PwD हे मोबाइल ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे. या माध्यमातून दिव्यांग मतदार आपल्या साहाय्यासाठी संपर्क करू शकतात. भारत निवडणूक आयोगाच्या https://eci.gov.in या संकेतस्थळावर नागरिकांना तक्रार नोंदवता येते. १८०० १११ ९५० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधता येतो.

■ मतदार यादीतील मतदाराच्या तपशिलात काही बदल करावयाचे असल्यास फॉर्म नं. ८ भरावा ■ मतदारसंघांतर्गत पत्ता बदल होत असल्यास फॉर्म ८ अ भरावा. ■ परदेशस्थ नागरिक मतदार म्हणजे जे मतदार भारतीय नागरिक आहेत; पण परदेशात तात्पुरत्या कालावधीसाठी गेले आहेत त्यांनी फॉर्म ६'अ' भरावा. ■ एका मतदाराचे एकापेक्षा जास्त ठिकाणी नाव असणे हा लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० नुसार गुन्हा आहे. त्यामुळे मतदारांनी आपले नाव एकाच ठिकाणी असेल याची खात्री करावी. ■ काही कारणास्तव आपले नाव मतदार यादीतून वगळले गेले असल्यास फॉर्म ६ नव्याने भरावा. हे सर्व फॉर्म ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

## रंगीत ओळखपत्र

मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी वैध मतदार छायाचित्र (ईपिक आयडी) असणे आवश्यक आहे. यासाठी भारत निवडणूक आयोगाने प्रत्येक मतदारास ओळखपत्र दिले आहे. यापूर्वी संगणकावर मुद्रित केलेले कृष्णधवल ओळखपत्र देण्यात येत होते. परंतु आता आकर्षक असे, रंगीत पॉलिमेरायझिंग विनाइल क्लोराईड (पीव्हीसी) ओळखपत्र देण्यात येत आहेत. या ओळखपत्रावर मतदाराचे नाव, छायाचित्र, जन्मतारीख, पत्ता, लिंग आणि मतदाराचा विशिष्ट ओळख क्रमांक आदी माहिती छापली आहे.

मतदाराच्या नावात, पत्त्यात, लग्नानंतरच्या नावात बदल आदी कारणांमुळे नवीन ओळखपत्रासाठी अर्ज करता येतो. अर्ज केलेल्या नागरिकांना नवीन ओळखपत्र देण्यात येते. ज्या नागरिकांकडे असे ओळखपत्र नसेल त्यांनी अर्ज केल्यानंतर नवीन ओळखपत्र मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत (बीएलओ) मतदारांच्या घरी जाऊन देण्यात येते अथवा संबंधित कार्यालयात हे ओळखपत्र देण्यात येते. ईपिक कार्ड मिळाले नसलेल्या मतदारांनी जवळच्या मतदार मदत केंद्राशी संपर्क साधावा. तेथे ओळखपत्र मिळण्याबाबतचे मार्गदर्शन केले जाते.







## मतदानासाठी आवश्यक ११ दस्तवेज

मतदानासाठी भारत निवडणूक आयोगाचे ओळखपत्र नसेल आणि मतदार यादीत नाव असेल तर अशा वेळी आयोगाने अन्य ११ प्रकारच्या ग्राह्य केलेल्या ओळखपत्रांच्या माध्यमातून मतदारास आपला हक्क बजावता येईल. ■ पासपोर्ट (पारपत्र), ■ वाहन चालक परवाना, ■ छायाचित्र असलेले कर्मचारी ओळखपत्र (राज्य/केंद्र शासन, सार्वजनिक उपक्रम, सार्वजनिक मर्यादित कंपन्यांचे ओळखपत्र), ■ छायाचित्र असलेले बँकांचे पासबुक, ■ पॅनकार्ड, ■ राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी (नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर) अंतर्गत महसूल निर्मिती निर्देशांक (रेव्हेन्यू जनरेशन इंडेक्स) द्वारे दिलेले स्मार्टकार्ड, ■ मनरेगा कार्यपत्रिका, ■ कामगार मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा स्मार्टकार्ड, ■ छायाचित्र असलेले निवृत्तिवेतन दस्तवेज, ■ खासदार/आमदार/विधानपरिषद सदस्य यांना दिलेले ओळखपत्र ■ आधारकार्ड यांचा समावेश आहे.

## नकारात्मक मतदानाचा अधिकार

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सर्व नागरिकांना नकारात्मक मतदानाचा अधिकार 'नोटा' वापरण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. मतपत्रिकेवर अथवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर सर्व उमेदवार आणि त्यांच्या चिन्हांखाली यापैकी एकही नाही, असा पर्याय असेल. नकाराधिकार वापरणारा मतदार या पर्यायासमोरील बटन दाबून आपला मतदानाचा हक्क बजावू शकतो.

## मतदान केंद्रांवर सुविधा

भारत निवडणूक आयोगाने मतदारांच्या सोईसाठी मतदान केंद्राच्या ठिकाणी अकरा प्रकारच्या सुविधा देणे बंधनकारक केले आहे. आयोगांच्या सूचनांमध्ये प्रामुख्याने दिव्यांग मतदारांवर लक्ष केंद्रित केले आहे. प्रत्येक केंद्रावर रॅम्प उभारण्यात यावेत, दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी स्वतंत्र रांग तयार करण्यात यावी, अशा मतदारांना मतदानाचा हक्क प्राधान्याने बजावण्याची संधी द्यावी. दिव्यांगांनी मागणी केल्यास त्यांना घर ते मतदान केंद्र ने-आण करण्यासाठी वाहनाची सोय करण्यात यावी. निवडणुकांचा कालावधी हा उन्हाळ्याचा असल्याने प्रत्येक मतदान केंद्रावर किमान ३०० लिटरची पाणी टाकी ठेवणे आवश्यक आहे. पाणी पुरवण्यासाठी स्वतंत्र व्यक्तीची नेमणूक करण्यात यावी, तसेच रांगांमध्येही पाणी वाटप करण्यात यावे. मतदान केंद्राच्या आवारात पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे उभारण्यात यावीत.




निवडणूक आयोगाच्या www.eci.gov.in या संकेतस्थळावरुन मतदारांना सिंगल विंडो सेवा पुरवण्यात येते. या संकेतस्थळावर क्लिक करून NVSP च्या लिंकवर गेल्यास या सेवेचा लाभ घेता येईल. मतदार यादीतल्या नावाचा शोध, नव्याने नोंदणी करण्यासाठी इंग्रजी/हिंदीमध्ये ऑनलाइन अर्ज, दुरुस्त्या असल्यास त्यासाठी अर्ज, आपले मतदान केंद्र, विधानसभा मतदारसंघ, लोकसभा मतदार संघ इत्यादी तपशील बघता येतात. मतदान केंद्र स्तरावरचा अधिकारी, मतदार नोंदणी अधिकारी आणि इतर निवडणूक अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक बघता येतात. तसेच मतदान ओळखपत्राशी आधारक्रमांक जोडण्यासाठी देऊ शकतो. मतदान प्रक्रियेविषयी लघुपट, ध्वनी चित्रफितीचा लेखी मसुदा, इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनविषयी माहितीपर लघुपटही बघता येतात.

जर एकच स्वच्छतागृह असेल तर ते महिलांसाठी राखीव ठेवण्यात यावे. पुरुषांसाठी तात्पुरती स्वच्छतागृहे उभारावीत.

प्रत्येक केंद्रावर प्रथमोपचार सुविधा, मतदान केंद्र दर्शवणारे दिशादर्शक फलक लावले जावेत, केंद्राच्या आवारात स्वच्छतागृह, पाण्याची व्यवस्था, मदतकक्ष यांचे नकाशाद्वारे माहिती फलक लावण्यात यावेत. केंद्रावर मतदार मदत कक्ष असावा व तो दर्शनी भागात असावा. या कक्षात बीएलओ बसतील व ते मतदारांना त्यांचे नाव व मतदान केंद्र शोधण्यासाठी साहाय्य करतील. महिला मतदारांना मतदान केंद्रावर प्राधान्य द्यावे. बाळासह येणाऱ्या महिला मतदारांच्या बाळाचे संगोपन करण्यासाठी स्वयंसेवक नेमावा आदी सुविधा बंधनकारक आहेत.

## आपले नाव मतदार यादीत कसे शोधायचे ?

ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊन आपले नाव मतदार यादीत शोधता येते. संकेतस्थळाच्या मुख्य पानावर गेल्यावर Search your Name in Final Electoral Roll 2019 New या लिंकवर क्लिक करा. आपल्या मतदार ओळखपत्राचा क्रमांक किंवा नावावरून आपले नाव शोधण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

आपण सरळ http://103.23.150.139/marathi/ या लिंकवर जाऊन आपले नाव शोधू शकता. आपल्याला किमान खालील गोष्टी माहीत असल्याशिवाय या सुविधेद्वारे नाव शोधता येणार नाही. त्यासाठी पुढील बाबी माहिती असणे आवश्यक आहे.

■ आपला जिल्हा ■ मतदार ओळखपत्रावरील आपला युनीक नंबर (विधानसभा मतदारसंघ माहीत नसल्यास) ■ आपला विधानसभा मतदारसंघ (आपले मतदार ओळखपत्र त्या क्षणी उपलब्ध नसल्यास)

मागील वेळी जेथे मतदान झाले असे समजून नाव शोधायला गेलात तर बऱ्याच वेळा तेथे नाव शोधायला वेळ लागतो. कधी कधी मतदान केंद्र तेच राहिलेले नसते. त्यात बदल झालेला असतो व मतदानाच्या स्लिप देणारे कर्मचारी तुमच्यापर्यंत पोहोचलेले नसतात.



**मतदान करण्याविषयी शपथ घेतानाचे छायाचित्र. (जि. सांगली)**

## मतदानासाठी ३ लाख शाईच्या बाटल्या

**लोकसभा** निवडणुकीकरिता मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर शाई लावण्यासाठी महाराष्ट्रात ३ लाख शाईच्या बाटल्या लागणार असून त्यांचे वाटप जिल्हाधिकाऱ्यांना करण्यात आले आहे.

ही शाई म्हैसूर पेंटस् कंपनीमार्फत बनवली जाते. राज्यातील ४८ मतदार संघांमध्ये सुमारे ९५ हजार मतदान केंद्र असून, तेथे या शाईच्या बाटल्या, त्याचबरोबर मतदानासाठी आवश्यक ते साहित्य पोहोचते करण्यात येत आहे.

मतदान केंद्रावर मतदाराची ओळख पटवल्यानंतर त्याला प्रवेश दिला जातो. प्रत्यक्ष मतदानापूर्वीच मतदाराच्या डाव्या तर्जनीवर न पुसली जाणारी शाई लावली जाते. त्यानंतर मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठा घेतला जातो.

मतदानापूर्वी पोलिंग ऑफिसर मतदाराच्या डाव्या तर्जनीवर शाई लावलेली नाही याची तपासणी करतात. जी व्यक्ती डाव्या तर्जनीची तपासणी करू देत नाही ते मतदानासाठी अपात्र असल्याचे मतदान अधिकारी सांगू शकतात. जर एखाद्या मतदाराला डाव्या हाताची तर्जनी नसेल तर त्या व्यक्तीच्या डाव्या हातावरील कोणत्याही बोटाला शाई लावली जाते. मतदानाचा हक्क बजावल्याची खूण म्हणून सर्वसामान्य असो की लोकप्रतिनिधी अथवा सेलिब्रिटींकडून शाई लावलेल्या डाव्या हाताची तर्जनी अभिमानाने दाखवली जाते. लोकशाही मजबूत करणारी ही काळी रेष निवडणुकांचा अविभाज्य असा घटक बनली आहे.

**टीम लोकराज्य**

**सार्वत्रिक निवडणुकांमध्ये राजकीय पक्ष व उमेदवार निवडणूक प्रचारासाठी विविध माध्यमांचा वापर करीत असतात. यामध्ये मुद्रित, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, समाज माध्यमे, जाहिरात फलक तसेच स्थानिक वृत्तवाहिन्यांचा समावेश असतो. या सर्व माध्यमांचा वापर तसेच त्यासाठी येणाऱ्या खर्चावर सनियंत्रण ठेवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने स्वतंत्र निर्देश दिले आहेत. नामनिर्देशनापासून ते मतदानाच्या दिनांकापर्यंत उमेदवारांकडून वापरण्यात येणाऱ्या सर्व प्रचार साहित्यावर निवडणूक आयोगाची करडी नजर असते. कुठल्याही मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि स्थानिक वृत्तवाहिन्यांद्वारे प्रसारित करण्यात येणाऱ्या जाहिरातींसाठी जाहिरात प्रमाणीकरण प्रमाणपत्र आवश्यक आहे.**




# करडी नजर पेड न्यूजवर

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीची स्थापना करण्यात येते. जिल्हास्तरीय समितीला उमेदवारांच्या जाहिरातीचे प्रमाणीकरण करण्याव्यतिरिक्त पेड न्यूज संदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार आहेत. या समितीच्या कार्यकक्षेत राष्ट्रीय व स्थानिक पातळीवरील वर्तमानपत्रे, दूरदर्शन, रेडिओ, केबल तसेच इलेक्ट्रॉनिक वाहिन्या येतात.

## जाहिरात प्रमाणीकरण

प्रत्येक उमेदवाराने कुठल्याही प्रकारची प्रचार जाहिरात प्रसारित / प्रकाशित करण्यापूर्वी तिचे प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे. प्रमाणित न केलेली जाहिरात प्रसारित केल्यास उमेदवारास निवडणूक आयोगाच्या कारवाईस समोरे जावे लागू शकते. राज्यस्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती, जिल्हा व अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी समितीने दिलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने दाखल झालेल्या तक्रारी व दाव्यांबाबत निर्णय घेणे तसेच पेड न्यूजबाबत दाखल झालेल्या अपिलांवर निर्णय घेणे किंवा स्वत:हून दखल घेतलेल्या पेड न्यूज संदर्भात संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना नोटीस बजावण्याबाबत निर्देश देण्याचे कार्य करते.

दैनंदिन वृत्तपत्रांतील उमेदवाराच्या प्रचाराच्या अनुषंगाने असणाऱ्या जाहिरातींसोबतच बातम्या, लेख, वृत्त यांचे दैनंदिन अवलोकन या समितीमार्फत करण्यात येईल.

## अर्जाचे स्वरूप

उमेदवार अथवा राजकीय पक्षाने माध्यम प्रमाणीकरण समितीकडे अर्ज सादर करताना अर्जामध्ये जाहिरात निर्मितीचा खर्च, दूरदर्शन, रेडिओ, मोबाइल मेसेजेस, एलईडी वाहनाद्वारे प्रचार, केबलवर करावयाच्या प्रक्षेपणासंदर्भातील तपशील आदींचा उल्लेख करावा. उमेदवाराच्या लाभासाठी अथवा राजकीय पक्षाच्या लाभासाठी जाहिरात करण्यात येत असल्यास त्याबाबतचा उल्लेख अर्जात करायला हवा.

जर उमेदवाराच्या लाभासाठी जाहिरात करण्यात येत असेल तर तशा आशयाचा उल्लेख करावा लागेल. जाहिरात निर्मिती व प्रसारणासाठी येणाऱ्या खर्चाची देयके धनादेश अथवा धनाकर्षामार्फतच अदा करण्यात येतील, असे सत्यापन द्यावे लागेल. समितीने परवानगी दिल्यानंतर उपरोक्त खर्चाचा तपशील निरीक्षकांना सादर करणे आवश्यक आहे. जाहिरातीतील दावे, प्रतिदावे याबाबतची वस्तुस्थिती व खरेपणा याची संपूर्ण जबाबदारी प्रकाशक व जाहिरातदार यांच्यावर असेल. प्रमाणीकरण समिती ही त्यासाठीच्या कोणत्याही नुकसान व क्षतीसाठी तसेच दिवाणी व फौजदारी दाव्यांसाठी जबाबदार असणार नाही, असे समितीकडून प्रमाणीकरण करताना स्पष्ट केले जाईल, तसेच प्रमाणीकरण पत्रामध्येही त्याचा स्पष्ट उल्लेख असेल.

## पेड न्यूज निश्चित करण्याचे निकष

■ स्पर्धात्मक प्रकाशनांमध्ये छायाचित्रांसह समान आशयाचे लेख ■ विशिष्ट वृत्तपत्राच्या एकाच पानावर उमेदवारांची प्रशंसा करणारे आणि त्यांची निवडणूक जिंकण्याची शक्यता वर्तवणारे लेख ■ एखाद्या उमेदवाराला समाजातील प्रत्येक घटकाचा पाठिंबा असून तोच निवडून येणार अशी खात्री देणारे वृत्त ■ सातत्याने एकाच उमेदवाराची अधिक प्रसिद्धी आणि विरोधी उमेदवाराच्या बातम्या न घेणे ■ उमेदवाराची

## पेड न्यूज म्हणजे काय?

पैसे देऊन अथवा वस्तूच्या बदल्यात प्रिंट किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये एखादी बातमी अथवा परीक्षण छापून आणणे ही पेड न्यूजची व्याख्या भारत निवडणूक आयोगाने स्वीकारली आहे. निवडणूक काळात पेड न्यूजमुळे जनतेमध्ये गैरसमज निर्माण होतात. याशिवाय मतदारही यामुळे प्रभावित होण्याची शक्यता असते.

भलावण करणे ■ समान मजकुराच्या जाहिरातसदृश बातम्या. ■ प्रेस कौन्सिलचे पेड न्यूज वरील निर्णय मार्गदर्शनाचा स्रोत म्हणून न वापरणे.

## पेड न्यूजवर नियंत्रण

पेड न्यूजच्या निकषांमध्ये बसणाऱ्या बातम्या आढळून आल्यास संनियंत्रण समिती, संबंधित उमेदवाराला नोटीस बजावेल. संबंधित उमेदवाराने विहित कालावधीत खुलासा सादर करणे आवश्यक आहे. खुलासा मान्य न झाल्यास ही बातमी पेड न्यूज असल्याचे गृहीत धरून त्यापोटी झालेला खर्च उमेदवाराच्या खर्चामध्ये समाविष्ट करण्यात येईल.



## समाज माध्यमे

वेब आणि समाज माध्यमांचा वापर मागील काही वर्षांपासून वाढत आहे. विकीपिडिया, ट्विटर, यूट्यूब, फेसबूक या साधनांचा समाज माध्यमांमध्ये समावेश होतो. इतर कोणत्याही माध्यमांसाठी निवडणूक प्रचारादरम्यान वापरण्यात येणारी कायदेशीर तरतूद समाज माध्यमांसाठी लागू आहे.

■ उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र भरताना फॉर्म २६ मध्ये शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे. या फॉर्ममध्ये उमेदवारांनी आपला ई–मेल आयडी असल्यास तो दिला पाहिजे. ■ उमेदवाराने त्याच्या समाज माध्यम (सोशल मीडिया) खात्याची माहिती आयोगाला कळवली पाहिजे. ■ निवडणूक प्रचारासाठी समाज माध्यम संकेत स्थळाच्या वापरावरचा खर्च त्यांनी योग्य आणि वेगळा ठेवणे आवश्यक असून, याबाबतच्या खर्चाचे विवरण आयोगाकडे सादर करणे बंधनकारक आहे. ■ समाज माध्यमांवर निवडणूक प्रचारासाठी जाहिरातीकरिता केलेला खर्च हा निवडणूक खर्चाचा भाग आहे. ■ समाज माध्यमांद्वारे प्रचार करावयाचा असेल तर या माध्यमामध्ये करावयाच्या जाहिराती प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय असा प्रचार करता येणार नाही.

## प्रचार जाहिरातींचा खर्च

जाहिराती प्रमाणीकरणासाठी देताना उमेदवारांना ही जाहिरात कोणत्या माध्यमात आणि किती दिवसांसाठी प्रसारित करावयाची आहे, याचा स्पष्ट उल्लेख विहित नमुन्यातील अर्जात करावा लागतो. त्याप्रमाणे त्यासाठी येणारा खर्च उमेदवारांच्या खर्चात समाविष्ट केला जातो.

## प्रचार कालावधीनंतर...

प्रचार कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांद्वारे प्रचार करण्यावर मनाई आहे. परंतु वर्तमानपत्रात प्रचार जाहिराती प्रसारित करावयाच्या असल्यास संनियंत्रण समितीकडून परवानगी घेणे बंधनकारक आहे.

## फिरत्या वाहनाद्वारे प्रचार

फिरत्या वाहनावर ध्वनिक्षेपकाद्वारे तसेच एल.ई.डी. वाहनावर दृकश्राव्य माध्यमाद्वारे जाहिरातींचे प्रसारण करावयाचे असल्यास सनियंत्रण समितीकडून घेतलेले प्रमाणपत्र वाहनांसोबत असणे आवश्यक आहे. भरारी पथकांच्यावतीने तपासणी झाल्यास व हे प्रमाणपत्र न दाखवल्यास संबंधित वाहन व उमेदवारांवर आयोगाकडून कारवाई होऊ शकते.

**जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती (एमसीएमसी) :** ■ जिल्हा निवडणूक अधिकारी/लोकसभा मतदार संघाचा निवडणूक निर्णय अधिकारी. ■ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी (उप विभागीय दंडाधिकारी दर्जापेक्षा कमी नसावा). ■ केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण खात्याचा अधिकारी (जिल्ह्यात असल्यास). ■ प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने पुरस्कृत केलेला निष्पक्ष नागरिक/पत्रकार. ■ जिल्हा जनसंपर्क अधिकारी/ जिल्हा माहिती अधिकारी/सम दर्जाचा अधिकारी. ■ आंतरमाध्यम तज्ज्ञ (इंटरमिडिअरी एक्सपर्ट) / समाज माध्यम तज्ज्ञ (सोशल मिडिया एक्सपर्ट)(जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी पात्रतेच्या अधीन राहून निवड करावी).

## मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातील समिती

**अतिरिक्त/सहमुख्य निवडणूक अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती ज्या नोंदणीकृत पक्षांचे मुख्यालय राज्यात आहे, अशा सर्व संस्था, गट, व्यक्ती, मंडळे यांच्या जाहिरातींचे प्रमाणीकरण करते. समितीची रचना पुढीलप्रमाणे :**

■ अतिरिक्त/सह मुख्य निवडणूक अधिकारी – अध्यक्ष. ■ राज्याच्या राजधानीतील लोकसभा मतदार संघाचा निवडणूक निर्णय अधिकारी. ■ वर्ग–१ च्या दर्जापेक्षा कमी नसणारा माहिती व प्रसारण खात्याचा तज्ज्ञ अधिकारी. ■ माध्यम तज्ज्ञ/समाज माध्यम तज्ज्ञ (मुख्य निवडणूक अधिकारी यांनी पात्रतेच्या अधीन राहून निवड करावी).

**राज्यस्तरीय माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती :** ■ मुख्य निवडणूक अधिकारी – अध्यक्ष. ■ भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेला कोणताही निरीक्षक. ■ समिती स्वीकृत तज्ज्ञ. ■ भारतीय माहिती सेवेतील (अवर सचिव/उप सचिव दर्जाचा) भारत सरकारच्या प्रसिद्धी विभागाने राज्यात नियुक्त केलेला वरील (३) पेक्षा वेगळा तज्ज्ञ अधिकारी. ■ प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने नामनिर्देशित केलेला स्वतंत्र नागरिक किंवा पत्रकार (असल्यास). ■ माध्यमांचे प्रभारी अतिरिक्त/सह मुख्य निवडणूक अधिकारी – सदस्य सचिव. ■ आंतरमाध्यम तज्ज्ञ/समाज माध्यम तज्ज्ञ (मुख्य निवडणूक अधिकारी यांनी पात्रतेच्या अधीन राहून निवड करावी).

**टीम लोकराज्य**

**निवडणुकीच्या प्रचाराला फेसबूक, ट्विटर, इन्स्टाग्राम, ब्लॉग आदी समाज माध्यमांचा नवा आयाम लाभला आहे. पण ही माध्यमे आता निवडणूक आचारसंहितेच्या कक्षेत आली आहेत. या काळात त्यांचा बेसावध वापर आचारसंहिताभंगाच्या गुन्ह्याकडे नेऊ शकतो. तेव्हा सावधान... निवडणुकांचे 'व्हायरल व्हिलन' होऊ नका...**

# समाज माध्यमांवरील 'खलनायक'

**ॲड. प्रशांत माळी**

समाज माध्यमांवर आपण सगळेच स्वतःला व्यावसायिक तज्ज्ञ वापरकर्ते समजतो. मग निवडणूक आली की, आपापल्या आवडत्या नेत्याची किंवा पक्षाची जाहिरात करणे म्हणजे आपले कर्तव्यच समजतो. त्या अनुषंगाने समाज माध्यम पोस्ट बनवणे, रंगवणे, एखाद्या बातमीची मोडतोड करून ती सादर करणे, मिम्स बनवणे, इतकेच काय, तर आपल्या नावडत्या राजकीय उमेदवाराची बदनामी करणे, शिव्या देणे, बीभत्स असे छायाचित्र समाज माध्यमावर पसरवणे यांसारखी एक ना अनेक कामे अतिशय जोमाने करत असतो.



## सावधान

निवडणूक आयोग व भारतीय कायदा यांच्यापुढे जागतिक महाकाय समाज माध्यमांच्या मालकांनी नमते घेतल्याने तुम्ही जरी तुमची ओळख बदलून वरील कार्य करीत असाल, तरी या कंपन्या कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) व आयपी ॲड्रेस किंवा मॅक (एमएसी) आयडीद्वारे तुमच्या खऱ्या ओळखीचा शोध लावून पोलिसांना व निवडणूक आयोगाला कळवण्यास पूर्णपणे तयार आहेत. त्यामुळे हे गाठीशी बांधून घ्या की, माहिती व तंत्रज्ञान कायदा २००० आणि महाराष्ट्र पोलीस दलातील सायबर सेलचे प्रशिक्षित अधिकारी यांचा ससेमिरा कायद्याची तलवार घेऊन तुमच्या मागे लागेल. एखाद्या नेत्यासाठी किंवा जातीच्या अस्मितेसाठी तुम्ही किती सोसाल आणि भोगाल याची कल्पना तुम्हाला जेव्हा न्यायालयापुढे नांग्या टाकून उभे राहाल तेव्हाच येईल, म्हणून आताच स्वतःला समाज माध्यमावर बिथरू देण्यापासून आवरा.

## दुधारी तलवार

समाज माध्यमे ही तशी दुधारी तलवार आहे. तिला जशी व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्याची धार आहे त्याप्रमाणे त्या व्यक्तीला सायबर गुन्हेगार बनवण्याचीसुद्धा धार आहे. या निवडणुकीमध्ये मात्र भर पडली आहे ती म्हणजे निवडणूक आयोगाच्या करड्या नजरेची व समाज माध्यम कंपन्यांनी निवडणूक आयोग आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मदत करण्याच्या केलेल्या निर्धाराची. वायरल करण्याच्या उद्देशाने तुम्ही केलेला एखादा बेकायदेशीर प्रयत्न कदाचित तुम्ही गजाआड गेल्याची बातमी तर वायरल करणार नाही ना, याची काळजी घेणे आजपासूनच गरजेचे झाले आहे. 'निवडणुकांचे वायरल व्हिलन' अशी पदवी तुम्हाला मिळू नये, यासाठी सचेत व सुरक्षित राहणे आवश्यक आहे. कायद्याचे सांगावयाचे झाले तर व्हॉट्सअप आणि फेसबुक पोस्ट्सद्वारे अपप्रचार आणि अफवांच्या कृत्याला भारतीय समाज व पोलीस आता चांगलेच जाणून आहेत. ज्याप्रमाणे मीडिया व्यक्तिविशेषांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करते, त्याचप्रमाणे आजघडीला डिजिटल समाज माध्यमांवरील कृत्य करणाऱ्यांना जाब विचारण्यासाठी तसेच त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी सक्षम झाला आहे. कोणतेही निवडणूक संदर्भातील कार्य, जे आचारसंहितेशी संलग्न नसेल, समाज माध्यम, ऑनलाइन माध्यमे वापरून कोणत्यातरी मोबदल्याखातर अगर मोफत करणे कटाक्षाने टाळा. या सर्व प्रकारांसाठी जर एखादी तात्पुरत्या स्वरूपाची कंपनी तुम्ही स्थापन केली असेल, तरी ते बेकायदेशीरच, हे लक्षात ठेवा. पोलिसांचे विविध मीडिया सेल्स, निवडणूक प्रक्रियेमध्ये मदत करणारे समाज माध्यम तज्ज्ञ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, समाज माध्यमे, समाज माध्यम तज्ज्ञ कंपन्या तुमच्या समाज माध्यमांच्या व्यासपीठावरील हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवून कार्यरत आहेत, याची कृपया कायम जाणीव ठेवा. मी येथे असे सांगू इच्छितो की, आचारसंहितेच्या काळात प्रत्येकाने समाज माध्यमांवर स्वयंशिस्त बाळगावी आणि जर कोणी आचारसंहितेचा भंग करून गैर वागत असेल तर भारताचा एक जागरूक नागरिक बनून त्याबद्दलचे वृत्त पोलिसांना सांगावे. वायरल करणे, वायरल होणे हे जितके ऐकायला चांगले तितकेच ते जबाबदारीचे. त्यामुळे एक जबाबदार नागरिक बना व निर्विवाद निवडणूक होण्यासाठी या डिजिटल भारताला मदत करा.

**सायबर कायदा आणि सुरक्षा तज्ज्ञ**
**संपर्क : ०९८२१७६३१५७**




**जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशात सध्या निवडणुकीच्या निमित्ताने मोठा उत्सव सुरू आहे. या उत्सवाला कोणतेही गालबोट लागू नये, आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे आणि निवडणुका शांततेत आणि मुक्त वातारणात पार पाडण्याचे भारत निवडणूक आयोगाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी आयोगाने सिटीजन व्हिजिलन्स अंतर्गत 'सी-व्हिजिल' हे नवे मोबाइल ॲप उपलब्ध करून दिले आहे. निवडणुकीदरम्यान आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करणारा अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास त्याची तक्रार या ॲपच्या माध्यमातून कोणताही नागरिक थेट ऑनलाइन करू शकेल. या तक्रारीवर १०० मिनिटांत कार्यवाही होईल. त्यामुळे हे ॲप नागरिकांसाठी प्रभावी अस्त्र तर निवडणूक आयोगासाठी तिसरा डोळा ठरणार आहे.**

# सदैव दक्ष, तिसरा डोळा

**संग्राम इंगळे**

निवडणुकीदरम्यान आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाच्या तक्रारींचा आढावा घेण्यासाठी असलेल्या यंत्रणेतील त्रुटी दूर करण्यासाठी 'सी-व्हिजिल' ॲपची निर्मिती भारत निवडणूक आयोगाच्यावतीने करण्यात आली. पूर्वी आचारसंहितेच्या उल्लंघनाच्या तक्रारींची सत्यता तपासून, त्यावर कारवाई करताना यंत्रणेची दमछाक होत असे, तसेच सबळ पुराव्याअभावी संबंधितांवर कारवाई करताना मर्यादा येत असत. या नवीन ॲपमुळे या त्रुटी आणि मर्यादा कमी होणार आहेत.

'सी-व्हिजिल' हे ॲप निवडणुकांदरम्यान आदर्श आचारसंहिता आणि खर्चाच्या उल्लंघनाची तक्रार करणाऱ्या नागरिकांसाठी एक नावीन्यपूर्ण अस्त्र असेल. या माध्यमातून नागरिक स्वतंत्र व निष्पक्षपाती निवडणुकांच्या संचालनासाठी सक्रिय आणि जबाबदार भूमिका बजावू शकतात.

'सी-व्हिजिल' हे ॲप यूजर फ्रेंडली असून त्याचा वापर अत्यंत साधा आणि सोपा आहे. या ॲपचा वापर निवडणुकांच्या अधिसूचनांच्या तारखेपासून ते मतदानाच्या दुसऱ्या दिवसापर्यंत केला जाऊ शकतो. ॲपची विशिष्ट्ये म्हणजे तक्रारीचे छायाचित्र अथवा व्हिडिओ पुरावा म्हणून थेट अपलोड करण्याची सुविधा आहे. कॅमेरा, चांगले इंटरनेट कनेक्शन आणि 'जीपीएस' प्रवेशासह सज्ज असलेल्या अँड्रॉईड स्मार्टफोनवरून या ॲपच्या माध्यमातून आदर्श आचारसंहिता भंगाची तक्रार करता येऊ शकते. तीन टप्प्यात ही तक्रारीची प्रक्रिया पूर्ण होईल.

## तक्रार निवारण

**पहिला टप्पा :** आदर्श आचारसंहिता भंग होत असल्याचे वाटत असल्यास नागरिकांने त्या घटनेचे एक छायाचित्र अथवा २ ते ३ मिनिटांचा व्हिडिओ रेकॉर्ड करावा. भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे (जी.पी.एस.) स्वयंचलित स्थान मॅपिंगसह ॲपवर फोटो अथवा व्हिडिओ अपलोड करावा. त्याच्यानंतर त्या तक्रारदार नागरिकाच्या मोबाइलवर एक युनिक आयडी प्राप्त होतो. नागरिक अशा प्रकारे अनेक घटना नोंदवू शकतात, प्रत्येक अहवालासाठी एक आयडी मिळवू शकतात. ॲप वापरकर्त्यास 'सी-व्हिजिल' ॲपद्वारे आपली ओळख लपवूनसुद्धा तक्रार नोंदवण्याचा पर्याय आहे. यामध्ये मोबाइल नंबर आणि इतर प्रोफाइल तपशील ॲप प्रणालीवर पाठवले जात नाहीत. त्यामुळे निनावी तक्रारीच्या बाबतीत, तक्रारकर्त्यास पुढील स्थिती संदेश मिळणार नाहीत. मात्र, त्याच्या तक्रारीवर कारवाई केली जाते.

**दुसरा टप्पा :** नागरिकाने तक्रार नोंदवल्यानंतर ती अवघ्या पाच मिनिटांतच जिल्हा नियंत्रण कक्षाकडे दाखल होईल. त्या महितीच्या आधारे तक्रारीचा आढावा घेण्यासाठी नियुक्त केलेल्या स्टॅटिक सव्हिलन्स टीम, व्हिडिओ सव्हिलन्स टीम आणि भरारी



पथकाकडे ती माहिती पाठवण्यात येईल. त्यानुसार संबंधित पथकाकडे असणाऱ्या 'सी–व्हिजिल अन्वेषक' नामक जिओग्राफिक इन्फरमेशन सिस्टम–आधारित मोबाइल ॲप्लिकेशनच्या साहाय्याने जीआयएस संकेत आणि नेव्हिगेशन तंत्रज्ञानाचा वापर करून संबंधित पथक घटनास्थळावर अवघ्या १५ मिनिटांच्या आत पोहोचणे अपेक्षित आहे. संबंधित तक्रारीबाबत प्राथमिक तपास व तक्रारीतील तथ्यांची तपासणी करून त्यासंबंधीचा अहवाल ॲपद्वारेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे तातडीने पाठवतील. हा कालावधी ३० मिनिटांपेक्षा अधिक नसेल.

**तिसरा टप्पा :** भरारी पथकाने तक्रारीवर कारवाई केल्यानंतर क्षेत्रीय अहवाल तपासकाने ॲपद्वारेच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाठवल्यावर, त्या घटनेतील तथ्य, पुरावा आणि अहवालाच्या आधारे निवडणूक निर्णय अधिकारी ती तक्रार बाजूला ठेवायची, निकाली काढावयाची की पुढे पाठावायची याचा निर्णय घेतील. जर त्या तक्रारीत तथ्य आढळले तर भारत निवडणूक आयोगाच्या राष्ट्रीय तक्रार पोर्टलवर माहिती पाठवण्यात येईल. तक्रार अपलोड केल्यापासून १०० मिनिटांच्या आत तक्रारीची स्थिती तक्रारकर्त्याला प्राप्त होईल. त्यानंतर तक्रार योग्य असल्यास त्या तक्रारकर्त्याच्या मोबाइलवर तसा संदेश प्राप्त होईल.




### ॲपचा दुरुपयोग होऊ नये यासाठी...

- 'सी–व्हिजिल'चा उपयोग केवळ निवडणूक होत असलेल्या राज्यांच्या भौगोलिक सीमांतर्गतच करता येईल.
- फोटो अथवा व्हिडिओ क्लिक केल्यानंतर 'सी–व्हिजिल' वापरकर्त्यास केवळ ५ मिनिटांचा अवधी मिळेल.
- आधीच मोबाइलवर रेकॉर्ड केलेले फोटो आणि व्हिडिओ अपलोड करण्याची परवानगी यात नाही.
- ॲपवरून क्लिक केलेले फोटो अथवा व्हिडिओ थेट फोन गॅलरीमध्ये जतनही करता येणार नाहीत.
- एकसारख्या तक्रारीच्या दरम्यान किमान ५ मिनिटांचा विलंब करावा लागतो.
- जिल्हा नियंत्रण कक्ष भरारी पथकाला नेमण्याआधी डुप्लिकेट, फ्रिवोलस आणि असंबंधित प्रकरणे बाजूला ठेवण्याचा पर्याय आहे.
- 'सी–व्हिजिल'चा वापर केवळ आदर्श आचारसंहिता उल्लंघनाशी संबंधित खटले दाखल करण्यासाठी केला जाणार.
- याशिवाय नागरिकांनी तक्रारी नोंदवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या मुख्य संकेतस्थळाचा वापर करावा, अथवा १८००–१११–९५० किंवा राज्य संपर्क केंद्रावर १९५० मध्ये राष्ट्रीय संपर्क केंद्राला कॉल करा.

### 'सी–व्हिजिल'


• मतदारांना पैसा, मद्य आणि अमली पदार्थांचे वाटप. • शस्त्रसाठा अथवा शस्त्रवापर. • मतदारांना मारहाण अथवा दमबाजीच्या प्रकारात. • जमावाला चिथावणीखोर भाषण देणे. • पेड न्यूज आणि फेक न्यूज संबंधी. • मतदारांना आमिष म्हणून वस्तूंचा वापर. • मतदान केंद्रापर्यंत मतदारांची मोफत वाहतूक करणे. • उमेदवाराच्या मालमत्ता अपात्रतेसंबंधी व इतर. • 'सी–व्हिजिल'ची तक्रार योग्य असल्यास संबंधितांवर प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर) नोंदवला जाईल. संबंधितांवर फौजदारी कार्यवाही होणार. कारवाईतील रोख रक्कम जप्त होणार. • कारवाईतील मद्य अथवा अमली पदार्थ जप्त होणार.

(संदर्भ : भारत निवडणूक आयोग अधिकृत संकेतस्थळ)

**विभागीय माहिती कार्यालय, पुणे.**

# आदर्श आचारसंहिता

**निवडणूक घोषित होताच आदर्श आचारसंहिता लागू होते. या आचारसंहितेमुळे राजकीय पक्षातील नेते-कार्यकर्त्यांबरोबर शासकीय यंत्रणा आणि सामान्य नागरिक यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारची बंधने येतात. राजकीय पक्ष, निवडणूक लढवणारे उमेदवार आणि सत्तेतील पक्षाची प्रचारकार्याच्या दरम्यान, सभा व मिरवणुकी, मतदानाच्या दिवशीची कामे करताना त्यांची सर्वसाधारण वर्तणूक आणि सत्तेत असलेल्या पक्षाची कर्तव्ये, शासकीय यंत्रणेने काय करावे आणि काय करू नये, या बाबी आदर्श आचारसंहितेच्या ठळक वैशिष्ट्यांमध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.**



## शासकीय यंत्रणा

**मंत्री त्यांच्या शासकीय भेटीची निवडणूक प्रचार कार्याशी सांगड घालू शकते काय?**

मंत्री, त्यांच्या शासकीय भेटीची निवडणूक प्रचार कार्याशी सांगड घालू शकत नाही. निवडणूक प्रचार कार्यादरम्यान शासकीय यंत्रणेचा किंवा कर्मचारी वर्गाचा वापर करून शकत नाही.

**निवडणूक प्रचार कार्यासाठी शासकीय परिवहनाचा वापर करू शकतो काय?**

कोणताही पक्ष किंवा उमेदवार त्यांच्या हितसंबंधाला मदत व्हावी म्हणून सरकारी विमाने, वाहने इत्यादींसह कोणत्याही परिवहनाचा वापर करू शकत नाही.

**शासन ज्यांचा निवडणुकीच्या कामाशी संबंध आहे, अशा कर्मचाऱ्यांची बदली व नियुक्ती करू शकते काय?**

निवडणूक घेण्याशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असलेले सर्व अधिकारी/कर्मचारी यांची बदली किंवा नियुक्ती करण्यावर संपूर्णपणे बंदी असेल. जर एखाद्या अधिकाऱ्याची कोणतीही बदली किंवा नियुक्ती करण्याची आवश्यकता असेल तर आयोगाची पूर्ण मान्यता मिळवणे आवश्यक असेल.

**समजा निवडणूक कामाशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांची शासनाने आचारसंहिता अमलात येण्यापूर्वी बदली केलेली आहे आणि त्याने नवीन ठिकाणी कार्यभार घेतलेला नाही. असा अधिकारी आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर नवीन ठिकाणचा पदभार घेऊ शकतो काय ?**

नाही. जैसे थे स्थिती ठेवण्यात येईल.

**केंद्रीय मंत्री किंवा राज्याचे मंत्री, निवडणुकीच्या कालावधी दरम्यान कोणत्याही शासकीय चर्चेसाठी, मतदारसंघांच्या किंवा राज्याच्या कोणत्याही निवडणुकीशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्याला बोलावू शकतात काय?**

कोणताही मंत्री मग तो केंद्रीय मंत्री असो किंवा राज्याचा मंत्री असो, शासकीय चर्चेसाठी मतदारसंघाच्या किंवा राज्याच्या कोणत्याही निवडणुकीशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्याला कोठेही बोलावू शकत नाही. जर केंद्रीय मंत्री निव्वळ कार्यालयीन कामासाठी दिल्लीच्या बाहेर प्रवास करीत असेल व लोकहितास्तव तो टाळू

## कालावधी

**आदर्श आचारसंहिता कोणत्या दिनांकापासून अमलात येते आणि कोणत्या दिनांकापर्यंत चालू राहते?**

निवडणूक आयोगाद्वारे निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अमलात येते आणि निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू राहते. लोकसभा निवडणूक २०१९ साठी १० मार्च २०१९ पासून आचारसंहिता लागू झाली असून निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुरू राहील.




**सार्वत्रिक निवडणुका व पोटनिवडणुका चालू असतानाच्या कालावधीतील आचारसंहिता कशा प्रकारे लागू राहील?**

■ लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या कालावधीत संहिता संपूर्ण देशभर लागू राहील.
■ विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या कालावधीत संहिता संपूर्ण राज्याला लागू राहील. ■ पोटनिवडणुकीच्या कालावधीत संहिता संपूर्ण जिल्ह्याला किंवा मतदारसंघ ज्या जिल्ह्यांमध्ये आहे त्या जिल्ह्यांना लागू असेल.

## वाहनांचा वापर

**निवडणुकीच्या काळात मंत्र्यांना शासकीय वाहन वापरण्याचा हक्क आहे काय?**

मंत्र्यांना केवळ शासकीय कामासाठी त्यांच्या शासकीय निवासस्थानापासून त्यांच्या कार्यालयापर्यंत प्रवास करण्यासाठी शासकीय वाहनाचा वापर करण्याचा हक्क आहे. परंतु अशा प्रवासाची निवडणुकीच्या प्रचारकार्याशी किंवा कोणत्याही राजकीय कामाशी सांगड घालता येणार नाही.

**मंत्री किंवा कोणतेही इतर राजकीय कार्याधिकारी सायरनसह (संकेतदीप) असलेली पायलट कार वापरू शकतात काय?**

मंत्री किंवा कोणतेही इतर राजकीय कार्याधिकारी निवडणुकीच्या काळामध्ये पायलट कार, कोणताही रंग असलेला संकेतदीप असलेली मोटारगाडी किंवा कोणत्याही प्रकारचा सायरन लावलेली मोटारगाडी खासगी किंवा कार्यालयीन कामकाजासाठी, जरी राज्य प्रशासनाने अशा भेटीसाठी त्यांच्यासोबत त्यांना सुरक्षेसाठी पुरवलेली असली तरीही, ती वापरण्याची मुभा नाही. वाहन, शासनाच्या मालकीचे असो किंवा खासगी मालकीचे असो तेथेही ही बंदी लागू आहे.



**समजा, राष्ट्रपती/उपराष्ट्रपती राज्यात एखाद्या स्थळी भेट देणार आहेत, तेव्हा मंत्र्याला इतर राजशिष्टाचारासह विशेष मान्यवर व्यक्तींसाठी असलेली (व्हीआयपी) गाडी वापरण्याची मुभा आहे काय?**

होय. मंत्र्यांना इतर राजशिष्टाचारासह विशेष मान्यवर व्यक्तींसाठी असलेल्या गाडीने त्यांच्या मुख्यालयापासून राष्ट्रपती/उपराष्ट्रपती यांच्या भेटीच्या ठिकाणी जाता येईल. कोणत्याही इतर राजकीय कार्याधिकाऱ्याबरोबर कोणताही इतर कार्यक्रम/बैठक यांमध्ये उपस्थित न राहता त्याच्या मुख्यालयात परत येता येईल. हा निर्बंध त्याने मुख्यालय सोडल्याच्या वेळेपासून आणि मुख्यालयात परत येईपर्यंत लागू आहे.

**समजा, राज्याने मंत्र्यांना वाहन दिलेले आहे आणि अशा वाहनाच्या देखभालीसाठी मंत्र्यांना भत्ता दिलेला आहे, मंत्र्यांना याचा वापर निवडणूक प्रयोजनांसाठी करता येतो काय?**

जेथे राज्याने वाहन पुरवलेले आहे किंवा वाहनाच्या देखभालीसाठी मंत्र्याला भत्ता दिला आहे. तेथे ते अशा वाहनाचा उपयोग निवडणुकीसाठी करू शकत नाही.

**आचारसंहितेच्या तरतुदींचा ज्यांनी भंग केला आहे, अशा मंत्र्यांकडून शासकीय वाहनांच्या सुविधा काढून घेण्यात येऊ शकतात काय?**

होय, मुख्य निवडणूक अधिकारी आपल्या शासकीय पदाचा गैरवापर करणाऱ्या मंत्र्यांकडून झालेल्या खर्चाची वसुलीदेखील करू शकतात.

शकत नसेल तर मंत्रालयाच्या विभागाच्या संबंधित सचिवांकडून ते या अर्थाचे प्रमाणित करणारे पत्र संबंधित राज्याच्या मुख्य सचिवांकडे पाठवले जाईल. तसेच त्याची एक प्रत निवडणूक आयोगाला पाठवली जाईल.

**ज्या मतदारसंघात निवडणुका होणार आहेत तेथील मंत्र्यांच्या खासगी भेटीत शासकीय अधिकारी मंत्र्यांना भेटू शकतो काय?**

नाही. मतदारसंघात मंत्र्यांना त्यांच्या खासगी भेटीत कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याने भेटणे हे संबद्ध सेवा नियमाखालील गैरवर्तनाबद्दल दोषी ठरेल, आणि लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५१ च्या कलम १२९ (१) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे असे काही त्या शासकीय अधिकाऱ्याने केले असेल तर त्या कलमाच्या सांविधानिक तरतुदीचादेखील त्याने भंग केला आहे, असा अधिकचा विचारदेखील केला जाईल. त्याखाली तरतूद केलेल्या शिक्षेनुसार कारवाईसदेखील तो पात्र असेल.

**अनुसूचित जातींकरिता असलेल्या राष्ट्रीय आयोगाच्या किंवा कोणत्याही इतर तत्सम राष्ट्रीय/राज्य आयोगाच्या सदस्यांना भेटी देण्यावर निर्बंध आहेत काय?**

अशा आयोगाच्या सदस्यांनी अशी कोणतीही भेट आणीबाणीच्या काळात टाळता न येण्याजोगी असेल तर ती सोडून कोणत्याही दिशेने उठणारा कोणताही गैरसमज टाळण्यासाठी निवडणुका पूर्ण होईपर्यंत सर्व शासकीय भेटी लांबणीवर टाकाव्यात.

**भारत सरकारच्या वित्त आयोगाचे सदस्य राज्यांना भेट देऊ शकतात काय?**

होय, परंतु राज्यासाठी केलेली किंवा अन्य कोणतीही कामगिरी दर्शवणारी माहिती पत्रकार परिषदेत मांडणार नाहीत किंवा त्याबाबत प्रसिद्धीपत्रक काढणार नाहीत.

## शासकीय कार्यक्रम

**राज्याचा कार्यक्रम असलेल्या राज्याच्या नवीन वर्षदिन कार्यक्रमात मुख्यमंत्री किंवा इतर मंत्री उपस्थित राहू शकतात काय?**

नाही, केवळ मुख्य सचिव व इतर अधिकारी यांना या कार्यक्रमात भाग घेता येईल. ज्या कार्यक्रमासाठी शासनाचा निधी वापरण्यात येतो अशा कार्यक्रमात मुख्यमंत्री किंवा मंत्री यासह कोणत्याही राजकीय व्यक्तीला भाग घेता येणार नाही.

**राज्याच्या राजदिनाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री/मंत्री/सभापती यांना उपस्थित राहता येते का?**

त्यास कोणतीही हरकत नाही. परंतु या प्रसंगी ते कोणतेही राजकीय भाषण करणार नाहीत आणि केवळ शासकीय अधिकारीच हा कार्यक्रम आयोजित करतील. मुख्यमंत्री/मंत्री/सभापती यांचे छायाचित्र दर्शवणारी कुठलीही जाहिरात प्रदर्शित करण्यात येणार नाही.

**राज्यपाल/मुख्यमंत्री/मंत्री हे विद्यापीठाच्या किंवा संस्थेच्या दीक्षान्त समारंभात सहभागी होऊ शकतात काय आणि भाषण करू शकतात काय?**

राज्यपालांना दीक्षान्त समारंभात सहभागी होता येईल व भाषण करता येईल. मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना दीक्षान्त समारंभात सहभागी न होण्याचा व भाषण न करण्याचा सल्ला देण्यात येईल.

**राजकीय कार्यकर्त्यांच्या निवासस्थानी जिचा खर्च राज्यकोषाद्वारे करण्यात येईल, अशी 'इफ्तार पार्टी' किंवा कोणतीही इतर तत्सम पार्टी आयोजित करता येईल काय?**

नाही, तथापि, अशी कोणतीही पार्टी कोणतीही व्यक्ती तिच्या वैयक्तिक अधिकारात आणि स्वखर्चाने आयोजित करण्यास स्वतंत्र्य आहे.

**विधानसभा अधिवेशनातील (अर्थसंकल्पीय अधिवेशन) राज्यपालांच्या अभिभाषणावर कोणतेही निर्बंध आहेत का?**

नाही, कल्याणकारी योजना, शासकीय कामे इत्यादींबाबत.

## जाहिराती, अनुदाने

**सत्ताधारी पक्षाच्या छापील माहितीपत्रकास मदत करण्याच्या दृष्टीने त्यांच्या कामगिरीच्या संबंधात सार्वजनिक राजकोषाच्या खर्चाने जाहिरात देण्यास कोणताही निर्बंध आहे काय?**

होय, छापील आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये, सार्वजनिक राजकोषाच्या खर्चाने, पक्षाच्या कामगिरीच्या संबंधात जाहिरात देण्यास आणि निवडणुकीच्या कालावधीत शासकीय प्रसिद्धी माध्यमाचा गैरवापर करण्यास प्रतिबंध आहे.



**सार्वजनिक राजकोषाच्या खर्चाने केंद्र/राज्य शासनातील सत्ताधारी पक्षांची कामगिरी, होर्डिंग/जाहिरात इत्यादींवर दाखवता येईल काय?**

नाही. लावण्यात आलेली अशी सर्व होर्डिंग्स, जाहिराती इत्यादी संबंधित प्राधिकाऱ्यांकडून तत्काळ काढून टाकण्यात येतील. याशिवाय, सार्वजनिक राजकोषाच्या खर्चाने वर्तमानपत्रांमध्ये आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमासह इतर माध्यमांमध्ये जाहिराती देण्यात येऊ नयेत.

**मंत्री किंवा अन्य कोणताही प्राधिकारी स्वेच्छाधीन निधीतून अनुदाने/रकमा मंजूर करू शकतात काय?**

नाही. मंत्री आणि इतर प्राधिकारी निवडणुका घोषित झाल्यापासून स्वेच्छाधीन निधीतून अनुदाने/रकमा मंजूर करणार नाहीत.

**ज्या लाभार्थींना निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रकमेचे वाटप करण्यात येईल अशा लाभार्थींच्या नावे धनाकर्ष तयार करण्यासाठी, मंत्र्यांच्या स्वेच्छाधीन निधीतून मंजूर केलेली रक्कम कोषागारामधून काढता येईल काय?**

निधी संबंधित विभागाच्या 'वैयक्तिक खातेवही लेखा' मध्ये ठेवता येईल किंवा निवडणुका पूर्ण होईपर्यंत तो देण्यास स्थगिती देण्यात येईल.

**समजा एखादी योजना किंवा कार्यक्रम यांच्या संबंधात कार्यादेश काढण्यात आला असेल तर, निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाल्यानंतर तो सुरू करता येईल काय?**

निवडणूक घोषित होण्यापूर्वी कार्यादेश देण्यात आला असेल, परंतु त्या क्षेत्रामध्ये प्रत्यक्षपणे काम सुरू करण्यात आलेले नसेल त्या संबंधात, काम सुरू करण्यात येणार नाही. त्या क्षेत्रामध्ये जर काम प्रत्यक्षपणे सुरू झाले असेल तर ते चालू ठेवता येईल.

**एखादा मंत्री किंवा अन्य कोणताही प्राधिकारी कोणत्याही स्वरूपातील वित्तीय अनुदाने किंवा त्याची वचने देऊ शकतो किंवा कोणत्याही प्रकारच्या प्रकल्पांच्या**

## विकासनिधी

**कोणत्याही योजनेसाठी संसद सदस्य/विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य यांच्या अधीन असलेल्या स्थानिका क्षेत्र विकास निधीमधून कोणताही नवीन निधी देता येईल काय?**

नाही. जेथे निवडणूक चालू आहे, अशा कोणत्याही क्षेत्रात निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत कोणत्याही योजनेसाठी संसद सदस्य/विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य यांच्या अधीन असलेल्या स्थानिक क्षेत्र विकास निधीमधून कोणताही नवीन निधी देण्यात येणार नाही.

**इंदिरा आवास योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना, राष्ट्रीय कामाच्या मोबदल्यात अन्न कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, यांसारखे केंद्र सरकारचे विविध ग्राम विकास कार्यक्रम/योजना आहेत. या योजना/कार्यक्रम राबवण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे आहेत काय?**

होय, खाली नमूद केल्याप्रमाणे, प्रत्येक योजना/कार्यक्रम यांच्या संबंधात पुढील मार्गदर्शक तत्त्वे अनुसरण्यात येतील :-

- **इंदिरा आवास योजना :** इंदिरा आवास योजनेंतर्गत घरांची योजना मंजूर झालेल्या आणि बांधकाम सुरू झालेल्या लाभार्थ्यांना मानकानुसार साहाय्य करण्यात येईल. निवडणुका पूर्ण होईपर्यंत, कोणतीही नवीन बांधकामे हाती घेण्यात येणार नाहीत किंवा नवीन लाभार्थींना साहाय्य मंजूर करण्यात येणार नाही.
- **संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना :** चालू असलेली कामे चालू ठेवता येतील आणि अशा कामांकरिता ठरवून दिलेला निधी देता येईल. कोणत्याही पंचायतीच्या बाबतीत, जेथे सर्व चालू कामे पूर्ण




झालेली असतील आणि जेथे नवीन वेतन रोजगाराची कामे हाती घेण्याची आवश्यकता असेल आणि जेथे ग्राम विकास मंत्रालयाने पंचायतींना थेट निधी दिला असेल तेथे, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या पूर्व संमतीने चालू वर्षाकरिता मान्यताप्राप्त वार्षिक कृती योजनेमधून नवीन कामे सुरू करता येतील. इतर निधींमधून कोणतीही नवीन कामे सुरू करण्यात येणार नाहीत.
- **स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना :** ज्या बचतगटांना त्यांच्या अर्थसाहाय्याचा/अनुदानाचा भाग मिळाला आहे. केवळ त्यांनाच उर्वरित हप्ते देण्यात येतील. निवडणुका पूर्ण होईपर्यंत कोणत्याही नवीन वैयक्तिक लाभार्थ्यांना किंवा स्वयंसाहाय्यता बचत गटांना वित्तीय साहाय्य देण्यात येणार आहे.
- **राष्ट्रीय कामाच्या मोबदल्यात अन्न कार्यक्रम :** ज्या जिल्ह्यांमध्ये निवडणुका घोषित झालेल्या नाहीत अशा जिल्ह्यांमध्ये चालू असलेली जुनी कामे करण्यास आणि नवीन कामांना मंजुरी देण्यास कोणताही आक्षेप नाही. जेथे निवडणुका घोषित करण्यात आल्या असतील आणि चालू असतील त्या जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्षात यापूर्वीच सुरू झालेली कामेच केवळ हाती घेण्यात येतील. परंतु दिलेल्या वेळेत अशा कामाच्या अंमलबजावणीकरिता देण्यात आलेली शिल्लक आगाऊ रक्कम ४५ दिवसांकरिता असलेल्या कामाच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.
- **राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम :** ग्राम विकास मंत्रालय निवडणुका घोषित झाल्यानंतर ज्या जिल्ह्यांमध्ये त्या घेण्यात येणार आहेत त्या जिल्ह्याच्या संख्येत वाढ करणार नाही. निवडणुका घोषित झाल्यानंतर जॉबकार्ड धारकांना, त्यांची कामाची मागणी असेल तर चालू कामामध्ये त्यांना रोजगार पुरवण्यात येईल. चालू कामामध्ये कोणताही रोजगार पुरवता आला नाही तर, त्याबाबतीत सक्षम प्राधिकाऱ्यास संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना मान्यता दिलेल्या मागे पडलेल्या प्रकल्पांमध्ये आणि त्यांना या वस्तुस्थितीची माहिती देऊन, नवीन कामे सुरू करता येतील. चालू कामांमध्ये रोजगार देण्यात येऊ शकेपर्यंत, सक्षम प्राधिकाऱ्याकडून कोणतेही नवीन काम सुरू करण्यात येणार नाही. कोणताही मागे पडलेला प्रकल्प उपलब्ध नसेल किंवा मागे पडलेल्या प्रकल्पामधील उपलब्ध असलेली सर्व कामे पूर्णपणे संपवण्यात आली असतील तर, संबंधित सक्षम प्राधिकारी, संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यामार्फत मान्यतेसाठी आयोगाकडे प्रकरण निर्देशित करील.

सक्षम प्राधिकारी चालू प्रकल्पामध्ये, जॉबकार्ड धारकांना रोजगार देण्यात येऊ शकला नाही म्हणून नवीन कामास मंजुरी देण्यात आली अशा अर्थाचे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला एक प्रमाणपत्रदेखील देईल.

**किंवा योजनांच्या कोनशिला बसवू शकतो काय?**

नाही. कोणताही मंत्री व इतर प्राधिकारी कोणत्याही स्वरूपातील कोणतीही वित्तीय अनुदाने किंवा त्याची वचने देणार नाही किंवा (नागरी कामगारांव्यतिरिक्त) कोणत्याही प्रकारच्या प्रकल्पांच्या किंवा योजनांच्या कोनशिला बसवणार नाही. किंवा रस्त्यांचे बांधकाम, पिण्याच्या पाण्याची सुविधा इत्यादी पुरवण्याचे किंवा शासन सार्वजनिक उपक्रम इत्यादीमध्ये कोणत्याही एतदर्थ नियुक्त्या करण्याचे वचन देणार नाही. अशा प्रकरणात वरिष्ठ शासकीय

अधिकाऱ्यास कोणत्याही राजकीय कार्यकर्त्याचा अंतर्भाव न करता कोनशीला बसवता येईल.

**पूर्ण झालेल्या कामांकरिता रकमांचे प्रदान करण्यासाठी कोणताही अडथळा आहे काय?**

संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या संपूर्ण खात्रीच्या अधीन राहून पूर्ण झालेल्या कामाकरिता रकमांचे प्रदान करण्यासाठी कोणताही अडथळा नाही.

**कल्याणकारी उपाययोजना घोषित करण्यासाठी निर्बंध असल्यास शासनास आणीबाणीची स्थिती किंवा अनपेक्षित आपत्तींचा सामना कसा करता येईल?**

दुष्काळ, पूर, घातक साथ, इतर नैसर्गिक आपत्ती यांची झळ पोहोचलेल्या व्यक्तींना किंवा ज्येष्ठ नागरिक, विकलांग व्यक्ती यांच्याकरिता कल्याणकारी उपाययोजना इत्यादींसाठी साहाय्य देणे यासारख्या आणीबाणीचा किंवा अनपेक्षित आपत्तींचा सामना करण्यासाठी शासनास आयोगाची पूर्वमान्यता मिळवल्यानंतर उपाययोजना करता येईल. सर्व दिखाऊ कामे कठोरपणे टाळण्यात येतील. अशा कल्याणकारी उपाययोजना किंवा साहाय्य आणि पुनर्वसन कामे ही कोणत्याही अंतस्थ हेतुने सत्तेवर असणाऱ्या शासनाकडून हाती घेण्यात आली आहेत, असे कोणतेही मत देण्यात येणार नाही.



**शासनाने अंशत: किंवा पूर्णत: निधी दिलेली वित्तीय संस्था, कोणतीही व्यक्ती, कंपनी, भागीदारी संस्था इत्यादींना आगाऊ दिलेली कर्जे निर्लेखित करू शकतात किंवा कसे?**

नाही. शासनाने, अंशत: किंवा पूर्णत: निधी दिलेल्या वित्तीय संस्था, कोणत्याही व्यक्तीला, कंपनीला, भागीदारी संस्था, इत्यादींना दिलेली आगाऊ कर्जे निर्लेखित करण्याचा अवलंब करता येणार नाही. तसेच कर्जे मंजूर करताना किंवा वाढवताना, अशा संस्थांच्या वित्तीय मर्यादादेखील, लाभार्थींना तारतम्य न ठेवता कर्जे देऊन, वाढवता येणार नाहीत.

**समजा पथकराच्या कंत्राटाची मुदत, वित्तीय वर्षाच्या अखेरीस (३१ मार्च रोजी) समाप्त होत असून त्याच्या लिलावाची तारीख आधीच प्रस्तावित करण्यात आली आहे/जाहिरात देण्यात आली आहे. तर कंत्राट देण्यासाठी लिलाव घेता येऊ शकेल काय?**

होय. परंतु आयुक्त/विभागीय आयुक्त अथवा आयुक्तास/विभागीय आयुक्तास प्रत्यक्ष जबाबदार असलेल्या अन्य कोणताही वरिष्ठ अधिकारी कंत्राटावर पर्यवेक्षण करील आणि आधीच्या धोरणामध्ये किंवा लिलाव कार्यपद्धतीमध्ये कोणताही बदल असणार नाही.

**महसूल संकलनाचा आढावा घेण्यासाठी आणि वार्षिक प्रारूप अंदाजपत्रक इत्यादी तयार करण्यासाठी महानगरपालिकेची, नगरपंचायतीची, नगरक्षेत्र समिती इत्यादींची बैठक बोलावता येईल काय?**

होय. परंतु, अशा बैठका दैनंदिन प्रशासनाशी संबंधित असणाऱ्या नित्याच्या स्वरूपाच्या बाबींवरच केवळ घेता येतील, तथापि, त्या बैठका धोरणे व कार्यक्रम याच्याशी संबंधित असणाऱ्या बाबींवर घेता येणार नाहीत.

**दारू विक्री, तेंदूची पाने आणि अशी इतर प्रकरणे या बाबींच्या संबंधात असणाऱ्या निविदा, लिलाव इत्यादी प्रक्रिया करता येऊ शकतील काय?**

नाही. अशा प्रकरणांच्या प्रक्रिया निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्थगित ठेवाव्यात आणि शासनास, जेथे टाळता न येण्यासारखी आवश्यक परिस्थिती असेल तेथे अंतरिम व्यवस्था करता येईल.



## नवीन योजना, उद्घाटन

**विशिष्ट योजनेसाठी किंवा यापूर्वीच मंजूर करण्यात आलेल्या योजनेसाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे काय? अशी योजना जाहीर करता किंवा उद्घाटन करता येऊ शकेल काय?**

नाही. निवडणूक कालावधीमध्ये अशा योजनेचे उद्घाटन करण्यात/घोषित करण्यास मनाई आहे.

**चालू लाभार्थी योजना पुढे चालू ठेवता येऊ शकेल काय?**

नाही. लाभार्थी अभिमुख योजनेची प्रक्रिया, ती जरी चालू असली तरी निवडणूक कालावधीमध्ये स्थगित करण्यात येईल. तसेच कल्याणकारी योजनांसाठी आणि कामांसाठी कोणताही नवीन निधी देता येणार नाही.

**समजा, योजनेकरिता यापूर्वीच कार्यादेश देण्यात आला असेल अशा योजनेच्या संबंधात काम सुरू करता येऊ शकेल काय?**

नाही. क्षेत्रात प्रत्यक्षपणे काम चालू झाले नसेल तर, ज्या कामाकरिता यापूर्वी कार्यादेश देण्यात आला असेल असे कोणतेही काम सुरू करण्यात येणार नाही. केवळ निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर काम सुरू करण्यात येईल. तथापि, एखादे काम प्रत्यक्षात सुरू झाले असेल तर ते चालू ठेवता येऊ शकेल.

## राष्ट्रीय कार्यक्रम

**ज्यामध्ये मुख्यमंत्री/मंत्री अध्यक्ष असतील/उपस्थित असतील असा, हुतात्म्यांच्या हौतात्म्यांचे स्मरण करण्यासाठी राज्यस्तरीय कार्यक्रम घेता येईल काय?**

होय. परंतु, मुख्यमंत्री व इतर मंत्री यांची भाषणे हुतात्म्यांचे हौतात्म्य व त्यांची स्तुती एवढ्यापुरतीच मर्यादीत असली पाहिजेत. कोणतेही राजकीय भाषण किंवा शासनाची किंवा सत्ताधारी पक्षाची कामगिरी स्पष्ट करणारे किंवा त्याचा निर्देश करणारे भाषण करण्यात येणार नाही.

**५ एप्रिल व १४ एप्रिल रोजी येणारा अनुक्रमे श्री. बाबू जगजीवनराम व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती सोहळा, राज्याचा कार्यक्रम म्हणून घेता येईल काय?**

होय. परंतु त्याचा राजकीय प्रचारांसाठी किंवा शासनाची सार्वजनिक कामगिरी ठळकपणे निदर्शनास आणण्यासाठी निमित्त म्हणून वापर करू नये. तसेच त्यात डामडौल असणार नाही आणि अशा बैठकीत कोणताही राजकीय कार्यअधिकारी भाषण करणार नाही. वरील निर्बंध, अशा प्रकारच्या



इतर सर्व कार्यक्रमांसाठी तितकाच लागू राहील.

**प्रमुख नेत्यांच्या जयंती व पुण्यतिथी सोहळ्याच्या प्रसंगी अतिविशेष मान्यवर व्यक्ती/विशेष मान्यवर व्यक्ती उपस्थित असताना, त्यांचा चित्रपट/चित्रफित प्रसारित करता येऊ शकेल काय?**

अशा प्रसंगी अतिमहत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित असताना त्याची चित्रपट/चित्रफित प्रसारित करता येणार नाही.

**स्वातंत्र्यदिनाच्या/गणतंत्रदिनाच्या संबंधात कवी संमेलन, मुशियारा किंवा इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करता येऊ शकतील किंवा कसे, आणि राजकीय कार्याधिकारी, त्यास उपस्थित राहू शकतात काय?**

होय. केंद्रीय मंत्री/मुख्यमंत्री/राज्यांमधील मंत्री व इतर राजकीय कार्याधिकारी कार्यक्रमाला उपस्थित राहू शकतात. तथापि, या प्रसंगी सत्ताधारी पक्षाची कामगिरी व ठळक वैशिष्ट्ये दर्शवणारी राजकीय भाषणे करण्यात येणार नाही. याची खात्री करून घेण्यात येईल.

**देशभरात साजऱ्या केल्या जाणाऱ्या 'सद्‌भावना दिवस' या सोहळ्यामध्ये राजकीय कार्य अधिकारी सहभागी होऊ शकतील काय?**

केंद्रीय मंत्री / मुख्यमंत्री / राज्यांमधील मंत्री व इतर राजकीय कार्याधिकारी, त्यांची भाषणे केवळ, लोकांमध्ये सलोखा वाढावा व विषयापुरतीच मर्यादित राहतील. यांस अधीन राहून 'सद्‌भावना दिवस' या सोहळ्यामध्ये सहभागी होऊ शकतील. मात्र ते राजकीय भाषणे करणार नाहीत. जर मंत्र्यांच्या नावे काही संदेश पाठवला असेल तर, त्याचा विषय राष्ट्रीय एकात्मतेपुरताच मर्यादित असला पाहिजे व त्यासोबत संबंधित मंत्र्याचे छायाचित्र असता कामा नये.

**ज्याचे उद्‌घाटन राजकीय कार्य अधिकाऱ्याकडून करता येईल, अशा 'क्षयरोग (टी.बी.) थांबवा' कार्यक्रमासंबंधीचा कार्यक्रम घेता येऊ शकेल किंवा कसे आणि 'जागतिक क्षयरोग (टी.बी.) दिवस' यावर जाहिरात प्रसृत व प्रकाशित करता येईल किंवा कसे?**

यास हरकत नाही. परंतु,

(एक) उद्‌घाटन सोहळ्यामध्ये, कोणतीही राजकीय भाषणे करता येणार नाहीत.

(दोन) प्रधानमंत्र्यांच्या आणि/किंवा कोणत्याही मंत्र्याच्या छायाचित्रांसह जाहिरात देता येणार नाही.

(तीन) जाहिराती व भाषणे केवळ क्षयरोगाचा (टी.बी.) मुकाबला व निर्मूलन करण्याच्या विषयापुरतीच केवळ मर्यादित असतील.

**सिगारेट व इतर तंबाखूजन्य उत्पादनांच्या विक्रीवरील वैधानिक इशारे, इत्यादींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रसार माध्यमातून प्रचार करता येऊ शकेल काय?**

होय. परंतु राजकीय व्यक्ती, इत्यादींची छायाचित्रे/संदेशाचा प्रचार (प्रचाराशी संबंध असणार नाही) माध्यमात असणार नाहीत.

**शासनाची मालकी असलेल्या बस तिकीटाच्या मागील बाजूला, राजकीय जाहिराती छापता येतील काय?**

नाही.

**निवडणूक आयोगाकडून ना हरकत/मान्यता न घेता, ज्या परिपूर्ण नाहीत अशा पुढील बाबींचा निर्देश करणाऱ्या**




**योग्य कार्यपद्धती अनुसरल्यानंतर शासन पॅरोलवरील अपराधसिद्ध गुन्हेगारांना मुक्त करू शकते काय?**

ज्या प्रकरणी काही अनिवार्य कारणांसाठी, पॅरोलवर असलेल्या कोणत्याही सिद्धापराध्यास मुक्त करणे अत्यंत आवश्यक आहे, असे शासनास वाटत असेल तर, अशा प्रकरणी शासन पॅरोल मंजूर करण्यापूर्वी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांशी विचानविनिमय करावा लागेल.

**शासकीय कार्यालये व आवारांमध्ये राष्ट्रीय नेते आणि प्रमुख मान्यवर व्यक्तींचे छायाचित्र अथवा दिनदर्शिका लावू शकतो काय?**

शासकीय कार्यालय व आवारांमध्ये प्रधानमंत्री, मुख्यमंत्री, अन्य मंत्री आणि अन्य राजकीय प्रमुख व्यक्तींची छायाचित्रे लावता येणार नाही. परंतु राष्ट्रीय नेते, प्रमुख मान्यवर (लेखक, कवी अन्य) आणि इतिहासातील महत्त्वाच्या व्यक्ती तसेच राज्याचे राज्यपाल आणि राष्ट्रपती यांचे छायाचित्र लावण्यास हरकत नाही. याअनुषंगाने कुठलीही शंका असल्यास मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन कुठलाही निर्णय घेण्यापूर्वी घेण्यात यावे.








**लोकसभा, विधानसभा सार्वत्रिक तसेच पोटनिवडणुकांच्या दरम्यान केंद्र व राज्य शासनाच्या संकेतस्थळावरील राजकीय व्यक्ती आणि मंत्री यांच्या संदर्भातील माहिती हटवण्यात यावी काय?**

आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर सर्व केंद्र व राज्य शासनाच्या संकेतस्थळावरील मंत्री, राजकारणी तसेच राजकीय पक्षांच्या संदर्भातील मजकूर हटवण्यात यावा.

**निवडणूक प्रचारासाठी धार्मिक स्थळे वापरण्याकरिता कोणते निर्बंध आहेत?**

मंदीर, मशिद, चर्च, गुरुद्वारा यासारखी धार्मिक ठिकाणे किंवा पूजेची इतर ठिकाणे निवडणूक प्रचारासाठी चर्चापीठ म्हणून वापरण्यात येणार नाही. तसेच, मते मिळवण्यासाठी जात किंवा समुदायाच्या भावनांना आवाहन करता येणार नाही.






**गव्हाची व इतर कृषी उत्पादनांची किमान आधारभूत रक्कम निश्चित करता येऊ शकेल काय?**

याबाबतीत, निवडणूक आयोगाकडे विचारणा करता येईल.

**राज्य शासन कोणत्याही प्रस्तावाच्या संबंधात थेट निवडणूक आयोगाकडून स्पष्टीकरण/परवानगी/मान्यता मिळवू शकेल काय?**

नाही. निवडणूक आयोगाकडून स्पष्टीकरणे/परवानगी/मान्यता मिळवण्यासाठी राज्य शासनाचा कोणताही प्रस्ताव मुख्य निवडणूक अधिकाऱ्यामार्फत पाठवण्यात यावा, जो या प्रकरणात त्याची शिफारस किंवा अन्य गोष्ट करील.



**लोकांना निवडणुकी संबंधातील कोणतीही बाब चलचित्रक, दूरदर्शनसंच किंवा इतर तत्सम उपकरणांद्वारे दाखवण्यावर निर्बंध आहेत काय?**

होय, मतदान समाप्तीसाठी निश्चित केलेली वेळ संपण्याच्या ४८ तासांच्या कालावधीत उमेदवार निवडणूकविषयक कोणतीही बाब लोकांना चलचित्रक, दूरदर्शनसंच किंवा इतर तत्सम उपकरणाद्वारे दाखवू शकणार नाही. (संदर्भ : लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याचे कलम १२६)

**स्पष्टीकरणात्मक यादीवर शासन कारवाई व कृती करू शकेल काय?**

(एक) निवडणूका घेण्याशी संबंधित अधिकाऱ्यांखेरीज एखाद्या अधिकाऱ्यास पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देणे.

(दोन) विनातिकीट प्रवास केल्याच्या बाबतीत, किमान राशीत वाढ करणे.

(तीन) जागतिक ग्राहक हक्क दिनाच्या दिवशी परिषद घेण्यासाठी ग्राहक समन्वय परिषदेस ग्राहक कल्याण निधीतून अनुदान मंजूर करणे.

(चार) पल्स पोलिओ प्रतिक्षमन कार्यक्रमासंबंधी जाहिरात देणे.

(पाच) अवर्षणप्रवण साहाय्यता उपाययोजनांसाठी संबंधित राज्यांना भेट देण्यासाठी अधिकाऱ्यांचे मंत्रालयांतर्गत पथक नियुक्त करण्यासाठी राष्ट्रीय आपत्कालीन आकस्मिकता निधीतून वित्तीय साहाय्य देणे.

(सहा) अवर्षणग्रस्त म्हणून जाहीर झालेल्या क्षेत्रामध्ये रेल्वेने पाण्याची किंवा चाऱ्याची वाहतूक करण्यासाठी राज्य शासनाची विनंती.

(सात) विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेऊन अधिकाऱ्यांना पदोन्नती देणे आणि सेवानिवृत्ती, प्रतिनियुक्ती इत्यादींमुळे रिक्त होणारी नियमित पदे भरणे.

(आठ) न्यायालयाच्या आदेशानुसार अनुकंपा तत्वावर व्यक्तींची नियुक्ती करणे.

(नऊ) 'मे दिन' साजरा करणे.

(दहा) एका अधिकाऱ्याचा पदभार दुसऱ्या अधिकाऱ्यास देणे.

(अकरा) स्थानिक प्राधिकरणाद्वारे चालवण्यात येणाऱ्या सार्वजनिक उपक्रमांची नियमित दुरुस्ती, देखभाल, मजबुतीकरण व दर्जावाढ यासाठी निविदा मागवणे व त्यास अंतिम रूप देणे.

(बारा) खराब झालेल्या पाणीपुरवठा वितरण नलिका बदलणे/दुरुस्त करणे.

(तेरा) न्यायालयाच्या निदेशांनुसार बांधा वापरा हस्तांतरित करा तत्त्वावर सार्वजनिक सेवासुविधांचे व सार्वजनिक प्रसाधनगृहांचे बांधकाम करण्याचा कार्यादेश काढणे.

(चौदा) महाविद्यालयीन विद्यार्थी संघटनांच्या निवडणुका घेणे.

(पंधरा) न्यायालयाच्या आदेशानुसार अनधिकृत बांधकामे/जमीन काढून घेणे.

(सोळा) एचआयव्ही/एड्स यांचे नियंत्रण करण्याच्या संबंधातील कार्यक्रमांची जाहिरात प्रसिद्ध करणे.

(सतरा) कामगार कायद्यांच्या महत्त्वाच्या तरतुदींबद्दल जाणीव व जागृती निर्माण करण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करणे.

(अठरा) पोलिसांसाठी गणवेशाचे कापड व साधनसामग्री खरेदी करणे व त्याची निविदा काढणे.

(एकोणीस) नि:रसारण/पशुतळ्यांचा गाळ काढण्यास सुरुवात करणे.

(वीस) आश्वासित प्रगती योजनेखाली कर्मचाऱ्यांना वित्तीय दर्जावाढ देणे.

(एकवीस) डास नियंत्रण कामांसाठी निविदा मागवणे.

(बावीस) डॉक्टरांच्या बदल्या करणे/पदस्थापना करणे.

(तेवीस) न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हेगारांना एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात हलवणे.

(चोवीस) खरीप व रब्बी पिकांसाठी रासायनिक खतांचा साठा करण्याकरिता समिती नेमणे.

(पंचवीस) ज्याकरिता आधीच अनुदान मंजूर करण्यात आले आहे आणि ज्याकरिता आधीच निविदा मागवण्यात आल्या आहेत, अशा रुग्णालयांसाठी औषधे व साधनसामग्री खरेदी करणे.

(सव्वीस) भूदलामध्ये युवकांची भरती करण्यासाठी भरती मोहीम आयोजित करणे.

**उत्तर :** होय. परंतु सत्ताधारी पक्षाच्या बाजूने, मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या दृष्टीनेच केवळ ती करण्यात येत आहेत, अशी छाप पाडण्यात येणार नाही किंवा प्रभाव निर्माण करण्यात येणार नाही. याशिवाय जाहिरांतीच्या बाबतीत, मंत्र्यांचे/राजकीय कार्याधिकाऱ्यांचे छायाचित्र, त्यात समाविष्ट करण्यात येणार नाही.

**परवानगी न मिळविता आयोगाकडून परिपूर्ण नसलेल्या पुढील बाबींच्या सोदाहरण यादीवर शासन कार्यवाही व कृती करू शकते काय?**

(एक) सार्वजनिक दूरध्वनी कक्षांना/दूरध्वनी जोडण्यांना क्रमबाह्यपणे मंजुरी आदेश देणे आणि मंत्री महोदयांनी निवडणुकांपूर्वी ज्या दूरध्वनी सल्लागार समित्यांसाठी मंजुरी आदेश दिलेला होता अशा विविध दूरध्वनी सल्लागार समित्यांवर सदस्य नामनिर्देशित करणे.

(दोन) मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या मंडळावर एखाद्या व्यक्तीला अंशकालिक अशासकीय संचालक म्हणून नियुक्ती आदेश देणे.

(तीन) मोठ्या बंदरांच्या प्रशुल्क प्राधिकरणाने मोठ्या बंदर विश्वस्त मंडळासाठी प्रशुल्क निश्चित करणे.

(चार) मार्गदर्शक तत्त्वांनुसार पात्र स्वयंसेवी ग्राहक संस्थांना ग्राहक कल्याण निधीमधून अनुदाने मंजूर करणे.

(पाच) विशेष आर्थिक क्षेत्रे नियम व विनियम यांची अंमलबजावणी.

(सहा) विभागाची खास कामगिरी ठळकपणे निर्दर्शनास आणणारी 'विभागाच्या कामगिरीचे वर्ष' या नावाची



पुस्तिका प्रसिद्ध करणे.

(सात) अंगणवाडी कर्मचारी व मदतनीस यांच्यासाठी भारतीय विमा महामंडळाची, सामाजिक सुरक्षा गट योजनेंतर्गत अंगणवाडी कार्यकर्ता विमा योजना.

(आठ) सर्वसाधारण परिषदेवर तसेच शिक्षकांच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय परिषदेच्या कार्यकारी समितीवर केंद्र सरकारच्या नामनिर्देशित व्यक्तींची नियुक्ती करणे.

(नऊ) सेनादलाची कल्याणकारी उपाययोजना म्हणून केवळ सेना दलातील कार्यरत/सेवानिवृत्त कर्मचारी वर्गाच्या पाल्यांसाठी भरती मोहीम.

(दहा) प्रक्रिया केलेल्या अन्नाच्या सामान्य जाहिराती वृत्तपत्रांमध्ये आणि दृकश्राव्य माध्यमात देणे.

(अकरा) औषधीय क्षेत्रासाठी नवीन प्रचालन परिषद स्थापन करण्यासाठी अधिसूचना काढणे.

(बारा) ई-रेडिनेस इंडेक्समधील स्थितीच्या संदर्भात चालू असलेले प्रकल्प व ई-गव्हर्नन्स यांचा आढावा घेण्यासाठी अंतर्गत यंत्रणा गटाचा प्रमुख म्हणून खासगी कंपनीत व्यक्तीची वरिष्ठ सल्लागार म्हणून नियुक्ती करणे.

(तेरा) नव्याने मंजुरी दिलेल्या महाविद्यालयांना तात्पुरता अल्पसंख्याक दर्जा देणे.

(चौदा) गुणवत्ताधारक पोलीस, गृहरक्षक व अग्निशमन कर्मचारी यासाठी सेवा पदकांच्या बाबतीत अधिसूचना काढणे.

(पंधरा) सूक्ष्म सिंचन प्रकल्प, ठिबक सिंचन प्रकल्प यांची अंमलबजावणी.

(सोळा) विकलांगांना विविक्षित प्रमाणपत्रे इत्यादी देण्यासाठी बहुउद्देशीय ओळख शिबिरे आयोजित करणे.

(सतरा) ज्ञानोद्यानाची (नॉलेज पार्कची) उभारणी करणे.

(अठरा) मानवी हक्क आयोगात किंवा तत्सम इतर आयोगात सदस्यांची नियुक्ती करणे.

(एकोणवीस) प्रकल्पांतर्गत निम्न-लघू व जोड गटारांच्या बांधकामासाठी निविदा सूचना काढणे.

(वीस) बोर्ड फॉर इंडस्ट्रियल अॅण्ड फायनान्शियल रिकन्स्ट्रक्शन (बीआयएफआर) अंतर्गत नोंदणी झालेल्या आजारी औद्योगिक कंपन्यांना आणि तसेच लहान उद्योगांना साहाय्य सवलती देणे.

**उत्तर :** नाही. उपरोक्त बाबींची प्रक्रिया निवडणुका संपेपर्यंत स्थगित करण्यात यावी.

# निवडणूक प्रचार मोहीम

### निवडणूक प्रचार मोहीम करताना राजकीय पक्ष/उमेदवार यासाठी कोणती मुख्य मार्गदर्शक तत्त्वे आहेत?

कोणताही पक्ष किंवा उमेदवार हा निवडणूक प्रचार मोहिमेदरम्यान ज्यामुळे विद्यमान मतभेद अधिक वाढतील किंवा परस्परांमध्ये द्वेष निर्माण होईल किंवा विविध जाती व समाज यांच्यामध्ये धार्मिक किंवा भाषिक तणाव निर्माण होईल अशा कोणत्याही कार्यक्रमात सहभागी होणार नाही. तसेच जेव्हा इतर राजकीय पक्षांवर टीका करण्यात येईल तेव्हा ती टीका त्यांची धोरणे व कार्यक्रम, मागील अभिलेख व काम एवढ्यापर्यंतच मर्यादित असेल, पक्षांनी व उमेदवारांनी इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कार्यक्रमांशी संबंधित नसलेल्या खासगी जीवनाच्या सर्व बाबतीतील टिकेपासून अलिप्त राहावे. खरे किंवा खोटे यांची शहानिशा न केलेले आरोप किंवा विपर्यास होईल, अशा रीतीने इतर पक्षांवर किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांवर टीका करणे टाळावे.



## नामनिर्देशन पत्र भरताना...

### निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात उमेदवार नामनिर्देशनपत्र भरण्यासाठी मिरवणुकीने जाऊ शकतो काय?

नाही, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात येण्यासाठी परवानगी देण्यात आलेल्या वाहनांची कमाल मर्यादा ३ इतकी निर्बंधित केली आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात प्रवेश करण्यासाठी परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तींची कमाल संख्या ५ इतकी (उमेदवारासह) मर्यादित करण्यात आली आहे.

### निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्याच्या वेळी किती व्यक्तींना परवानगी दिली आहे?

उमेदवार, त्याचा निवडणूक प्रतिनिधी, एक प्रस्तावक आणि इतर कोणत्याही व्यक्तीने नव्हे तर उमेदवाराने यथोचितरीत्या लेखी स्वरूपात प्राधिकृत केलेली इतर एक व्यक्ती (जी वकील असू शकेल) यांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळी उपस्थित राहता येईल. (संदर्भ : लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यांचे कलम ३६ (१))

### पक्षाने किंवा उमेदवाराने तात्पुरती कार्यालये उभारणे आणि ती चालवणे यासाठी काही शर्ती/मार्गदर्शक तत्त्वे आहेत काय?

होय, अशी कार्यालये, सार्वजनिक किंवा खासगी मालमत्तेवर/कोणत्याही धार्मिक ठिकाणी किंवा अशा धार्मिक ठिकाणांच्या जागेत/कोणत्याही शैक्षणिक संस्थेला/रुग्णालयाला लागून अथवा विद्यमान मतदान केंद्राच्या २०० मीटरच्या आत, कोणतेही अतिक्रमण करून उघडता येणार नाहीत. शिवाय, अशा कार्यालयांवर पक्ष चिन्ह/छायाचित्रे असलेल्या केवळ एकच पक्ष ध्वज आणि बॅनर लावता येईल. अशा कार्यालयांमध्ये वापरण्यात येणाऱ्या बॅनरचा आकार स्थानिक कायद्याद्वारे विहित केलेला चालू शकेल. या शर्तीच्या अधीन राहून (४ फूट x ८ फूट) यापेक्षा अधिक असता कामा नये.

# प्रचारासाठी वाहने

**ज्यांना राज्याने सुरक्षा दिली आहे असे मंत्री/राजकीय कार्याधिकारी/उमेदवार यांच्याद्वारे वाहनांच्या वापरासंबंधात मार्गदर्शक तत्त्वे आहेत काय?**

होय, ज्यांना सुरक्षा दिली आहे अशा व्यक्तींच्या संबंधात, विशिष्ट व्यक्तींसाठी, जेथे गुप्तवार्ता प्राधिकाऱ्यांसह सुरक्षा अभिकरणास अशा वापरासाठी विहित करण्यात आले आहे, अशा सर्व प्रकरणांमध्ये, राज्याच्या मालकीच्या एका बुलेटप्रूफ वाहनाचा वापर करण्यास परवानगी देण्यात येईल. सुरक्षा अभिकरणांनी तसे विनिर्देशपूर्वक विहित केले असल्याखेरीज, राखीव असणाऱ्या अनेक मोटारगाड्यांच्या वापरास परवानगी देण्यात येणार नाही. जेथे अशा बुलेटप्रूफ वाहनांचा वापर विनिर्दिष्ट केलेला असेल तेथे अशी बुलेटप्रूफ वाहने चालवण्याचा खर्च त्या विशिष्ट व्यक्तीलाच सोसावा लागेल. पथदर्शक, संरक्षक वाहने इत्यादींचा समावेश असणाऱ्या वाहनांच्या ताफ्यासोबतच्या वाहनांची संख्या ही काटेकोरपणे सुरक्षा प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनांनुसार असेल आणि ती संख्या कोणत्याही परिस्थितीत त्याहून अधिक असणार नाही. अशी सर्व वाहने मग ती शासनाच्या मालकीची असोत किंवा भाड्याने घेतलेली असोत, चालवण्याचा खर्च राज्य शासनाकडून भागवण्यात येईल. हे निर्बंध प्रधानमंत्र्यांना लागू नाहीत. कारण त्यांच्या सुरक्षाविषयक गरजांचे शासनाच्या ब्ल्यू बुकद्वारे नियमन केले जाते.

**निवडणूक प्रचार कार्याच्या प्रयोजनासाठी वाहने चालवण्याकरिता कोणते निर्बंध आहेत?**

उमेदवार निवडणूक प्रचाराच्या प्रयोजनार्थ कितीही वाहने चालवू शकतो, परंतु अशी वाहने चालवण्यासाठी त्याने



निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची पूर्वमान्यता घेतली पाहिजे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेला मूळ परवाना (फोटोकॉपी नव्हे) वाहनाच्या वाहनासमोरच्या काचेवर ठळकपणे लावलाच पाहिजे. परवान्यावर वाहनाचा क्रमांक व ज्या उमेदवाराच्या नावे परवाना दिला आहे, त्याचे नाव असले पाहिजे.

**एखाद्या उमेदवाराच्या नावे निवडणूक प्रचारासाठी ज्या वाहनाची परवानगी घेतलेली आहे ते वाहन दुसऱ्या उमेदवारांकडून निवडणूक प्रचारासाठी वापरले जाऊ शकते काय?**

नाही. दुसऱ्या उमेदवाराने निवडणूक प्रचारासाठी अशा वाहनाचा वापर केल्यास तो दंड भारतीय संहितेच्या कलम १७१ एच अन्वये कारवाईस पात्र असेल.

**जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून परवाना मिळाल्याशिवाय निवडणुकीच्या प्रचारकार्याच्या प्रयोजनांसाठी वाहन वापरले जाऊ शकते का?**

नाही. उमेदवाराने प्रचारासाठी वापरलेले असे वाहन अनधिकृत असल्याचे मानण्यात येईल. तो भारतीय दंड संहितेच्या प्रकरण नऊ–ए च्या दंडनीय तरतुदीनुसार करवाईस पात्र असेल. म्हणून ते वाहन निवडणुकीच्या प्रचार कार्यातून तत्काळ बाहेर काढण्यात येईल. ते पुढील प्रचारकार्यासाठी वापरण्यात येणार नाही.

**प्रचारासाठी वापरावयाच्या वाहनामध्ये बाहेरील जोडणी/फेरबदल यास मुभा आहे काय?**

वाहनांच्या बाहेरील फेरबदल, त्यावर लाऊडस्पीकर लावण्यासह मोटार वाहने अधिनियम/नियम तसेच इतर स्थानिक अधिनियम/नियम यांच्या तरतुदींच्या अधीन असतील.

फेरबदल केलेली वाहने आणि व्हिडीओ रथ इत्यादींसारखी विशेष प्रचार वाहनेही, मोटार वाहने अधिनियमान्वये सक्षम प्राधिकाऱ्यांकडून आवश्यक ती परवानगी मिळवल्यानंतरच फक्त वापरली जाऊ शकतात.

# मैदानाचा वापर

**राजकीय प्रचार मोहिमेसाठी आणि मेळाव्यासाठी शैक्षणिक संस्थांचा व त्यांच्या मैदानासह (शासन अनुदानित, खासगी किंवा शासकीय असो)**



**वापर करण्यावर कोणते निर्बंध आहेत?**

राजकीय प्रचार मोहिमेसाठी व मेळाव्यांसाठी शैक्षणिक संस्थांचा त्यांच्या मैदानासह (शासन अनुदानित, खासगी किंवा शासकीय असो) वापर करण्यासाठी मुभा नाही.

**प्रचार कार्यालयासाठी किंवा निवडणूक प्रचाराच्या प्रयोजनार्थ कोणतीही सार्वजनिक सभा घेण्यासाठी विश्रामगृहे, डाक बंगले किंवा इतर शासकीय जागा यांचा वापर करण्यावर काय निर्बंध आहेत?**

होय, विश्रामगृहे, डाकबंगले किंवा इतर शासकीय जागा सत्ताधारी पक्षाची किंवा त्यांच्या उमेदवारांची मक्तेदारी असणार नाही आणि अशा जागेचा इतर पक्षांना व उमेदवारांना वापर करता येईल. परंतु कोणत्याही पक्षाला किंवा उमेदवाराला तिचा निवडणूक प्रचार कार्यालय म्हणून वापर करता येणार नाही, तसेच पुढील गोष्टींची सुनिश्चिती करण्यात येईल :-

(एक) विश्रामभवन/डाकबंगले हे केवळ तात्पुरत्या मुक्कामासाठी (भोजन व निवास) असल्यामुळे कोणत्याही पदाधिकाऱ्यांना मार्गस्थ असताना विश्राम भवनाचा, डाकबंगल्याचा त्यांचे निवडणूक प्रचार कार्यालय म्हणून वापर करता येणार नाही.

(दोन) राजकीय पक्षाच्या सदस्यांना शासनाच्या मालकीच्या विश्रामगृह इत्यादींमधील जागांमध्ये नैमित्तिक सभा देखील घेता येणार नाहीत आणि त्याचा कोणताही भंग झाल्यास तो आदर्श आचारसंहितेचा भंग झाला आहे, असे समजण्यात येईल.

(तीन) विश्रामगृहामध्ये निवासासाठी जागा दिलेल्या व्यक्तीची ने-आण करण्यासाठी असलेल्या वाहनालाच केवळ प्रवेशास मुभा असेल आणि अशा व्यक्तींकडून वापरण्यात येणाऱ्या दोनपेक्षा अधिक वाहनांना



विश्रामगृहाच्या आवारात प्रवेशास मुभा असणार नाही.

(चार) कोणत्याही एका व्यक्तीला ४८ तासापेक्षा अधिक कालावधीसाठी खोल्या उपलब्ध करून देता येणार नाहीत.

(पाच) कोणत्याही विशिष्ट क्षेत्रात मतदान समाप्त होण्यापूर्वी ४८ तास, मतदान किंवा फेरमतदान पूर्ण होईपर्यंत अशा खोल्या दिल्या जाणार नाहीत.

## राजकीय जाहिराती

**सार्वजनिक क्षेत्राच्या आधिपत्याखालील इमारती आणि बांधकामे यांचा राजकीय जाहिरातीसाठी उपयोग करता येईल का?**

नाही. या इमारती अथवा बांधकामांच्या ठिकाणी आचारसंहितेच्या कालावधीत कुठल्याही प्रकारची राजकीय जाहिरात लावता अथवा प्रदर्शित करता येणार नाही.

**सार्वजनिक मालमत्तेवर संबंधित पक्षाचे किंवा उमेदवाराचे भित्तिपत्रक, घोषणाफलक, बॅनर, झेंडे इत्यादी प्रदर्शित करण्यासाठी निर्बंध आहेत काय?**

उमेदवाराला स्थानिक कायदा व अमलात असलेल्या मनाई आदेशांच्या तरतुदींच्या अधीन राहून सार्वजनिक मालमत्तेवर संबंधित पक्षाचे किंवा उमेदवाराचे भित्तिपत्रक, घोषणाफलक, बॅनर, झेंडे इत्यादी प्रदर्शित करता येईल. तपशीलासाठी आयोगाचे अनुदेश क्र.३/७/२००८जेएस/दोन, दिनांक ७/१०/२००८ पाहावेत.

**स्थानिक कायदा, उपविधी अन्वये खासगी जागा/मालमत्ता यावरील भिंतीवर लिहिणे आणि भित्तिपत्रके चिकटवणे, प्रचार फलक (होर्डिंग्ज), कापडी फलक इत्यादी लावण्यासाठी अनुज्ञेय असेल तर जागेच्या/मालमत्तेच्या मालकांकडून लेखी पूर्व परवानगी मिळवणे आवश्यक आहे काय?**




होय, उमेदवाराने मालमत्तेच्या जागांच्या मालकांकडून लेखी पूर्व परवानगी मिळवणे आवश्यक आहे. अशा परवानगीची छायाप्रत/प्रती निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला किंवा या प्रयोजनासाठी त्याने पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याला ३ दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक असेल.

**मिरवणुकीदरम्यान वाहनांवर संबंधित बॅनर पक्षाचे किंवा उमेदवारांचे चित्र, घोषणाफलक, बॅनर प्रदर्शित करण्यावर, वाहून नेण्यावर निर्बंध आहेत का?**

उमेदवारास मोटार वाहन अधिनियम आणि इतर कोणतेही स्थानिक कायदे/उपविधी यांच्या तरतुदींना अनुसरून मिरवणुकीदरम्यान वाहनावर त्यांच्या पक्षाचे किंवा त्यांचे स्वत:चे एक चित्र घोषणाफलक, बॅनर, झेंडा, प्रदर्शित करता येईल/लावता येतो/ वाहून नेता येईल.

**निवडणूक प्रचारादरम्यान भित्तिचित्रे, बॅनर तयार करण्यासाठी प्लास्टिक फळ्यांच्या वापरावर बंदी आहे काय?**

राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी, पर्यावरणाच्या रक्षणासाठी भित्तीचित्रे, बॅनर इत्यादी तयार करण्यासाठी प्लास्टिक/पॉलिथिनचा वापर शक्यतो टाळावा.

## हेलिकॉप्टरचा वापर

**राजकीय पक्षांना, उमेदवारांना शासकीय विमान/हेलिकॉप्टर्स सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांसह मिळण्यासाठी शर्ती आहेत काय?**

होय. राजकीय पक्षांना/उमेदवारांना किंवा खासगी कंपन्या इत्यादींना शासकीय विमाने/ हेलिकॉप्टर्स भाड्याने देताना पुढील शर्ती अनुसरण्यात येतील.

(एक) एका बाजूस सत्ताधारी पक्ष आणि दुसऱ्या बाजूस इतर पक्ष व निवडणूक लढवणारे उमेदवार त्यांच्यात कोणताही भेदभाव करण्यास येऊ नये.

(दोन) त्यासाठी राजकीय पक्ष किंवा निवडणूक लढवणारे उमेदवार यांच्याकडून रकमेचे प्रदान करण्यात येईल. त्याचा योग्य तो अभिलेख ठेवण्यात येईल.

(तीन) दर आणि अटी व शर्ती यासर्वांसाठी एकसारख्याच असतील.

(चार) प्रत्यक्ष वाटप हे प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर करण्यात येईल. या प्रयोजनाकरिता अर्ज स्वीकारणाऱ्या अधिकृत प्राधिकाऱ्याकडून अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक व वेळ नमूद करण्यात येईल.



(पाच) क्वचित प्रसंगी दोन किंवा अधिक अर्जदारांचा दिनांक व वेळ दोन्ही एकसारखीच असेल तर चिठ्ठ्या टाकून वाटप करण्यात येईल.

(सहा) कोणतीही व्यक्ती वैयक्तिक संस्था, पक्ष किंवा उमेदवार यांना एका वेळी तीन दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी विमान/ हेलिकॉप्टर भाड्याने देता येणार नाही.

**पत्रके, भित्तिचित्रे इत्यादी छापण्यावर निर्बंध आहेत काय?**

होय, उमेदवार ज्यावर मुद्रक आणि प्रकाशक यांची दर्शनी नावे आणि पत्ते नसतील असे कोणतेही निवडणूक पत्रक किंवा भित्तिचित्र यांचे मुद्रण करणार नाही किंवा ते प्रकाशित करणार नाही किंवा ते मुद्रित वा प्रकाशित करण्याची व्यवस्था करणार नाही.

**राजकीय पक्षांनी/उमेदवारांनी छापील हस्तपत्रके/पत्रके हवेतून खाली सोडण्यावर निर्बंध आहेत काय?**

नाही. परंतु यासंबंधातील सर्व खर्चाची नोंद, ज्यांच्यावतीने अशी छापील हस्तपत्रके/पत्रके हवेतून खाली सोडण्यात आली, त्या उमेदवाराच्या निवडणूक खर्चात केली जाते.

**निवडणूक प्रचारादरम्यान उमेदवाराची टोपी, मुखवटा, स्कार्फ इत्यादीसारखी विशेष साधने परिधान करण्यास मुभा आहे काय?**



होय, मात्र संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात त्याचा हिशेब घेण्यात येतो. तथापि, साड्या, शर्ट इत्यादींसारख्या मुख्य वस्त्रांचा पक्षाकडून/उमेदवाराकडून होणाऱ्या पुरवठ्यास आणि त्यांच्या वाटपास परवानगी दिलेली नाही. कारण ते कृत्य मतदारांना लाच देणे या सदरात मोडते.

**उमेदवारास त्याची प्रतिमा किंवा देव/देवता इत्यादींची प्रतिमा असलेली दैनंदिनी/कॅलेंडर/स्टिकर छापून त्याचे वाटप करता येईल काय?**

नाही, हे कृत्य भारतीय दंड संहितेच्या कलम १७१-ड अन्वये लाच देण्याच्या सदरात जमा होते.

**पक्षाचे, उमेदवाराचे चिन्ह असलेल्या किंवा नसलेल्या छापील स्टेफनी कव्हर्सचे किंवा इतर तत्सम साहित्याचे वाटप करणे हे आचारसंहितेचे उल्लंघन ठरेल काय?**

होय, असे साहित्य वाटप केल्याचे सिद्ध झाल्यास उक्त साहित्याच्या वाटपाविरुद्ध, जिल्हा प्रशासनाकडून भारतीय दंड संहितेचे कलम १७१-ख अन्वये क्षेत्र दंडाधिकाऱ्यासमोर तक्रार दाखल करण्यात येईल.

**मतदारांना प्रशिक्षित करण्याच्या प्रयोजनासाठी उमेदवार इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची प्रतिरूप मतदान युनिटे तयार करू शकतील काय?**

होय, अशी प्रतिरूप मतदान युनिटे, अधिकृत मतदान युनिटांच्या अर्ध्या आकारमानात, लाकडी प्लास्टिक किंवा प्लायबोर्डाच्या पेट्यांमधून तयार करता येतील. त्यांना तपकिरी, पिवळा किंवा करडा रंग देता येईल.

**राजकीय नेत्यांनी प्रचार कालावधी संपल्यानंतरही मतदारसंघात उपस्थिती राहण्यावर निर्बंध आहेत काय?**

होय, (मतदान बंद होण्याच्या ४८ तास अगोदर सुरू होणारा) प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर, मतदारसंघाबाहेरून आलेले आणि त्या मतदारसंघाचे मतदार नसलेले राजकीय नेते इत्यादींनी त्या मतदारसंघात उपस्थित राहू नये. अशा नेत्यांनी प्रचाराचा कालावधी समाप्त होताच तो मतदारसंघ सोडावा. त्या मतदारसंघाचे मतदार नसले तरीसुद्धा उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी यांना ही बाब लागू होणार नाही.

**ध्वनिक्षेपके वापरण्यासाठी कोणतीही काल मर्यादा आहे काय?**

होय, रात्री १० ते सकाळी ६ या कालावधीत ध्वनिक्षेपकाचा वापर करता येत नाही.

**ज्यानंतर कोणत्याही जाहीरसभा आणि मिरवणुका काढता येत नाही, अशी अखेरची तारीख कोणती?**



रात्री १० नंतर आणि सकाळी ६ च्या आधी कोणतीही जाहीरसभा घेता येणार नाही. शिवाय उमेदवारास मतदान समाप्तीसाठी निश्चित केलेली वेळ संपण्याच्या ४८ तासाच्या कालावधीत कोणत्याही जाहीर सभा आणि मिरवणुका आयोजित करता येत नाही. समजा, १५ जुलै हा मतदानाचा दिवस असेल आणि मतदाराची वेळ सकाळी ८ वाजेपासून ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत असेल, तेव्हा जाहीर सभा व मिरवणुका घेणे १३ जुलै रोजी संध्याकाळी ५ वाजता बंद करण्यात येतील. (संदर्भ : लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १२६)

**पोलीस प्राधिकाऱ्यांची परवानगी न घेता जाहीर सभांसाठी किंवा मिरवणुकांसाठी सार्वत्रिक प्रचारासाठी ध्वनिक्षेपके वापरता येतील काय?**

नाही, ध्वनिक्षेपकांच्या वापरासाठी संबंधित पोलीस प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्व परवानगी घ्यावी.

**जाहीर सभा घेण्यावर किंवा मिरवणुका काढण्यावर निर्बंध आहेत काय?**

होय, कोणत्याही सार्वजनिक किंवा खासगी ठिकाणी सभा घेण्याकरिता आणि मिरवणुका काढण्याकरिता संबंधित पोलीस प्राधिकाऱ्याकडून लेखी पूर्व परवानगी घ्यावी.

**राज्यातील निवडणुकीच्या प्रभारी असलेल्या एखाद्या राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याला असे निर्बंध लागू होतात काय?**

होय, तथापि, केवळ निवडणुकीच्या कालावधीत राज्याचा प्रभारी असलेल्या पदाधिकाऱ्यांच्या बाबतीत, लोकसभा/राज्य विधानसभा यांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी अशा निर्बंधाचा आग्रह धरला जात नाही. असा पदाधिकारी राज्य मुख्यालयातील आपले राहण्याचे ठिकाण घोषित करील आणि प्रस्तुत कालावधीतील त्यांची ये-जा ही सामान्यपणे त्याचे पक्ष कार्यालय आणि त्याचे राहण्याचे ठिकाण यापुरतीच मर्यादित राहील. वरील निर्बंध सर्व निवडणुकीमधील इतर सर्व पदाधिकाऱ्यांना लागू होतील.

**मतदारांच्या अनौपचारिक ओळखचिठ्ठ्या देण्याबाबत राजकीय पक्ष/उमेदवारांकरिता काही मार्गदर्शक तत्त्वे आहेत काय?**

होय, पांढऱ्या कागदावरील अनौपचारिक ओळख चिठ्ठीत केवळ मतदाराचा तपशील म्हणजेच मतदाराचे नाव, त्याचा अनुक्रमांक, मतदार यादीतील भाग क्रमांक, मतदार केंद्राचा अनुक्रमांक व नाव आणि मतदानाचा दिनांक अंतर्भूत असेल त्यात उमेदवाराचे नाव, त्याचे छायाचित्र आणि चिन्ह अंतर्भूत करता कामा नये.

**सुरक्षा पुरवलेला मंत्री/खासदार (विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य) किंवा इतर कोणतीही व्यक्ती यांची निवडणूक प्रतिनिधी मतदान प्रतिनिधी/मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यावर काही निर्बंध आहेत काय?**



होय, उमेदवारास सुरक्षा पुरवलेले मंत्री/खासदार/विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य किंवा इतर कोणतीही व्यक्ती यांची निवडणूक प्रतिनिधी /मतदान प्रतिनिधी /मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करता येत नाही. कारण अशा नियुक्तीमुळे त्यांची वैयक्तिक सुरक्षा धोक्यात येईल. त्यामुळे त्यांच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत मतदार केंद्राचा परिसर असे वर्णन केलेल्या मतदार केंद्राच्या १०० मीटर परिघाच्या क्षेत्रात आणि मतदान केंद्रात आणि मतमोजणी केंद्राच्या परिसरात आणि मतमोजणी केंद्राच्या आत त्यांच्या सोबत येऊ दिले जाणार नाही. अशा कोणत्याही व्यक्तीस एखाद्या उमेदवाराचा प्रतिनिधी म्हणून कार्य करण्यासाठी त्याची सुरक्षा सोडण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

**उमेदवारास कोणत्याही ठिकाणच्या व्यक्तींची, मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करता येते काय?**

नाही, उमेदवाराने मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केलेली व्यक्ती सामान्यपणे संबंधित मतदान केंद्राच्या भागातील रहिवासी आणि संबंधित मतदान केंद्रक्षेत्रातील मतदार असली पाहिजे आणि संबंधित मतदान केंद्राच्या क्षेत्राबाहेरील असता कामा नये. अशा व्यक्तीकडे निवडणूक छायाचित्र ओळखपत्रही असले पाहिजे. तथापि, केवळ महिला मतदान कर्मचारी असलेल्या मतदान केंद्राच्या बाबतीत त्याच मतदान क्षेत्रातील रहिवासाबद्दल निर्बंध लागू केले जाणार नाहीत.

## राजकीय पक्षाचे अभिनेता-प्रचारक

**लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ याच्या कलम ७७ (१) खाली लाभ मिळणाऱ्या राजकीय पक्षाच्या अभिनेता-प्रचारकर्त्यांना (नेत्यांना) परवाने देण्याचे प्राधिकार कोणाला आहेत?**

राजकीय पक्षाच्या अभिनेता, प्रचारकर्त्यांना (नेत्यांना) रस्त्याने प्रवास करणाऱ्या वाहनाचा लाभ द्यावयाचा असल्यास केंद्रातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांद्वारे परवाने देण्यात येतील. संपूर्ण राज्यभरात निवडणूक प्रचाराकरिता कोणत्याही नेत्याला हेच वाहन वापरण्यासाठी परवाना देण्याबद्दल अशा पक्षाने अर्ज केल्यास, केंद्रातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना हाच परवाना देता येईल. तो संबंधित नेत्याने वापरावयाच्या अशा वाहनाच्या (वाहनांच्या) समोरच्या काचेवर/ठळकपणे लावावा लागेल. अशा पक्ष नेत्यांना निरनिराळ्या क्षेत्रात निरनिराळी वाहने वापरावयाची असल्यास, अशा नेत्याद्वारे वापरण्यात येणार असलेल्या त्या वाहनाच्या समोरच्या काचेवर ठळकपणे दिसेल, अशा संबंधित व्यक्तीच्या नावाने परवाना देता येईल.

## जनमत चाचणी किंवा मतदानोत्तर चाचणी

**जनमत चाचणी किंवा मतदानोत्तर चाचणी कोणत्याही वेळी घेता येणे, प्रकाशित करणे, प्रसिद्ध करणे किंवा प्रसारित करणे शक्य आहे किंवा कसे?**

नाही, घेण्यात आलेल्या जनमत चाचणीचा किंवा मतदानोत्तर चाचणीचा निकाल कोणत्याही वेळी मुद्रित इलेक्ट्रॉनिक किंवा कोणत्याही इतर माध्यमातून कोणत्याही प्रकारे

- एकाच टप्प्यात घेतलेल्या एखाद्या निवडणुकीतील मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या तासासह ४८ तासाच्या कालावधीदरम्यान आणि



- अनेक टप्प्यातील निवडणुकीमध्ये आणि वेगवेगळ्या राज्यातील निवडणुका एकाच वेळी घोषित केल्या असल्यास कोणत्याही वेळी निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या तासांपूर्वीच्या ४८ तासापासून सुरू होऊन सगळ्या राज्यातील सगळ्या टप्प्यातील मतदान जोपर्यंत संपत नाही तोपर्यंतच्या कालावधीदरम्यान कोणत्याही वेळी प्रकाशित, प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाही.

**लघुसंदेश सेवा (एसएमएस) पाठवण्यावर निर्बंध आहेत काय?**

होय, निवडणुकीदरम्यान लघु संदेश सेवेमार्फत आक्षेपार्ह संदेश पाठवण्यास बंदी आहे. कायद्याचा किंवा भारताच्या निवडणूक आयोगाने याबाबत दिलेल्या सूचनांचा भंग करणारे आक्षेपार्ह लघुसंदेश पोलीस प्राधिकारी, काही विवक्षित भ्रमणध्वनी क्रमांक जाहीर करतील, असा लघुसेवा संदेश प्राप्त करणारी व्यक्ती, उक्त संदेश तो पाठवणाऱ्या व्यक्तींच्या भ्रमणध्वनी क्रमांकासह त्या क्रमांकापुढे पाठवू शकेल. पोलीस अधिकारी कायद्यान्वये त्यावर कारवाई करील.

## मतदानाचा दिवस

**मतदान केंद्रात व केंद्राजवळ उमेदवाराने राजकीय पक्षांनी निवडणूक मंडप (बूथ) उभारण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे आहेत काय?**

मतदान केंद्रापासून २०० मीटर अंतरापलीकडे, निवडणूक मंडप उभारता येईल. तो दोन व्यक्तींचे संरक्षण करण्यासाठी छत्रीचा किंवा ताडपत्रीचा अथवा कापडाच्या तुकड्याचा बनवलेला असेल व त्यात केवळ एक टेबल (मेज) व २ खुर्च्या असतील. मंडपामध्ये उमेदवाराचे पक्षाचे नाव/निवडणूक चिन्ह दर्शवणारा केवळ एक बॅनर (३ x ४ फुटाचा) लावता येईल. तथापि एकाच इमारतीमध्ये दोन मतदान केंद्रे उभारण्यात आली असल्यास दोन मतदान मंडप उभारता येतील.

**निवडणूक मंडप उभारण्यासाठी, संबंधित शासकीय प्राधिकाऱ्यांची किंवा स्थानिक प्राधिकाऱ्यांची लेखी परवानगी मिळवणे आवश्यक आहे काय?**

होय, असे मंडप (बूथ) उभारण्यासाठी संबंधित शासकीय प्राधिकाऱ्याची किंवा स्थानिक प्राधिकाऱ्याची लेखी परवानगी मिळवणे आवश्यक आहे. संबंधित पोलीस/निवडणूक प्राधिकाऱ्यांनी मागणी केल्यावर त्यांच्यासमोर मंडप सादर करण्यासाठी उभारण्याच्या कामासाठी लावलेल्या व्यक्तीकडे लेखी परवानगी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

**मतदान केंद्रामध्ये किंवा केंद्राजवळ निर्बंध आहेत काय?**

होय, मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रापासून शंभर मीटर परीघाच्या आत मतांसाठी प्रचार करण्यास प्रतिबंध आहे. (लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १३० पाहा.)

**मतदान केंद्रात भ्रमणध्वनीचा (मोबाइल फोनचा) वापर करण्यास मुभा आहे काय?** - १०० मीटर परिघाच्या आत मतदान केंद्र परिसर म्हणून वर्णन केलेल्या मतदान केंद्राच्या परिसरात आणि मतदान मंडपामध्ये भ्रमणध्वनी, तार विरहित दूरध्वनी आणि बिनतारी संदेश संच इत्यादी बाळगण्यास किंवा वापरण्यास कोणत्याही व्यक्तीला मुभा नाही. केवळ निरिक्षक/सूक्ष्म निरीक्षक, मतदान केंद्राध्यक्ष व सुरक्षा कर्मचारी वर्ग

यांनाच भ्रमणध्वनी बाळगण्यास मुभा आहे. परंतु त्यांचे भ्रमणध्वनी नि:शब्द (सायलेंट मोडवर) ठेवतील.

**मतदान केंद्रात किंवा केंद्राजवळ सशस्त्र जाण्यास निर्बंध आहेत काय? –** होय, कोणत्याही व्यक्तीला, शस्त्र अधिनियम १९५९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या शस्त्रांनी सुसज्ज होऊन मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या जवळपास जाण्यास मुभा नाही. (लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ – ख)

**मतदानाच्या दिवशी एक उमेदवार किती वाहने मिळवण्यास हकदार आहे? –** (एक) लोकसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवार पुढीलप्रमाणे हकदार असेल :– ■ संपूर्ण मतदारसंघासाठी स्वत:च्या वापरासाठी एक वाहन. संपूर्ण मतदारसंघासाठी उमेदवाराच्या निवडणूक प्रतिनिधीच्या वापरासाठी एक वाहन. ■ याशिवाय लोकसभा (पार्लमेंटरी) मतदारसंघात समाविष्ट असलेल्या प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी उमेदवाराचे कार्यकर्ते किंवा यथास्थिती, पक्ष कार्यकर्ते यांच्या वापरासाठी एक वाहन. (दोन) राज्य विधानसभेच्या निवडणुकीकरिता एखादा उमेदवार पुढीलप्रमाणे हकदार असेल :– ■ उमेदवाराच्या स्वत:च्या वापरासाठी एक वाहन ■ उमेदवाराच्या निवडणूक प्रतिनिधीच्या वापरासाठी एक वाहन. ■ याशिवाय, उमेदवारांचे कार्यकर्ते किवा पक्ष कार्यकर्ते यांच्या वापरासाठी एक वाहन.

**मतदानाच्या दिवशी उमेदवार मतदारसंघात उपस्थित नसला तर, त्याच्या नावाने वाटप केलेले वाहन, इतर कोणतीही व्यक्ती वापरू शकते काय? –** नाही, इतर कोणत्याही व्यक्तीला उमेदवाराच्या वापरासाठी वाटप केलेले वाहन वापरण्याची मुभा नाही.

**मतदानाच्या दिवशी कोणत्याही प्रकारचे हक्काचे वाहन वापरता येऊ शकते काय? –** उमेदवार किंवा त्यांचा प्रतिनिधी किंवा पक्ष कार्यकर्ते किंवा कार्यकर्ते यांना केवळ चार/तीन/दोन चाकी वाहने म्हणजेच मोटारी (सर्व प्रकारच्या) टॅक्सी, ऑटो रिक्षा आणि दुचाकी वाहने वापरण्याची अनुमती असेल. मतदानाच्या दिवशी, या वाहनामधून चालकासह पाच पेक्षा जास्त व्यक्तींची ने–आण करता येणार नाही.

**राजकीय पक्ष/उमेदवार मतदारांची मतदान केंद्राकडे ने–आण करण्याची व्यवस्था करू शकतात किंवा कसे? –** नाही. मतदारांची ने–आण करण्यासाठी वापरलेल्या कोणत्याही प्रकारच्या वाहनाद्वारे मतदान केंद्राकडे व मतदान केंद्रापासून मतदारांची ने–आण करण्याची कोणतीही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष व्यवस्था करणे हा फौजदारी अपराध आहे. (लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १३३ पाहा.)

**मतदानाच्या दिवशी शासकीय/खासगी वाहने चालवण्यावर निर्बंध आहेत काय? –** नाही, बस, मिनीबस यासारखी शासकीय वा–हने वापरण्यास मुभा आहे, परंतु ती मतदारांनी येण्याजाण्यासाठी चोरून वापरली जात नाहीत, याची खातरजमा करून घ्यावी. याशिवाय मतदान मंडपाव्यतिरिक्त रुग्णालये, विमानतळ, रेल्वे स्थानके, बस स्थानके, मित्र किंवा नातेवाईक यांची घरे, क्लब आणि रेस्टॉरंन्ट यांसारख्या ठिकाणाहून रस्त्याने प्रवाशांची ने–आण करणाऱ्या खासगी कार, टॅक्सी यांना चालवण्यास मुभा देण्यात येईल, परंतु मतदान केंद्राजवळ वाहने चोरटेपणाने आणण्यास मुभा देता येणार नाही.

**मतदानाच्या आणि मतमोजणीच्या दिवशी राजकीय पक्षाचा नेता, मतदान व मतमोजणी प्रक्रियेचे पर्यवेक्षण (देखरेख व संनियंत्रण) करण्याच्या प्रयोजनाकरिता खासगी फिक्स विंग विमानाचा व हेलिकॉप्टरचा वापर करून शकतो काय?**

नाही, एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्याला मतदान व मतमोजणीच्या दिवशी, मतदानाचे व मतमोजणी प्रक्रियेचे पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्याच्या प्रयोजनाकरिता खासगी फिक्सड–विंग विमान व हेलिकॉप्टरचा वापर करण्यास मुभा असणार नाही.

**टीप :–** काय करावे किंवा काय करू नये यांची वरील सूची केवळ वानगीदाखल असून ती सर्वसमावेशक नाही. वरील विषयावरील इतर तपशीलवार आदेश, निर्देश/सूचना यांना पर्यायी असणार नाही. त्यांचे काटेकोर पालन करावेच लागेल. याबाबती कोणतीही शंका असेल तर, भारताचा निवडणूक आयोग/आपल्या राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण/मान्यता मिळवण्यात यावी.

**(स्रोत: मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, मुंबई)** ■■



# २००९ आणि २०१४ : लोकसभा निवडणूक

**अभ्यासक, पत्रकार, वाचक, राजकीय पक्ष, निवडणुकीतील उमेदवार यांना तत्काळ संदर्भासाठी २००९ आणि २०१४ च्या लोकसभा निवडणुकीतील सर्व मतदारसंघांची माहिती उपयुक्त ठरेल. यामध्ये दोन्ही निवडणुकीतील एकूण मतदार, एकूण झालेले मतदान आणि प्रमुख पक्षांचे उमेदवार व त्यांना मिळालेल्या मतांचा समावेश आहे. त्याचबरोबर २०१९ मधील मतदार नोंदणीची आकडेवारीही देण्यात आली आहे. तथापि अचूक माहितीसाठी भारत निवडणूक आयोगाचे http://eci.gov.in आणि राज्य निवडणूक अधिकारी यांचे ceo.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ पाहावे.**

## नंदूरबार (१)



**विधानसभा क्षेत्र :** १. अक्कलकुआ, २. शहादा, ३. नंदूरबार, ४. नवापूर, ५. साक्री, ९. शिरपूर.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८५०४४४
पुरूष – ९३४२०९, महिला – ९१६२१३, इतर – २२

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १६,७२,९४३, झालेले मतदान – ११,१७०२४ (६६.७७%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | डॉ. गावित हिना विजयकुमार | भारतीय जनता पक्ष | ५७९४८६ |
| २. | गावित माणिकराव होडल्या | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४७२५८१ |
| ३. | वसावे अमित शेकलाल | बसपा | १२१३३ |
| ४. | ॲड. सोबजी देवळ्या गावित | अपक्ष | ९१८४ |
| ५. | सी.एस.वळवी | अपक्ष | ६००४ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १४५५५४३ , झालेले मतदान – ७६६२४०

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | गावित माणिकराव होडल्या | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २७५९३६ |
| २ | गावित शरद कृष्णराव | समाजवादी पक्ष | २३५०९३ |
| ३ | नटवडकर सुहास जयवंत | भारतीय जनता पक्ष | १९५९८७ |
| ४ | कोळी राजू रामदास | अपक्ष | ३१५५६ |
| ५ | पाडवी बबिता कर्मसिंह | बहुजन समाज पक्ष | ११७८० |

## धुळे (२)

**विधानसभा क्षेत्र :** ६. धुळे ग्रामीण, ७. धुळे शहर, ८. सिंदखेडा, ११४. मालेगाव मध्य, ११५. मालेगाव बाह्य, ११६. बागलाण.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८७४३१०
पुरूष – ९७८४३५, महिला – ८९५८५७
इतर – १८

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १६,७५,३६७, झालेले मतदान – ९,८३,११६ (५८.६८%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | डॉ. भामरे सुभाष रामराव | भारतीय जनता पक्ष | ५२९४५० |
| २. | अम्रीशभाई रसिकलाल पटेल | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३९८७२७ |
| ३. | इशी योगेश यशवंत | बसपा | ९८९७ |
| ४. | अन्सारी निहाल अहमद महंमद हरून | आप | ९३३९ |
| ५. | रमेश राघो मोरे | अपक्ष | ८०५७ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५७५२२५, झालेले मतदान – ६६९९०६

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | सोनावणे प्रताप नारायणराव | भारतीय जनता पक्ष | २६३२६० |
| २ | अमरिशभाई रसिकलाल पटेल | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २४३८४१ |
| ३ | निहाल अहमद मौलवी | जनता दल (एस) | ७२७३८ |
| ४ | अनिल अण्णा गोटे | एलकेएसपी | ५३६३७ |
| ५ | रिझवान मो. अकबर | बसपा | ११६०६ |

## जळगाव (३)

**विधानसभा क्षेत्र :** १३. जळगाव शहर, १४. जळगाव ग्रामीण, १५.अमळनेर, १६. एरंडोल, १७. चाळीसगाव, १८ पाचोरा



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १९०९७३५
पुरूष – १००१२४९, महिला – ९०८४२७
इतर – ५९

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १७,०७,९६९ झालेले मतदान – ९,९०,६०४ (५८.%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | एन.टी.नाना पाटील | भारतीय जनता पक्ष | ६४७७७३ |
| २. | अन्नासाहेब डॉ. सतीश भास्कर पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | २६४२४८ |
| ३. | बागूल व्ही.टी. | बसपा | १०८३८ |
| ४. | विजय भिमराव निकम | अपक्ष | ९६१४ |
| ५. | ललित गौरीशंकर शर्मा | अपक्ष | ८१४० |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५४९३९१, झालेले मतदान – ६५६५७३

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | ए.टी.नाना पाटील | भारतीय जनता पक्ष | ३४३६४७ |
| २. | ॲड. वसंतराव जीवनराव मोरे | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | २४७६२७ |
| ३. | वाघ सुधाकर आत्माराम | अपक्ष | १९२०६ |
| ४. | ॲड. मतीन अहमद | बसपा | १२९८१ |
| ५. | सलिमोद्दीन इशामोद्दीन शे.(मिस्त्री) | अपक्ष | १०७९६ |

## रावेर (४)



**विधानसभा क्षेत्रे :** १०. चोपडा, ११. रावेर, १२. भुसावळ, १९. जामनेर, २०. मुक्ताईनगर, २१. मलकापूर.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १७६०१७५, पुरूष – ९१७४८८, महिला – ८४२६६१ इतर – २६

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १५,९३,३८९ , झालेले मतदान –१०,११,४१७ (६३.४८%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | खडसे रक्षा निखील | भारतीय जनता पक्ष | ६०५४५२ |
| २. | मनिषदादा जैन | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | २८७३८४ |
| ३. | भांडे दशरथ मोतीराम | बसपा | २९७५२ |
| ४. | डॉ.उल्हास वासुदेव पाटील | अपक्ष | २१३३२ |
| ५. | मनिषदादा सतिश जैन | अपक्ष | १४५९९ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १४१८६९१, झालेले मतदान – ७२०००६

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | हरिभाऊ माधव जावळे | भारतीय जनता पक्ष | ३२८८४३ |
| २ | ॲड. रवींद्र प्रल्हादराव पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | ३००६२५ |
| ३ | पाटील सुरेश चिंधू | बहुजन समाज पक्ष | ३३६४१ |
| ४ | तेली शेख इस्माईल हाजी हसन | बी बी एम | ११५१० |
| ५ | सुजाता इब्राहिम तडवी | अपक्ष | ६२६७ |

## बुलडाणा (५)

**विधानसभा क्षेत्रे :** २२. बुलडाणा, २३. चिखली, २४. सिंदखेड राजा, २५. मेहकर, २६. खामगाव, २७. जळगाव जामोद.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १७४५८२६, पुरूष – ९१५५४३, महिला – ८३०२७५ इतर – ८



**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार– १५,९५,४३५, झालेले मतदान– ९,७८,८७६ (६१.३५%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | जाधव प्रतापराव गणपतराव | शिवसेना | ५०९१४५ |
| २. | इंगळे कृष्णराव गणपतराव | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | ३४९५६६ |
| ३. | अब्दुल हफीज अब्दुल अजीज | बसपा | ३३७८३ |
| ४. | बाळासाहेब शंकर दराडे | अपक्ष | २९७९३ |
| ५. | संदेश अशोक आंबेडकर | बीएमयुपी | ७९२७ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १३८२७३६, झालेले मतदान – ८५३१३३

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | जाधव प्रतापराव गणपतराव | शिवसेना | ३५३६७१ |
| २. | शिंगणे डॉ. राजेंद्रराव भास्करराव | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | ३२५५९३ |
| ३. | दांडगे वसंतराव सुखदेव | बहुजन समाज पक्ष | ८१७६३ |
| ४. | ढोकणे रवींद्र तुळशीरामजी | बी बी एम | ३१०३४ |
| ५. | सै.बिलाल सै. उस्मान | अपक्ष | १६४०५ |

## अकोला (६)



**विधानसभा क्षेत्रे :** २८. अकोट, २९. बाळापूर, ३०. अकोला वेस्ट, ३१. अकोला ईस्ट, ३२. मुर्तीजापूर, ३३. रिसोड.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८५४७८३, पुरूष – ९६२५७९, महिला – ८९२१६० इतर – ४४

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार –१६,७२,६४३ , झालेले मतदान –९,७८,६३० (५८.५१%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | धोत्रे संजय शामराव | भारतीय जनता पक्ष | ४५६४७२ |
| २. | पटेल हिदायत उल्ला बरकत उल्ला | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | २५३३५६ |
| ३. | आंबेडकर प्रकाश यशवंत | भारीप बहुजन महासंघ | २३८७७६ |
| ४. | अजय पंजाबराव हिंगणकर | आप | ८०७६ |
| ५. | भाई बी.सी.कांबळे | बसपा | ७८५८ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १४८०६०६, झालेले मतदान – ७३८९५५

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | धोत्रे संजय शामराव | भारतीय जनता पक्ष | २८७५२६ |
| २. | आंबेडकर प्रकाश यशवंत | भारिप बहुजन महासंघ | २२२६७८ |
| ३. | बाबासाहेब धाबेकर | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १८२७७६ |
| ४. | मुजाहिद खान चांद खान | अपक्ष | २२६६६ |
| ५. | वासुदेवराव खाडे गुरुजी | अपक्ष | ८२६६ |

## अमरावती (७)

**विधानसभा क्षेत्रे :** ३७. बडनेरा, ३८. अमरावती, ३९. तिवसा, ४०. दर्यापूर, ४१. मेळघाट, ४२. अचलपूर.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८१२४४९
पुरूष – ९३५०९०
महिला – ८७७३२३
इतर – ३६



**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार– १६,१२,७३९, झालेले मतदान– १०,०४,५४२ (६२.२९%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | अडसूळ आनंदराव विठोबा | शिवसेना | ४६७२१२ |
| २. | नवनीत रवी राणा | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | ३२९२८० |
| ३. | गुणवंत सुदामराव देवपारे | बसपा | ९८२०० |
| ४. | डॉ.राजेंद्र रामकृष्ण गवई | आर.पी.आय. | ५४२७८ |
| ५. | राजू महादेवराव सोनोने | अपक्ष | १००५२ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १४२३८५५, झालेले मतदान – ७३२४९२

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | अडसुळ आनंदराव विठोबा | शिवसेना | ३१४२८६ |
| २. | गवई राजेंद्र रामकृष्ण | आर.पी.आय. | २५२५७० |
| ३. | डॉ. राजीव गुलाबराव जामठे | अपक्ष | ६४४३८ |
| ४. | गंगाधर गाडे | बसपा | ४१७७५ |
| ५. | प्रा. मुकुंद विठ्ठलराव खैरे | अपक्ष | १५९१२ |

## वर्धा (८)



**विधानसभा क्षेत्रे :** ३६. धामनगाव रेल्वे, ४३. मोर्शी, ४४. आर्वी, ४५. देवळी, ४६. हिंगणघाट, ४७. वर्धा.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १७२३२९५, पुरूष – ८८४८५७, महिला – ८३८४१३
इतर – २५

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १५६४५५२, झालेले मतदान – १०१३६०८ (६४.७९%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | रामदास चंद्रभानजी तडस | भारतीय जनता पक्ष | ५३७५१८ |
| २. | मेघे सागर दत्तात्रय | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३२१७३५ |
| ३. | चेतन भिमराज पेंदाम | बसपा | ९०८६६ |
| ४. | मो.अलिम पटेल मो.वाहिद | आप | १५७३८ |
| ५. | उबाळे श्रीकृष्ण चंपतराव | ए.आर.पी. | ६४०५ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १४०८७८१, झालेले मतदान – ७६९१३२

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | मेघे दत्ता | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३५२८५३ |
| २. | सुरेश गणपतराव वाघमारे | भारतीय जनता पक्ष | २५६९३५ |
| ३. | कंगाले बिपीन बाबासाहेब | बहुजन समाज पक्ष | १३१६४३ |
| ४. | सारंग प्रकाशराव यावलकर | अपक्ष | ७६८६ |
| ५. | दिवटे रमेश माधवराव | केएम | ३९२१ |

## रामटेक (९)

**विधानसभा क्षेत्रे :** ४८. काटोल, ४९. सावनेर, ५०. हिंगणा, ५१. उमरेड, ५८. कामठी, ५९. रामटेक.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८९७६२३
पुरूष – ९८५५३९
महिला – ९१२०६१
इतर – २३

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १६७७२६६ , झालेले मतदान – १०५०६४० (६२.६४%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | कृपाल बालाजी तुमाने | शिवसेना | ५१९८९२ |
| २. | मुकुल वासनिक | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३४४१०१ |
| ३. | किरण प्रेमकुमार रोडगे (पाटणकर) | बसपा | ९५०५१ |
| ४. | प्रताप गोस्वामी | आप | २५८८९ |
| ५. | गौतम श्रीराम वासनिक | अपक्ष | ६३५३ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५०२९००, झालेले मतदान – ७६४७१२

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | वासनिक मुकुल बाळकृष्ण | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३११६१४ |
| २. | तुमाने कृपाल बालाजी | शिवसेना | २९४९१३ |
| ३. | टेंभुर्णे प्रकाशभाऊ किशन | बहुजन समाज पक्ष | ६२२३८ |
| ४. | कुंभारे सुलेखा नारायण | बीआरईएम | ४१३७६ |
| ५. | ढोणे अनिल | अपक्ष | ११७९७ |

## नागपूर (१०)



**विधानसभा क्षेत्रे :** ५२. नागपूर साऊथ वेस्ट, ५३. नागपूर साऊथ, ५४. नागपूर ईस्ट, ५५. नागपूर सेंट्रल, ५६. नागपूर वेस्ट, ५७. नागपूर नॉर्थ.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – २१२६५७४, पुरूष – १०८०५७४, महिला – १०४५९३४, इतर – ६६

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १९००७८४, झालेले मतदान – १०८५७६५ (५७.१२%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | गडकरी नितीन जयराम | भारतीय जनता पक्ष | ५८७७६७ |
| २. | विलास मुत्तेमवार | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३०२९१९ |
| ३. | डॉ.मोहन रामराव गायकवाड | बसपा | ९६४३३ |
| ४. | अंजली अनिष दमानिया | आप | ६९०८१ |
| ५. | कविता विनोदकुमार तिबडीवाल | अपक्ष | २४०८ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १७३८९२०, झालेले मतदान – ७५५३६९

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | मुत्तेमवार विलास बाबुराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३१५१४८ |
| २. | पुरोहित बनवारीलाल भगवानदास | भारतीय जनता पक्ष | २९०७४९ |
| ३. | इंजिनियर माणिकराव वैद्य | बहुजन समाज पक्ष | ११८७४१ |
| ४. | डॉ. यशवंत मनोहर | बीबीएम | ४४५५ |
| ५. | ॲड. उपाशा बन्सी तायवाडे | अपक्ष | २८०० |

## भंडारा – गोंदिया (११)

**विधानसभा क्षेत्रे :** ६०. तुमसर, ६१. भंडारा, ६२. साकोली, ६३. अर्जूनी मोरगाव, ६४. तिरोडा, ६५. गोंदिया.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १७९१६५३
पुरूष – ८९७४४०
महिला – ८९४२१२
इतर – १

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १६५५८५२ , झालेले मतदान – ११९७३९८ (७२.३१%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | नानाभाऊ फाल्गुनराव पटोले | भारतीय जनता पक्ष | ६०६१२९ |
| २. | पटेल प्रफुल्ल मनोहरभाई | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४५६८७५ |
| ३. | इंजि.संजय रघुनाथ नासरे | बसपा | ५०९५८ |
| ४. | डॉ.दादासाहेब उर्फ धनु भिकाजी वालथरे | अपक्ष | १०१३३ |
| ५ | मोरेश्वर रामजी मेश्राम | अपक्ष | १०१२७ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १४५०४७७, झालेले मतदान – १०३०७५०

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | पटेल प्रफुल मनोहरभाई | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४८९८१४ |
| २. | नानाभाऊ फाल्गुनराव पटोले | अपक्ष | २३७८९९ |
| ३. | पटले शिशुपाल नथ्थुजी | भारतीय जनता पक्ष | १५८९३८ |
| ४. | जयस्वाल विरेंद्र कुमार कस्तुरचंद | बहुजन समाज पक्ष | ६८२४६ |
| ५. | प्रो.डॉ.भास्करराव महादेवराव जीभकाटे | अपक्ष | ९२४३ |

## गडचिरोली – चिमूर (१२)



**विधानसभा क्षेत्रे :** ६६. आमगाव, ६७. आरमोरी, ६८. गडचिरोली, ६९. अहेरी, ७३. ब्रम्हपूरी, ७४. चिमूर.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १५६८५३३ पुरूष – ७९४७४९, महिला – ७७३७८२ इतर – २

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १४६८४३७, झालेले मतदान – १०२८४६२ (७०.०४%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | अशोक महादेवराव नेते | भारतीय जनता पक्ष | ५३५९८२ |
| २. | डॉ.नामदेव दल्लूजी उसंडी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २९९११२ |
| ३. | रामराव गोविंदा नन्नावरे | बसपा | ६६९०६ |
| ४. | डॉ.गजबे रमेशकुमार बाबुरावजी | आप | ४५४५८ |
| ५. | नामदेव आनंदराव कन्नाके | सी.पी.आय. | २२५१२ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १२८५३८७, झालेले मतदान – ८३७२४७

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | कोवासे मारोतराव सैनुजी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३२१७५६ |
| २. | अशोक महादेवराव नेते | भारतीय जनता पक्ष | २९३१७६ |
| ३. | आत्राम राजे सत्यवानराव | बहुजन समाज पक्ष | १३५७५६ |
| ४. | दिनेश तुकाराम मडावी | अपक्ष | २५८५७ |
| ५. | नामदेव आनंदराव कण्णाके | सीपीआय | २३००१ |

## चंद्रपूर (१३)

**विधानसभा क्षेत्रे :** ७०. राजूरा, ७१. चंद्रपूर, ७२. बल्लारपूर, ७५. वरोरा, ७६. वणी, ८०. आर्णी.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८८९८९७ पुरूष – ९७७५०२, महिला – ९१२३८१ इतर – १४

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १७५३६९०, झालेले मतदान – ११०९८८८ (६३.२९%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | अहीर हंसराज गंगाराम | भारतीय जनता पक्ष | ५०८०४९ |
| २. | देवतळे संजय वामनराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २७१७८० |
| ३. | चटप वामनराव सदाशिव | आप | २०४४१३ |
| ४. | कुंभारे हंसराज गुलाब | बसपा | ४९२२९ |
| ५. | प्रमोद मंगरूजी सोरटे | अपक्ष | १०९३० |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५३६३५२, झालेले मतदान – ८९८५११

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | अहिर हंसराज गंगाराम | भारतीय जनता पक्ष | ३०१४६७ |
| २. | पुगलिया नरेश | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २६८९७२ |
| ३. | चटप वामन सदाशिवराव | एस.बी.पी. | १६९११२ |
| ४. | ॲड. हजारे दत्ताभाऊ कृष्णराव | बहुजन समाज पक्ष | ५७५१९ |
| ५. | खोब्रागडे देशक गिरीषबाबू | बीबीएम | २०५४१ |

## यवतमाळ – वाशिम (१४)



**विधानसभा क्षेत्रे :** ३४. वाशिम, ३५. कारंजा, ७७. राळेगाव, ७८. यवतमाळ, ७९. दिग्रस, ८१. पुसद.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८९०८२९ पुरूष – ९८२४५१, महिला – ९०८३५१ इतर – २७

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १७५५२९२ , झालेले मतदान – १०३३४०२ (५८.८७%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | गवळी भावना पुंडलिकराव | शिवसेना | ४७७९०५ |
| २. | ॲड. शिवाजीराव शिवरामजी मोघे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३८४०८९ |
| ३. | राठोड बळीराम परशराम | बसपा | ४८९८१ |
| ४. | राजू उर्फ भरतराजे उद्धवराव पाटील | मनसे | २६१९४ |
| ५. | मोहन मल्लू राठोड | बी.बी.एम. | २२१४३ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५५४०४२, झालेले मतदान – ८४००६४

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | भावना गवळी (पाटील) | शिवसेना | ३८४४४३ |
| २. | हरिसिंग राठोड | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३२७४९२ |
| ३. | एडतकर दिलीप लक्ष्मणराव | बहुजन समाज पक्ष | ६२७८१ |
| ४. | उत्तम भागजी कांबळे | पीआरबीपी | ८१९२ |
| ५. | मणियार युनूस महंमद झैहमी | एयुडीएफ | ७४१२ |

## हिंगोली (१५)

**विधानसभा क्षेत्रे :** ८२. उमरखेड, ८३. किनवट, ८४. हादगाव, ९२. बसमत, ९३. कळमनूरी, ९४. हिंगोली.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १७१६७४७ पुरूष – ८९७९४४, महिला – ८१८७९१ इतर – १२

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १५८६१९४ , झालेले मतदान – १०५१४७७ (६६.२९%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | राजीव शंकरराव सातव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४६७३९७ |
| २. | वानखेडे सुभाष बापूराव | शिवसेना | ४६५७६५ |
| ३. | जाधव चुन्नीलाल मोहन | बसपा | २५१४५ |
| ४. | डी.बी.नाईक | सी.पी.एम. | १४९८६ |
| ५. | उत्तमराव पांडूरंग राठोड | बी.एम.यु.पी. | ९७७० |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १३६९७७४, झालेले मतदान – ८१७४६७

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | सुभाष बापुराव वानखेडे | शिवसेना | ३४०१४८ |
| २. | सुर्यकांता जयवंतराव पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | २६६५१४ |
| ३. | डॉ. बी. डी. चव्हाण | बहुजन समाज पक्ष | १११३५७ |
| ४. | नाईक माधवराव | बीबीएम | ५२३२९ |
| ५. | पाचपुते रामप्रसाद कृष्णराव | अपक्ष | १०१७६ |

## नांदेड (१६)



**विधानसभा क्षेत्रे :** ८५. भोकर, ८६. नांदेड नॉर्थ, ८७. नांदेड साऊथ, ८९. नायगाव, ९०. देगलूर, ९१. मुखेड.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १७००९९१
पुरूष – ८८३१३८
महिला – ८१७७९५
इतर – ५८

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १६८७०५७ , झालेले मतदान – १०१४०२० (६०.११%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | अशोक शंकरराव चव्हाण | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४९३०७५ |
| २. | डी.बी.पाटील | भारतीय जनता पक्ष | ४११६२० |
| ३. | राजरत्न आंबेडकर | बी.एम.यु.पी. | २८४४७ |
| ४. | डॉ.हंसराज दादारावजी वैद्य | बसपा | २२८०९ |
| ५. | फिरोजखान गाझी | अपक्ष | ८०८८ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १४३९०१५, झालेले मतदान – ७७४५९०

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | खतगावकर पाटील भास्करराव बापूराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३४६४०० |
| २. | संभाजी पवार | भारतीय जनता पक्ष | २७१७८६ |
| ३. | मोहम्मद मकबुल सलीम हाजी मो. ख्याजा | बहुजन समाज पक्ष | ८४७४३ |
| ४. | शिंदे प्रीती मधुकर | जेएसएस | १५१४० |
| ५. | अल्ताफ अहमद इक्बाल अहमद | बीबीएम | १०६२९ |

## परभणी (१७)

**विधानसभा क्षेत्रे :** ९५. जिंतूर, ९६. परभणी, ९७. गंगाखेड, ९८. पाथरी, ९९. परतूर, १००. घनसावंगी.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १९७०९५४
पुरूष – १०२६७६५
महिला – ९४४१८१
इतर – ८

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १८०३७९२ , झालेले मतदान – ११६२३७१ (६४.४४%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | जाधव संजय हरिभाऊ (बंडू) | शिवसेना | ५७८४५५ |
| २. | भांबळे विजय माणिकराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४५१३०० |
| ३. | गुलमिर खान | बसपा | ३३७१६ |
| ४. | कॉ. राजन क्षीरसागर | सी.पी.आय. | १२४०४ |
| ५. | निझर सुभान खान पठाण | अपक्ष | १२३४१ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १६१००८८, झालेले मतदान – ८७०७२६

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | ॲड. दुधगावकर गणेशराव नागोराव | शिवसेना | ३८५३८७ |
| २. | वरपूडकर सुरेश अंबादासराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३१९९६९ |
| ३. | राजश्री बाबासाहेब जमागे | बहुजन समाज पक्ष | ६४६११ |
| ४. | मुळे बबन दत्ताराव | आरएसपी | ११८६१ |
| ५. | राठोड रामराव धनसिंग सर | अपक्ष | १०७१८ |

## जालना (१८)



**विधानसभा क्षेत्रे :** १०१. जालना, १०२. बदनापूर, १०३. भोकरदन, १०४. सिल्लोड, १०६. फुलंब्री, ११०. पैठण.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८४३१३१
पुरूष – ९७७७४९, महिला – ८६५३७६
इतर – ६

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार –१६१२०५६, झालेले मतदान – १०६६३७५ (६६.१५%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | दानवे रावसाहेब दादाराव | भारतीय जनता पक्ष | ५९१४२८ |
| २. | औताडे विलास केशवराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३८४६३० |
| ३. | डॉ.वानखेडे शरदचंद्र गणपतराव | बसपा | २३७१९ |
| ४. | एम.जावेद म.वहाब | अपक्ष | ७७०४ |
| ५. | नडे ज्ञानेश्वर दगडूजी | अपक्ष | ६९५३ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १४२६२५५, झालेले मतदान – ७९७१२७

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | दानवे रावसाहेब दादाराव | भारतीय जनता पक्ष | ३५०७१० |
| २. | डॉ. काळे कल्याण वैजनाथराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३४२२२८ |
| ३. | राठोड राजपालसिंग गबरुसिंग | बहुजन समाज पक्ष | ३५९७६ |
| ४. | खंडू हरीश्चंद्र लाघने | अपक्ष | १३४०८ |
| ५. | कोलते मनोज नेमीनाथ | अपक्ष | १२००० |

## औरंगाबाद (१९)

**विधानसभा क्षेत्रे :** १०५. कन्नड, १०७.औरंगाबाद सेंट्रल, १०८. औरंगाबाद वेस्ट, १०९. औरंगाबाद ईस्ट, १११. गंगापूर, ११२. वैजापूर.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८५७६४५
पुरूष – ९७८८००, महिला – ८७८८२७
इतर – १८

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १५८९३९५ , झालेले मतदान – ९८३०५७ (६१.८५%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | चंद्रकांत भाऊराव खैरे | शिवसेना | ५२०९०२ |
| २. | पाटील नितीन सुरेश | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३५८९०२ |
| ३. | जेवरीकर इंद्रकुमार ज्ञानोबा | बसपा | ३७४१९ |
| ४. | सुभाष कल्याणराव लोमटे | आप | ११९७४ |
| ५. | त्रिभूवन मधुकर पद्माकर | अपक्ष | ६१३५ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १४१७९६४, झालेले मतदान – ७३११४७

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | चंद्रकांत भाऊराव खैरे | शिवसेना | २५५८९६ |
| २. | उत्तमसिंग राजधरसिंग पवार | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २२२८८२ |
| ३. | शांतिगिरीजी मुंगेरीजी महाराज | अपक्ष | १४८०२६ |
| ४. | सय्यद सलीम सय्यद युसूफ | बहुजन समाज पक्ष | ३२६४१ |
| ५. | सुभाष किसनराव पाटील (जाधव) | अपक्ष | १७०२६ |

## दिंडोरी (२०)



**विधानसभा क्षेत्रे :** ११३. नांदगाव, ११७. कळवण, ११८. चांदवड, ११९. येवला, १२१. निफाड, १२२. दिंडोरी.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १७०१०४०

पुरूष – ८८७५३६, महिला – ८१३४९९

इतर – ५

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १५३०२०८, झालेले मतदान – ९७०३१६ (६३.४१%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | चव्हाण हरिश्चंद्र देवराम | भारतीय जनता पक्ष | ५४२७८४ |
| २. | डॉ.भारती प्रवीण पवार | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | २९५१६५ |
| ३. | कॉ. हेमंत मोतीराम वाघेरे | सी.पी.एम. | ७२५९९ |
| ४. | माळी शरद साहेबराव | बसपा | १७७२४ |
| ५. | गायकवाड अभिजित कल्याणराव | अपक्ष | १०२६७ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १४३२९३८, झालेले मतदान – ६८१६२३

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | चव्हाण हरिश्चंद्र देवराम | भारतीय जनता पक्ष | २८१२५४ |
| २. | झिरवळ नरहरी सिताराम | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | २४३९०७ |
| ३. | गावीत जिवा पांडू | सी.पी.एम. | १०५३५२ |
| ४. | गांगुर्डे दीपक शंकर | बहुजन समाज पक्ष | १७९०२ |
| ५. | शंकर देवराम गांगुर्डे | अपक्ष | ११३७२ |

## नाशिक (२१)

**विधानसभा क्षेत्रे :** १२०. सिन्नर, १२३. नाशिक ईस्ट, १२४. नाशिक सेंट्रल, १२५. नाशिक वेस्ट, १२६. देवळाली, १२७. इगतपुरी.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८५०९४६

पुरूष – ९७२४८७, महिला – ८७८३९२

इतर – ६७

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १५९३७७४, झालेले मतदान – ९३७६०० (५८.८३%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | गोडसे हेमंत तुकाराम | शिवसेना | ४९४७३५ |
| २. | छगन भुजबळ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | ३०७३९९ |
| ३. | डॉ. प्रदीप पवार | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ६३०५० |
| ४. | दिनकर धर्मा पाटील | बसपा | २०८९६ |
| ५. | ॲड. तानाजी सुखदेव जायभावे | सी.पी.एम. | १७१५४ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १४४८४१४, झालेले मतदान – ६५६८९२

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | समीर भुजबळ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | २३८७०६ |
| २. | गोडसे हेमंत तुकाराम | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | २१६६७४ |
| ३. | गायकवाड दत्ता नामदेव | शिवसेना | १५८२५१ |
| ४. | श्रीमहंत सुधीरदास महाराज | बहुजन समाज पक्ष | १७९८० |
| ५. | राजेंद्र संपतराव कडू | अपक्ष | ७९८२ |

## पालघर (२२)



**विधानसभा क्षेत्रे :** १२८. डहाणू, १२९. विक्रमगड,१३०. पालघर, १३१. बोईसर, १३२. नालासोपारा, १३३. वसई.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८१२९८३

पुरूष – ९४९५९२, महिला – ८६३३०१

इतर – ९०

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १५७८१४९, झालेले मतदान – ९९२७७० (६२.९१%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | ॲड. चिंतामण नवशा वनगा | भारतीय जनता पक्ष | ५३३२०१ |
| २. | बळीराम सुकुर जाधव | बहुजन विकास आघाडी | २९३६८१ |
| ३. | खरपडे लडक्या रूपा | मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष | ७६८९० |
| ४. | पांडूरंग जेठ्या पारधी | आप | १६९८२ |
| ५. | हरिभाऊ सोमा वरठा | अपक्ष | १२९७४ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५२३०६१, झालेले मतदान – ७३२५८७

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | जाधव बळीराम सुकुर | बहुजन विकास आघाडी | २२३२३४ |
| २. | ॲड. चिंतामण वनगा | भारतीय जनता पक्ष | २१०८७४ |
| ३. | शिंगडा दामोदर बारकू | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १६०५७० |
| ४. | कोम लहानू शीदवा | सीपीएम | ९२२२४ |
| ५. | पांडुरंग जेठ्या पारधी | अपक्ष | २०३६३ |

## भिवंडी (२३)

**विधानसभा क्षेत्रे :** १३४. भिवंडी ग्रामीण, १३५. शहापूर, १३६. भिवंडी वेस्ट, १३७. भिवंडी ईस्ट, १३८. कल्याण वेस्ट, १३९. मुरबाड.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८५८२४७

पुरूष – १०२०९१६, महिला – ८३७२१८

इतर – ११३

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १६९६५८४ , झालेले मतदान – ८७५८१४ (५१.६२%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | कपील मोरेश्वर पाटील | भारतीय जनता पक्ष | ४११०७० |
| २. | पाटील विश्वनाथ रामचंद्र | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ३०१६२० |
| ३. | सुरेश (बाळ्यामामा) गोपीनाथ म्हात्रे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ९३६४७ |
| ४. | अन्सारी मुमताज अब्दूल सत्तार | बसपा | १४०६८ |
| ५. | मधुकर विठ्ठल पाटील | सी.पी.आय. | १३७२० |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १४८३१७६, झालेले मतदान – ५८४२६३

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | टावरे सुरेश काशिनाथ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १८२७८९ |
| २. | पाटील जगन्नाथ शिवराम | भारतीय जनता पक्ष | १४१४२५ |
| ३. | देवराज किसन म्हात्रे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १०७०९० |
| ४. | विश्वनाथ आर. पाटील | अपक्ष | ७७७६९ |
| ५. | आर. आर. पाटील | समाजवादी पक्ष | ३२७६७ |

## कल्याण (२४)



**विधानसभा क्षेत्रे :** १४०. अंबरनाथ, १४१. उल्हासनगर, १४२. कल्याण ईस्ट, १४३. डोंबिवली, १४४. कल्याण रूरल, १४९. मुंब्रा – कळवा.

**२०१९ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – १९२७६०८
पुरूष – १०४०७९३, महिला – ८८६६३१
इतर – १८४

**२०१४ निवडणूक**
एकूण मतदार – १९२२०३४ , झालेले मतदान – ८२५४१४ (४२.९४%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे | शिवसेना | ४४०८९२ |
| २. | आनंद प्रकाश परांजपे | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | १९०१४३ |
| ३. | प्रमोद (राजु) रतन पाटील | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १२२३४९ |
| ४. | नरेश अरविंद ठाकूर | आप | २०३४७ |
| ५. | किरटकर दयानंद तुळशीराम | बसपा | १९६४३ |

**२००९ निवडणूक**
एकूण मतदार – १५८८५०७, झालेले मतदान – ५४४८२८

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | आनंद प्रकाश परांजपे | शिवसेना | २१२४७६ |
| २. | डावखरे वसंत शंकरराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | १८८२७४ |
| ३. | वैशाली दरेकर-राणे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १०२०६३ |
| ४. | खान कमरुद्दीन अ. गनी | बहुजन समाज पक्ष | १५७०९ |
| ५. | ॲड.एस.एस.साळवे (नि.न्यायाधीश) | बीबीएम | ३२४२ |

## ठाणे (२५)

**विधानसभा क्षेत्रे :** १४५. मिरा भायंदर, १४६. ओवळा-माजिवाडा, १४७. कोपरी – पाचपाखाडी, १४८. ठाणे, १५०. ऐरोली १५१. बेलापूर.



**२०१९ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – २३०७२३२
पुरूष – १२६००८१, महिला – १०४७१०८
इतर – ४३

**२०१४ निवडणूक**
एकूण मतदार – २०७३२५१, झालेले मतदान – १०५४५७५ (५०.८७%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | विचारे राजन बाबुराव | शिवसेना | ५९५३६४ |
| २. | संजीव गणेश नाईक | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३१४०६५ |
| ३. | अभिजित रमेश पानसे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४८८६३ |
| ४. | संजीव विष्णू साने | आप | ४१५३५ |
| ५. | किर्तवडे विद्याधर भिमराव | बसपा | १०९८२ |

**२००९ निवडणूक**
एकूण मतदार – १८०६८०३, झालेले मतदान – ७४९८७३

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | डॉ. संजीव गणेश नाईक | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३०१००० |
| २. | चौगुले विजय लक्ष्मण | शिवसेना | २५१९८० |
| ३. | राजन राजे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १३४८४० |
| ४. | अवनिंद्र कुमार त्रिपाठी | बहुजन समाज पक्ष | १४१९२ |
| ५. | विघाधर लक्ष्मण जोशी | अपक्ष | ९६८० |

## मुंबई उत्तर (२६)



**विधानसभा क्षेत्रे :** १५२. बोरीवली, १५३. दहीसर, १५४. मागाठाणे, १६०. कांदीवली ईस्ट, १६१. चारकोप, १६२. मालाड वेस्ट.

**२०१९ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – १६०७२६५
पुरूष – ८६९५३५, महिला – ७३७४०६
इतर – ३२४

**२०१४ निवडणूक**
एकूण मतदार – १७८३८७०, झालेले मतदान – ९४६७१७ (५३.०७%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | गोपाल चिन्नाया शेट्टी | भारतीय जनता पक्ष | ६६४००४ |
| २. | संजय ब्रिजकिशोरलाल निरूपम | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २१७४२२ |
| ३. | सतिश पारसमल जैन | आप | ३२३६४ |
| ४. | यादव कमलेश शोभनाथ | एस.पी. | ५५०६ |
| ५. | सिंग अशोक चंद्रपाल | बसपा | ५४३८ |

**२००९ निवडणूक**
एकूण मतदार – १६०८९२४, झालेले मतदान – ६८५०२२

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | संजय ब्रिजकिशोरलाल निरूपम | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २५५१५७ |
| २. | राम नाईक | भारतीय जनता पक्ष | २४९३७८ |
| ३. | पारकर शिरीष लक्ष्मण | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १४७५०२ |
| ४. | लखमेंद्र खुराना | बहुजन समाज पक्ष | ७२०३ |
| ५. | उस्मान थीम | समाजवादी पक्ष | ५३१५ |

## मुंबई उत्तर पश्चिम (२७)

**विधानसभा क्षेत्रे :** १५८. जोगेस्वरी ईस्ट, १५९. दिंडोशी, १६३. गोरेगाव, १६४. वर्सो वा, १६५. अंधेरी वेस्ट, १६६. अंधेरी ईस्ट.



**२०१९ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – १६९७६६८
पुरूष – ९३२७७१, महिला – ७६४८८४
इतर – १३

**२०१४ निवडणूक**
एकूण मतदार – १७७५४१६, झालेले मतदान – ८९७८७१ (५०.५७%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | गजानन चंद्रकांत किर्तीकर | शिवसेना | ४६४८२० |
| २. | कामत गुरूदास वसंत | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २८१७९२ |
| ३. | महेश वामन मांजरेकर | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ६६०८८ |
| ४. | मयंक रमेश गांधी | आप | ५१८६० |
| ५. | भोले पुष्पा मिलींद | बसपा | १०२७५ |

**२००९ निवडणूक**
एकूण मतदार – १६०४९९२, झालेले मतदान – ७०७१३४

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | ॲड. कामत गुरूदास वसंत | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २५३९२० |
| २. | गजानन चंद्रकांत किर्तीकर | शिवसेना | २१५५३३ |
| ३. | ठाकरे शालिनी जितेंद्र | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १२४००० |
| ४. | अबू असीम आझमी | समाजवादी पक्ष | ८४४१२ |
| ५. | अत्तार सिद्दीकी | बहुजन समाजवादी पक्ष | ९७२३ |

## मुंबई उत्तर पूर्व (२८)



**विधानसभा क्षेत्रे :** १५५. मुलुंड, १५६. विक्रोळी, १५७. भांडूप वेस्ट, १६९. घाटकोपर वेस्ट, १७०. घाटकोपर ईस्ट, १७१. मानखुर्द शिवाजीनगर.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १५५८७७४

पुरूष – ८४९४३४, महिला – ७०९२१७

इतर – १२३

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १६६८३५७ , झालेले मतदान – ८६२५२२ (५१.७०%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | किरीट सोमय्या | भारतीय जनता पक्ष | ५२५२८५ |
| २. | संजय दिना पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | २०८१६३ |
| ३. | मेधा पाटकर | आप | ७६४५१ |
| ४. | मच्छिन्द्र हनुमंतराव चाटे | बी.एस.पी. | १७४२७ |
| ५. | प्रा.अविनाश डोळस | बी.बी.एम. | ८८३३ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५७२८९०, झालेले मतदान – ६६७९०४

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | संजय दिना पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | २१३५०५ |
| २. | किरीट सोमय्या | भारतीय जनता पक्ष | २१०५७२ |
| ३. | शिशिर शिंदे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १९५१४८ |
| ४. | अशोक चंद्रपाल सिंग | बहुजन समाज पक्ष | २४९३४ |
| ५. | कोकरे संजय | बीबीएम | ५६१२ |

## मुंबई उत्तर मध्य (२९)



**विधानसभा क्षेत्रे :** १६७. विलेपार्ले, १६८. चांदीवली, १७४. कुर्ला, १७५. कलिना, १७६. वांद्रे ईस्ट, १७७. वांद्रे वेस्ट.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १६४७६३९

पुरूष – ९००१८१, महिला – ७४७४४२

इतर – १६

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १७३७०८४, झालेले मतदान – ८४५४५५ (४८.६७%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | पुनम महाजन | भारतीय जनता पक्ष | ४७८५३५ |
| २. | दत्त प्रिया सुनिल | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २९१७६४ |
| ३. | फिरोज पालखीवाला | आप | ३४८२४ |
| ४. | शिंदे आनंद व्यंकटराव | बसपा | १०१२८ |
| ५. | अबू फरहान आझमी | एस.पी. | ९८७३ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १६८१९८५, झालेले मतदान – ६६४६४७

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | दत्त प्रिया सुनिल | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३१९३५२ |
| २. | महेश राम जेठमलानी | भारतीय जनता पक्ष | १४४७९७ |
| ३. | शिल्पा अतुल सरपोतदार | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १३२५४६ |
| ४. | इब्राहिम शेख | बहुजन समाज पक्ष | ४३४२५ |
| ५. | सुरेखा नारायण पेवेकर | आरएसपी | ७०८५ |

## मुंबई दक्षिण मध्य (३०)



**विधानसभा क्षेत्रे :** १७२. अणुशक्ती नगर, १७३. चेंबूर, १७८. धारावी, १७९. सायन कोळीवाडा, १८०. वडाळा, १८१. माहिम.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १४१५६०५

पुरूष – ७६५४१६, महिला – ६५००९९

इतर – ९०

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १४४७८८६, झालेले मतदान – ७६८७५० (५३.०९%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | राहुल रमेश शेवाळे | शिवसेना | ३८१००८ |
| २. | एकनाथ एम.गायकवाड | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २४२८२८ |
| ३. | आदित्य राजन शिरोडकर | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ७३०९६ |
| ४. | सुंदर बालकृष्णन | आप | २७६८७ |
| ५. | ॲड. अय्यर गणेश | बसपा | १४७६२ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५१५८९९, झालेले मतदान – ५९८८४५

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | एकनाथ एम. गायकवाड | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २५७५२३ |
| २. | सुरेश अनंत गंभीर | शिवसेना | १८१८१७ |
| ३. | श्वेता विवेक परुळकर | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १०८३४१ |
| ४. | बरवे प्रवीण रामचंद्र | बहुजन समाज पक्ष | १८४२७ |
| ५. | राजेंद्र गणपत जाधव | पीआरबीपी | ५९८६ |

## मुंबई दक्षिण (३१)



**विधानसभा क्षेत्रे :** १८२. वरळी, १८३. शिवडी, १८४. भायखळा, १८५. मलबार हिल, १८६. मुंबादेवी, १८७. कुलाबा.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १५३१४४६

पुरूष – ८४२८८९, महिला – ६८८५३७

इतर – २०

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १४८५८४४ , झालेले मतदान – ७७९८५९ (५२.४९%)


| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | अरविंद सावंत | शिवसेना | ३७४६०९ |
| २. | देवरा मिलींद मुरली | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २४६०४५ |
| ३. | बाळा नांदगावकर | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ८४७७३ |
| ४. | मिरा संन्याल | आप | ४०२९८ |
| ५. | प्रकाश रेड्डी | सी.पी.आय. | ६८९७ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५८९८११, झालेले मतदान – ६४१५७१

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | देवरा मिलींद मुरली | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २७२४११ |
| २. | बाळा नांदगावकर | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १५९७२९ |
| ३. | मोहन रावले | शिवसेना | १४६११८ |
| ४. | मोहम्मद अली अबूबकर शेख | बहुजन समाज पर्टी | ३३७९९ |
| ५. | मीरा एच. संन्याल | अपक्ष | १०१५७ |

## रायगड (३२)



**विधानसभा क्षेत्रे :** १९१. पेण, १९२. अलिबाग, १९३. श्रीवर्धन, १९४. महाड, २६३. दापोली, २६४. गुहागर.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १६३७८५३

पुरूष – ८०३०८५, महिला – ८३४७६७

इतर – १

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १५३२७८१, झालेले मतदान – ९८८१९२ (६४.४७%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | अनंत गिते | शिवसेना | ३९६१७८ |
| २. | तटकरे सुनिल दत्तात्रय | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३९४०६८ |
| ३. | रमेशभाई कदम | पी.डब्ल्यू.पी.आय. | १२९७३० |
| ४. | यशवंत जयराम गायकवाड | बसपा | १०५१० |
| ५. | मुजफ्फर जयनुद्दीन चौधरी उर्फ मोदी | अपक्ष | ९९५२ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १३५९८३०, झालेले मतदान – ७६७३६६

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | अनंत गिते | शिवसेना | ४१३५४६ |
| २. | बॅ.ए.आर. अंतुले | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २६७०२५ |
| ३. | ॲड. प्रवीण मधुकर ठाकुर | अपक्ष | ३९१५९ |
| ४. | सुनील भास्कर नाईक | अपक्ष | २२२०० |
| ५. | मोहीते किरण बाबूराव | बहुजन समाज पक्ष | १३०५३ |

## मावळ (३३)

**विधानसभा क्षेत्रे :** १८८. पनवेल, १८९. कर्जत, १९०. उरण, २०४. मावळ, २०५. चिंचवड, २०६. पिंपरी.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – २२२७१३३

पुरूष – ११६५७९०

महिला – १०६१३१०

इतर – ३३

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १९५३७४१, झालेले मतदान – ११७४३८० (६०.११%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे | शिवसेना | ५१२२२६ |
| २. | जगताप लक्ष्मणभाऊ पांडुरंग | पी.डब्ल्यू.पी.आय. | ३५४८२९ |
| ३. | नार्वेकर राहुल सुरेश | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | १८२२९३ |
| ४. | भापकर मारोती साहेबराव | आप | ३०५६६ |
| ५. | भिमपुत्र गायकवाड | बसपा | २५९८२ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १६०४८८६, झालेले मतदान – ७१७६१६

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | बाबर गजानन धरमसी | शिवसेना | ३६४८५७ |
| २. | पानसरे आझम फकीरभाई | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | २८४२३८ |
| ३. | मिश्रा उमाकांत रामेश्वर | बहुजन समाज पक्ष | २०४५५ |
| ४. | भापकर मारुती साहेबराव | अपक्ष | ८७६० |
| ५. | यशवंत नारायण देसाई | अपक्ष | ८२६० |

## पुणे (३४)



**विधानसभा क्षेत्रे :** २०८. वडगाव शेरी, २०९. शिवाजी नगर, २१०. कोथरूड, २१२. पर्वती, २१४. पुणे कॅन्टोनमेंट, २१५. कसबा पेठ.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – २०२४७३१

पुरूष – १०४१७४५, महिला – ९८२९३०

इतर – ५६

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १८३५८३५, झालेले मतदान – ९९३९६६ (५४.१४%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | अनिल शिरोळे | भारतीय जनता पक्ष | ५६९८२५ |
| २. | डॉ. विश्वजित पतंगराव कदम | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २५४०५६ |
| ३. | दिपक नाथाराम पायगुडे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ९३५०२ |
| ४. | वारे सुभाष शंकरराव | आप | २८६५७ |
| ५. | इम्तियाज पिरजादे | बसपा | १४७२७ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १८०६९५३, झालेले मतदान – ७३४६४१

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | कलमाडी सुरेश | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २७९९७३ |
| २. | अनिल शिरोळे | भारतीय जनता पक्ष | २५४२७२ |
| ३. | शिरोळे रणजित श्रीकांत | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ७५९३० |
| ४. | डी.एस.के.ऊर्फ डी.एस.कुलकर्णी | बहुजन समाज पक्ष | ६२९८१ |
| ५. | अरुण भाटीया | पीजीपी | ३०३४० |

## बारामती (३५)

**विधानसभा क्षेत्रे :** १९९. दौंड, २००. इंदापूर, २०१. बारामती, २०२. पुरंदर, २०३. भोर, २११. खडकवासला.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – २०७७२७८

पुरुष – १०९१६३२, महिला – ९८५६२५

इतर – २१

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १८१३५५३ , झालेले मतदान – १०६६९६३ (५८.८३%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | सुप्रिया सुळे | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ५२१५६२ |
| २. | महादेव जगन्नाथ जानकर | आर.एस.पी.एस. | ४५१८४३ |
| ३. | सुरेश खोपडे | आप | २६३९६ |
| ४. | चौधरी काळूराम विनायक | बसपा | २४९०८ |
| ५. | तात्यासाहेब सिताराम तेले | जे.डी.(एस.) | ८८११ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५९३४६०, झालेले मतदान – ७३४०४८

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | सुप्रिया सुळे | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४८७८२७ |
| २. | कांता जयसिंग नलावडे | भारतीय जनता पक्ष | १५०९९६ |
| ३. | कुडाळे–पाटील विवेक अनंत | बहुजन समाज पक्ष | २९८६४ |
| ४. | संपत मारुती टाकळे | आरएसपी | १४९१२ |
| ५. | सुरेश बाबूराव वीर | अपक्ष | ७६०० |

## शिरूर (३६)



**विधानसभा क्षेत्रे :** १९५. जुन्नर, १९६. आंबेगाव, १९७. खेड आळंदी, १९८. शिरूर, २०७. भोसरी, २१३. हडपसर.

**२०१९ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – २१११४६५
पुरूष – १११२३९८, महिला – ९९९०६६
इतर – ३१

**२०१४ निवडणूक**
एकूण मतदार – १८२४११२, झालेले मतदान – १०८९५७३ (५९.७३%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | आढळराव शिवाजी दत्तात्रय | शिवसेना | ६४३४१५ |
| २. | निकम देवदत्त जयवंत | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३४१६०१ |
| ३. | अशोक श्रीपती खांडेभराड | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ३६४४८ |
| ४. | वाघमारे सर्जेराव भिका | बसपा | १९७८३ |
| ५. | निकम सोपानराव पंढरीनाथ | आप | १६६६३ |

**२००९ निवडणूक**
एकूण मतदार – १६३०४६६, झालेले मतदान – ८३८७२८

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | आढळराव शिवाजी दत्तात्रय | शिवसेना | ४८२५६३ |
| २. | विलास विठोबा लांडे | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३०३९५२ |
| ३. | झगडे यशवंत सीताराम | बहुजन समाज पक्ष | १७४३९ |
| ४. | लांडे विलास म्हातारबा | अपक्ष | १४१९६ |
| ५. | राम धर्मा डंबाळे | अपक्ष | ४५४१ |

## अहमदनगर (३७)

**विधानसभा क्षेत्रे :** २२२. शेवगाव, २२३. राहूरी, २२४. पारनेर, २२५. अहमदनगर शहर, २२६. श्रीगोंदा, २२७. कर्जत जामखेड.

**२०१९ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – १८३१५३८
पुरूष – ९६०३९२, महिला – ८७१०६६
इतर – ८०



**२०१४ निवडणूक**
एकूण मतदार – १७०५००५, झालेले मतदान – १०६२७८० (६२.३३%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | गांधी दिलीपकुमार मनसुखलाल | भारतीय जनता पक्ष | ६०५१८५ |
| २. | राजीव अप्पासाहेब राजळे | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३९६०६३ |
| ३. | कोळसे पाटील बबन गंगाधर | अपक्ष | १२६८३ |
| ४. | काकडे किसन यशवंत | बसपा | ८३८६ |
| ५. | दिपाली सय्यद | आप | ७१२० |

**२००९ निवडणूक**
एकूण मतदार – १५१७९५१, झालेले मतदान – ७८६९८०

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | गांधी दिलीपकुमार मनसुखलाल | भारतीय जनता पक्ष | ३१२०४७ |
| २. | कर्डीले शिवाजी भानूदास | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | २६५३१६ |
| ३. | राजीव आप्पासाहेब राजळे | अपक्ष | १५२७९५ |
| ४. | कारभारी वामन ऊर्फ के.व्ही.शिरसाठ | सीपीआय | ११८५३ |
| ५. | गडाख तुकाराम गंगाधर | बहुजन समाज पक्ष | ११५०८ |

## शिर्डी (३८)



**विधानसभा क्षेत्रे :** २१६. अकोले, २१७. संगमनेर, २१८. शिर्डी, २१९. कोपरगाव, २२०. श्रीरामपूर, २२१. नेवासा.

**२०१९ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – १५६१५५०
पुरूष – ८१०८८९, महिला – ७५०६०६
इतर – ५५

**२०१४ निवडणूक**
एकूण मतदार – १४६२२६७ , झालेले मतदान – ९३२८९३ (६३.८०%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | लोखंडे सदाशिव किसन | शिवसेना | ५३२९३६ |
| २. | भाऊसाहेब राजाराम वाकचौरे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३३३०१४ |
| ३. | नितीन नवनाथ उदमाले | आप | ११५८० |
| ४. | ॲड. महेंद्र दादासाहेब शिंदे | बसपा | १०३८१ |
| ५. | संतोष मधुकर रोहाम | बी.एम.यु.पी. | ९२९६ |

**२००९ निवडणूक**
एकूण मतदार – १३१७८९०, झालेले मतदान – ६६३८८१

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | वाकचौरे भाऊसाहेब राजाराम | शिवसेना | ३५९९२१ |
| २. | आठवले रामदास बंडू | आरपीआय(ए) | २२७१७० |
| ३. | रुपवते प्रेमानंद दामोदर | अपक्ष | २२७८७ |
| ४. | कचरु नागू वाघमारे | बहुजन समाज पक्ष | ८४०८ |
| ५. | संदीप भास्कर घोलप | अपक्ष | ७८७४ |

## बीड (३९)

**विधानसभा क्षेत्रे :** २२८. गेवराई, २२९. माजलगाव, २३०. बीड, २३१. आष्टी, २३२. केज, २३३. परळी.



**२०१९ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – २०२८३३९
पुरूष – १०७३५२५
महिला – ९५४८०७
इतर – ७

**२०१४ निवडणूक**
एकूण मतदार – १७९२६५२ , झालेले मतदान – १२३२३९० (६८.७५%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | मुंडे गोपीनाथराव पांडूरंग | भारतीय जनता पक्ष | ६३५९९५ |
| २. | धस सुरेश रामचंद्र | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४९९५४१ |
| ३. | राठोड दिगांबर रामराव | बसपा | १४१६६ |
| ४. | सोळंके प्रकाश भगवानराव | अपक्ष | ८६३४ |
| ५. | अशोक धोंडीबा सोनवने | अपक्ष | ५३८३ |

**२००९ निवडणूक**
एकूण मतदार – १६३७२३९, झालेले मतदान – १०७३९८३

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | मुंडे गोपीनाथराव पांडूरंग | भारतीय जनता पक्ष | ५५३९९४ |
| २. | कोकाटे रमेश बाबुराव (अडसकर) | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४१३०४२ |
| ३. | मस्के मच्छिंद्र बाबुराव | बहुजन समाज पक्ष | २५२८४ |
| ४. | खळगे कचरु संतारामजी | बीबीएम | ११००६ |
| ५. | महंमद अक्रम महंमद सलीमुद्दीन बागवान | अपक्ष | ९८८३ |

## उस्मानाबाद (४०)



**विधानसभा क्षेत्रे :** २३९. औसा, २४०. उमरगा, २४१. तुळजापुर, २४२. उस्मानाबाद, २४३. परांडा, २४६. बार्शी.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८७१३८१
पुरूष – ९९३६२७, महिला – ८७७७३२
इतर – २२

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १७५९१८६ , झालेले मतदान – १११९७०४ (६३.६५%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | गायकवाड रविंद्र विश्वनाथ | शिवसेना | ६०७६९९ |
| २. | पाटील पद्मसिंह बाजीराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३७३३७४ |
| ३. | ढाले पद्मशिल रामचंद्र | बसपा | २८३२२ |
| ४. | रोहन सुभाष देशमुख | अपक्ष | २६८६८ |
| ५. | तुकाराम दासराव गंगवने | अपक्ष | १०२१० |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १६०८८५२, झालेले मतदान – ९२४५४७

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | पाटील पद्मसिंह बाजीराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४०८८४० |
| २. | गायकवाड रवींद्र विश्वनाथ | शिवसेना | ४०२०५३ |
| ३. | दिवाकर यशवंत नाकडे | बहुजन समाज पक्ष | २८०४५ |
| ४. | पवार हरिदास माणिकराव | अपक्ष | ९४९६ |
| ५. | दादासाहेब शंकरराव जेटीथोर | अपक्ष | ८५६७ |

## लातूर (४१)

**विधानसभा क्षेत्रे :** ८८. लोहा, २३४. लातूर ग्रामीण, २३५. लातूर शहर, २३६. अहमदपूर, २३७. उदगीर, २३८. निलंगा.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८६००५३
पुरूष – ९८१५०७, महिला – ८७८५४२
इतर – ४



**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १६८६९५७ , झालेले मतदान – १०५७५७९ (६२.६९%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | डॉ.सुनिल बळीराम गायकवाड | भारतीय जनता पक्ष | ६१६५०९ |
| २. | बन्सोडे दत्तात्रय गुंडेराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३६३११४ |
| ३. | कांबळे दिपक अरविंद | बसपा | २००२९ |
| ४. | दिपरत्न प्रभाकरराव निलंगेकर | आप | ९८२९ |
| ५. | शिंदे सुधीर श्रीपतराव | अपक्ष | ८६७८ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५०९९८७, झालेले मतदान – ८२९३९३

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | आवळे जयवंत गंगाराम | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३७२८९० |
| २. | गायकवाड सुनिल बळीराम | भारतीय जनता पक्ष | ३६४९१५ |
| ३. | ॲड.बाबासाहेब सदाशिवराव गायकवाड | बहुजन समाज पक्ष | ३४०३३ |
| ४. | गन्ने तुकाराम रामभाऊ | जेएसपी | ८७८५ |
| ५. | बाबूराव सत्यवान पोटभरे | बीबीएम | ७६८२ |

## सोलापूर (४२)

**विधानसभा क्षेत्रे :** २४७. मोहोळ, २४८. सोलापूर सिटी नॉर्थ, २४९. सोलापूर सिटी सेंट्रल, २५०. अक्कलकोट, २५१. सोलापूर साऊथ, २५२. पंढरपूर.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८२०२६१
पुरूष – ९४८५१०, महिला – ८७१७१०,
इतर – ४१

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १७०२७३९, झालेले मतदान – ९५१५१० (५५.८८%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | शरद बनसोडे | भारतीय जनता पक्ष | ५१७८७९ |
| २. | शिंदे सुशिलकुमार संभाजीराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३६८२०५ |
| ३. | ॲड. संजीव सिद्राम सदाफुले | बसपा | १९०४१ |
| ४. | ललित बाबर | आप | ९२६१ |
| ५. | सोनवने शिवाजी चंद्रकांत | अपक्ष | ५४८७ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५९४१३८, झालेले मतदान – ७४३२२२

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | शिंदे सुशीलकुमार संभाजीराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३८७५९१ |
| २. | ॲड. बनसोडे शरद मारुती | भारतीय जनता पक्ष | २८७९५९ |
| ३. | गायकवाड प्रमोद रामचंद्र | बहुजन समाज पक्ष | ३०४५७ |
| ४. | बनसोडे उत्तम भीमशा | अपक्ष | ८१३४ |
| ५. | विजयकुमार भगवानराव उघडे | अपक्ष | ७४१६ |

## माढा (४३)

**विधानसभा क्षेत्रे :** २४४. कर्माळा, २४५. माढा, २५३. सांगोला, २५४. माळशिरस, २५५. फलटन, २५८. माण.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८८६३१३
पुरूष – ९९०३०४, महिला – ८९५९९७
इतर – १२



**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १७२७३२२, झालेले मतदान – १०८०१६७ (६२.५३%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | मोहिते पाटील विजयसिंह शंकरराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४८९९८९ |
| २. | सदाभाऊ रामचंद्र खोत | स्वाभिमान पक्ष | ४६४६४५ |
| ३. | मोहिते पाटील प्रतापसिंह शंकरराव | अपक्ष | २५१८७ |
| ४. | बनसोडे कुंदन फुलचंद | बसपा | १५७९० |
| ५. | नवनाथ भिमराव पाटील | एच.आय.पी.पी.ए. | ८८५३ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५५८४४२, झालेले मतदान – ९१९३७१

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | पवार शरदचंद्र गोविंदराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ५३०५९६ |
| २. | देशमुख सुभाष सुरेशचंद्र | भारतीय जनता पक्ष | २१६१३७ |
| ३. | महादेव जगन्नाथ जानकर | आर.एस.पी. | ९८९४६ |
| ४. | राहुल विठ्ठल सरवदे | बहुजन समाज पक्ष | १६७३७ |
| ५. | सुरेश श्यामराव घाडगे | अपक्ष | १४१५७ |

## सांगली (४४)



**विधानसभा क्षेत्रे :** २८१. मिरज, २८२. सांगली, २८५. पलुस – कडेगाव, २८६. खानापूर, २८७. तासगाव – कवठे महांकाळ, २८८. जत.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १७९२१३१

पुरूष – ९२४६२८, महिला – ८६७४४१

इतर – ६२

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १६४९१०७, झालेले मतदान – १०४७५१० (६३.५२%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | संजयकाका पाटील | भारतीय जनता पक्ष | ६१११६३ |
| २. | पाटील प्रतीक प्रकाशबापू | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३७२२७१ |
| ३. | बंडगर नानासो बालासो | बसपा | ११३७८ |
| ४. | नितीन गणपतराव सावगावे | बी.एम.यु.पी. | ८४०५ |
| ५. | सुरेश पार्थ माने (नाना) | अपक्ष | ८३५३ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १४९०५७१, झालेले मतदान – ७७६८३०

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | पाटील प्रतिक प्रकाशबापू | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३७८६२० |
| २. | अजितराव शंकरराव घोरपडे | अपक्ष | ३३८८३७ |
| ३. | पटेल एम. जावेद एम. युसूफ | बहुजन समाज पक्ष | ११७९३ |
| ४. | अशोक ज्ञानू माने (भाऊ) | एसबीपी | ८०८० |
| ५. | सिद्धेश्वर शिवाप्पा भोसले | अपक्ष | ७३२८ |

## सातारा (४५)

**विधानसभा क्षेत्रे :** २५६. वाई, २५७. कोरेगाव, २५९. कराड नॉर्थ, २६०. कराड साऊथ, २६१. पाटण, २६२. सातारा.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८२३४७६

पुरूष – ९२८६२०, महिला – ८९४८४०

इतर – १६

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १७१९९९८, झालेले मतदान – ९७६७०२ (५६.७९%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | श्रीमंत छत्रपती उदयनराजे प्रतापसिंह भोसले | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ५२२५३१ |
| २. | पुरूषोत्तम जाधव | अपक्ष | १५५९३७ |
| ३. | राजेंद्र मधुकर चोरगे | आप | ८२४८९ |
| ४. | अशोक वामन गायकवाड | आर.पी.आय.(ए) | ७१८०८ |
| ५. | संदीप अमृतराव मोझर | अपक्ष | १८२१५ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५४६१४६, झालेले मतदान – ८१६६४६

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | भोसले श्रीमंत छत्रपती उदयनराजे प्रतापसिंह महाराज | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ५३२५८३ |
| २. | पुरूषोत्तम बाजीराव जाधव | शिवसेना | २३५०६८ |
| ३. | चव्हाण प्रशांत वसंत | बहुजन समाज पक्ष | २५११२ |
| ४. | अलंक्रीता अभिजीत आवाडे–बिचुकले | अपक्ष | १२६६२ |
| ५. | भाऊसाहेब गंगाराम वाघ | आरएसपी | ११२२१ |

## रत्नागिरी – सिंधूदुर्ग (४६)



**विधानसभा क्षेत्रे :** २६५. चिपळूण, २६६. रत्नागिरी, २६७. राजापूर,२६८. कणकवली, २६९. कुडाळ, २७०. सावंतवाडी.

**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १४४०९५६

पुरूष – ७०५३५०, महिला – ७३५५९७

इतर – ९

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १३६७३६२, झालेले मतदान – ८९६४०९ (६५.५६%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | विनायक भाऊराव राऊत | शिवसेना | ४९३०८८ |
| २. | निलेश नारायण राणे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३४३०३७ |
| ३. | आयरे राजेंद्र लहू | बसपा | १३०८८ |
| ४. | अभिजित श्रीराम हेगशेट्टे | आप | १२७०० |
| ५. | सुनील उर्फ यशवंत वसंत पेडणेकर | अपक्ष | ७३२८ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १२५२२५५, झालेले मतदान – ७१८७२१

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | डॉ. निलेश नारायण राणे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३५३९१५ |
| २. | सुरेश प्रभाकर प्रभू | शिवसेना | ३०७१६५ |
| ३. | सुरेंद्र बोरकर | अपक्ष | १८८५८ |
| ४. | परुळेकर जयेंद्र श्रीपाद | बहुजन समाज पक्ष | १५४६९ |
| ५. | अजय ऊर्फ आबा दादा जाधव | केकेजेएचएस | ७४०५ |

## कोल्हापूर (४७)

**विधानसभा क्षेत्रे :** २७१. चंदगड, २७२. राधानगरी, २७३. कागल, २७४. कोल्हापूर साऊथ, २७५. करवीर, २७६. कोल्हापूर नॉर्थ.



**२०१९ मतदार यादी**

एकूण मतदार नोंदणी – १८६८२३५

पुरूष – ९५४७८८, महिला – ९१३४३३

इतर – १४

**२०१४ निवडणूक**

एकूण मतदार – १७५८२९३, झालेले मतदान – १२६१०१८ (७१.७२%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | धनंजय भिमराव महाडीक | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ६०७६६५ |
| २. | संजय सदाशिव मंडलीक | शिवसेना | ५७४४०६ |
| ३. | संपतराव शामराव पवार पाटील | पी.डब्ल्यू.पी.आय. | १३१६२ |
| ४. | संदीप गुंडोपंत संकपाळ | अपक्ष | १०९६३ |
| ५. | कुरणे अजय प्रकाश | बसपा | ९२९१ |

**२००९ निवडणूक**

एकूण मतदार – १५८३०३०, झालेले मतदान – १०२७८०२

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | सदाशिव दादोबा मंडलिक | अपक्ष | ४२८०८२ |
| २. | छत्रपती संभाजीराजे शाहू | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३८३२८२ |
| ३. | देवणे विजय श्यामराव | शिवसेना | १७२८२२ |
| ४. | कांबळे सुहास निवृत्ती | बहुजन समाज पक्ष | २१८०५ |
| ५. | महंमद गुलाब नदफ | अपक्ष | ८२९६ |

## हातकणंगले (४८)



**विधानसभा क्षेत्रे :** २७७. शाहूवाडी, २७८. हातकणंगले, २७९. इचलकरंजी, २८०. शिरूर, २८३. इस्लामपूर, २८४. शिराळा.

**२०१९ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी - १७६५७४४
पुरूष - ९१२०८७, महिला - ८५३५९६ इतर - ६१

**२०१४ निवडणूक**
एकूण मतदार - १६३०६०४, झालेले मतदान - ११९०३३२ (७३.००%)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | राजू शेट्टी | स्वाभिमान पक्ष | ६४०४२८ |
| २. | आवाडे कलप्पा बाबूराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४६२६१८ |
| ३. | सुरेशदादा पाटील | अपक्ष | २५६४८ |
| ४. | कांबळे चंद्रकांत तुकाराम | बसपा | ११४९९ |
| ५. | रघुनाथ दादा पाटील | आप | ९०१५ |

**२००९ निवडणूक**
एकूण मतदार - १४५८५६०, झालेले मतदान - ९७८२०२

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १. | शेट्टी राजू ऊर्फ देवाप्पा अण्णा | स्वाभिमान पक्ष | ४८१०२५ |
| २. | माने निवेदिता संभाजीराव | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३८५९६५ |
| ३. | रघुनाथ रामचंद्र पाटील | शिवसेना | ५५०५० |
| ४. | कानडे अनिलकुमार महादेव | बहुजन समाज पक्ष | २७४६५ |
| ५. | सरनाईक आनंदराव वसंतराव (फौजी बापू) | अपक्ष | १०५७६ |

स्रोत : भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी यांचे संकेतस्थळ






**सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेमध्ये प्रशासकीय यंत्रणा विविधांगी काम करत असते. निवडणूक जाहीर होण्यापासून ते निकाल लागेपर्यंत विविध पातळींवर प्रशासकीय यंत्रणेमधील अधिकारी व कर्मचारी यांना महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या देण्यात येतात. निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील अधिकृत बातम्या माध्यमांपर्यंत तसेच जनतेपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी असलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कामातही या बदलांमुळे अनेक नवे आयाम जोडले गेले आहेत.**

# निवडणुका : बदलते तंत्र

**राधाकृष्ण मुळी**

निवडणूक म्हटली की, मनात पक्की रुतून बसलेली एक आठवण उफाळून वर येते. मार्च ७७ मधील ती रात्र. एका ऐतिहासिक पार्श्वभूमीवरील लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी सुरू होती. त्या वेळी तातडीने निकाल कळण्याचे एकमेव साधन होते, आकाशवाणीवरील बातम्या. त्या ऐकत वाड्याच्या गच्चीवर आणि बसलो होतो. दर तासाला येणाऱ्या बातम्या ऐकत, सर्वांनी अख्खी रात्र जागून काढली. त्या जागरणाचा दुसऱ्या दिवशी कसलाही शीण जाणवला नव्हता. मराठी उमेदवारांच्या नावांचे वृत्तनिवेदकाकडून होणारे हिंदी, इंग्रजी उच्चार गमतीचे असत. त्याने त्या वेळी हसू फुटले होते.

## जबाबदारीचे काम

निवडणूक म्हटले की, प्रशासकीय बाजूने कामात गांभीर्य आणि गती, अचूकता आणि पारदर्शकता, ठामपणा, आणि शिस्त अपेक्षित असते. गेल्या २३-२४ वर्षांत मतपत्रिका आणि मतपेट्यांच्या जागी मतदान यंत्रे आली, टंकलेखनयंत्रांची जागा संगणकांनी घेतली, माध्यमांचे जग गर्दीने व्यापून गेले. अनेकदा इतिहास जन्माला घालणारी मतमोजणीची ती रात्र जणू इतिहासजमा झाली. बातमी आणि आकडेवारी, पत्रकार परिषद आणि पाहणी दौरा, नकाशे आणि फोन नंबर यात गुंतलेले जिल्हा माहिती अधिकारी आता 'पेड न्यूज, 'सोशल मीडिया, 'जाहिरात प्रमाणीकरण' अशा कमालीच्या जबाबदारीच्या कामात बुडाले आहेत.

## निवडणूक प्रक्रियेत संगणक

निवडणूक प्रक्रियेत संगणक आल्यानंतर काय होणार आहे, याची चुणूक बीडला पहिल्याच निवडणुकीत पाहता आली. त्या वेळी निवडणूक प्रक्रिया सुरू होताना तत्कालीन जिल्हाधिकारी महोदयांनी कामाचे वाटप करणारा कार्यालयीन आदेश जारी केला त्याचे नावच मुळी 'ॲक्टिव्ह रिस्पाँसिबल चार्ट' असे होते. त्यात कोणते काम कोणत्या अधिकाऱ्याकडे सोपवलेले आहे, त्या कामावर कोणाची निगराणी असणार आहे याची माहिती होती. नाव-पदनाव, कार्यालयीन तसेच निवासी दूरध्वनी क्रमांकासह नोंद होती. जिल्ह्यातील सबंध निवडणूक प्रक्रियेची ती प्रशासकीय कुंडलीच होती म्हणा ना ! प्रत्येक कामाची स्वतंत्र ऑर्डर, एकाचे काम दुसऱ्याला ठाऊक नाही असा प्रकार नव्हता. कामाची विभागणी सांगणारा तो चार्ट आजही लक्षात आहे.

## पत्रकार दौरा

मतदानाच्या दिवशी पत्रकार दौरा आयोजित करण्याची तेव्हा पद्धत होती. त्यात जिल्हा माहिती अधिकाऱ्याचे व्यवस्थापकीय कौशल्य आणि संपर्कक्षमता यांचा कस लागत असे. या दौऱ्यादरम्यान राजकीय वातावरणाचा अंदाज बांधणारा जो 'फील' येत असे तो अन्य वेळी जाणवत नसे. दौऱ्याच्या कालावधीत पत्रकारांची आणि जिल्ह्यातील मातब्बर पुढाऱ्यांची गाठ पडत असे आणि त्यांचे सवाल-जवाब, चर्चा, परस्परांविषयीचे स्नेह व अगत्य जवळून पाहता येई. जिल्ह्याच्या राजकीय प्रकृतीचे अनुमान करणाऱ्या नाडीपरीक्षेचे आपण साक्षीदार नव्हे तर त्या परीक्षेत सहभागीही आहोत हे सांगणारा तो अनुभव असे. या नाडीपरीक्षेनंतरचे अनुमान सहसा चुकत नसे.

## मतपत्रिका

मतदान जेव्हा मतपत्रिकेच्या माध्यमातून होत असे, त्या वेळी मतमोजणी ही फार दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया होती. ९९ साली दोन्ही म्हणजे लोकसभा, विधानसभा निवडणुका एकत्र झाल्या तेव्हा मतमोजणीच्या ठिकाणी यंत्रणा सलग २४ तास कार्यरत होती. शिवाय दुपारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या सही-शिक्यानिशी मिळणारा मतदानाचा संपूर्ण तपशील हस्तगत करायला आणि तो सर्वांना उपलब्ध करून देण्यासाठी म्हणून माहिती कार्यालयातील बहुतेकांना ऑफिसात जावेच लागले. नंतर लगेच नवनिर्वाचित आमदारांचे परिचय संकलन करून ते मुख्यालयी पाठवावयाची जबाबदारी होती. म्हणजे कामाच्या

व्यापातून सुटका लगेच शक्य नव्हती.

## मतदान प्रक्रियेतील क्रांती

मतदानयंत्रे आली आणि मतदान प्रक्रियेत क्रांतीच झाली. लोकशाहीतील या क्रांतीचे आपण साक्षीदार आहोत, ही भावनाच फार मोलाची आहे. मतदान यंत्रांमुळे मतदानाचा वेग वाढला आहे आणि बहुधा त्याच्यामुळे मतदानाचा प्राथमिक अंदाज आणि अंतिम आकडेवारी यात तफावत पडत असते.

मतदान यंत्रामुळे फरक पडला तो मतमोजणीच्या प्रक्रियेत. एक तर बाद मताची भानगड नाही. निवडणूक अटीतटीची असली म्हणजे बाद मतांवरून वाद –विवाद, आक्षेप– प्रतिआक्षेप असे चालत असे. पुष्कळदा वातावरण तापे. आता तो प्रकार नाही. शिवाय चार –सहा तासांत मोजणी संपते. पूर्वी मतमोजणीच्या दिवशी फेरीनिहाय आकडेवारी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा माहिती अधिकारी आणि त्यांचे सहकारी रात्रंदिवस राबत असत. मतमोजणीतही यंत्रणा गुंतलेली असे. मतमोजणी केंद्राबाहेर जत्रा जमलेली असे. आतल्या शेकडो माणसांचे दिवस–दिडदिवसांचे खाणेपिणे, वावरणे, जागरण व ताणतणाव हे आता इतिहासजमा झाले आहे.

## माहिती अधिकाऱ्यांच्या कामाची व्याप्ती

निवडणूक प्रक्रियेत जिल्हा माहिती अधिकारी हा एकेकाळी 'बातमी' पुरता मर्यादित होता, आता तो निवडणूक प्रक्रियेतील प्रचार माध्यम केंद्र, जाहिरात प्रमाणीकरण समिती या आणि अशा प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळत आहे. माध्यमांचा जसा विस्तार झाला, निवडणूक यंत्रणेतील कामांचे स्वरूप जसे बदलले तसे जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या कामाची व्याप्ती वाढत असून त्याचे स्वरूपही बदलत आहे. हे बदलणारे स्वरूप त्याच्या क्षमतांची कसोटी पाहणारे आहे. या बाबतीतील काही अनुभव नोंदवण्याजोगे आहेत. निवडणूक आयोगाकडून प्रत्येक मतदान संघात निवडणूक निरीक्षक नेमले जातात. हे वरिष्ठ पदावरील प्रशासकीय अधिकारी असतात. आयोगाचे प्रतिनिधी म्हणून ते निवडणूक प्रक्रियेवर बारकाईने नजर ठेवून असतात. परराज्यातून येणाऱ्या या अधिकाऱ्यांचा दिवस वर्तमानपत्राच्या वाचनाने सुरू होतो. वर्तमानपत्रांतून काय छापून येत आहे, हे सांगणारी कात्रणे त्यांना पाठवली जातात. एका निरीक्षकाला ते पुरेसे वाटले नाही आणि त्यानी रोज ब्रीफिंगसाठी बोलवले. त्यात वावगे काही नव्हते पण असे बोलावणे आल्याचे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना सांगणे क्रमप्राप्त होते. तसे त्याच्या कानी घातले आणि त्यांनाही या ब्रीफिंगचे ब्रीफिंग सुरू केले. अन्य निरीक्षकांच्या संपर्क अधिकाऱ्यांनाही त्याची कल्पना द्यावी लागली. निरीक्षक म्हणून आलेल्या अधिकाऱ्यांशी होणारा संवाद कधीकधी निवडणुकीपलीकडे जातो. समाजजीवन, या भागातील प्रश्न, येथील राजकारण–अर्थकारण असेही विषय निघतात. या संवादात आनंद असला तरी निवडणुकीमुळे एक दडपण जाणवते. कारण निरीक्षकांशी बोलत असतो याची आपल्याला ठेवावी लागते.

गेल्या २५ वर्षांत जे बदल झाले त्याचा सारांश सांगणारा अनुभव मुदाम नमूद केला पाहिजे. मध्यंतरी पदवीधर मतदान संघातील मतमोजणीच्या वेळी उपस्थित होतो. या मतदार संघतील मतदान पसंतीक्रमानुसार होते. ही प्रक्रिया वेळ घेणारी असते. त्यामुळे पत्रकार मंडळी दुपारनंतरच मतमोजणी केंद्रावर येणार हे गृहीत असते. पण त्या दिवशी सकाळीच एक पत्रकार मतमोजणी केंद्रावर भेटले, त्यांना सकाळीच येणाचे कारण विचारले. त्यांनी सांगितले की, त्यांना मतपेट्या, मतपत्रिका, त्याची सरमिसळ, गठ्ठे बांधले जाणे हे सगळे पाहायचे होते. पत्रकार झालो तेव्हा मतदान यंत्रांचे युग अवतरले होते, त्यामुळे काही मतपत्रिका–मतपेट्या पाहायला मिळाल्या नाहीत, हे त्यांचे म्हणणे ऐकले तेव्हा आपण एका युगातून दुसऱ्या युगात पाय ठेवला आहे, याची तीव्रतेने जाणीव झाली. पूर्वी मतमोजणीच्या दिवशी पत्रकारांचे चहा–नाश्ता–जेवण या बाबींचा विचार करावाच लागे. ते साहजिकच होते. पण मतदान यंत्र आल्यानंतरच्या पहिल्याच मोजणीच्या दिवशी दुपारी पत्रकार जेवायला थांबायला तयार नव्हते, कारण मतमोजणीची बातमी हातात होती आणि अशा वेळी जेवणे म्हणजे चैनच ठरत होती. या २३–२४ वर्षांत मोठा बदल झाला तो मतमोजणीची बातमी देण्याचा.

**उपसंचालक (माहिती), अमरावती**

### मतपेट्यांचा अनुभव

मराठवाड्यात आठ मतदारसंघ. त्या वेळी औरंगाबाद आणि जालना हे मतदारसंघ वगळता अन्य मतदारसंघात पहिल्या टप्प्यात मतदान होत असे आणि औरंगाबाद व जालना या मतदारसंघात ते दुसऱ्या टप्प्यात होत असे. पहिल्या टप्प्यात उपयोगाला न आलेल्या रिकाम्या मतपेट्या लातूर येथून औरंगाबादला पाठवल्या जात होत्या. सोबत बंदोबस्त वगैरे होताच. त्या सहा–सात तासांच्या प्रवासात मतपेट्या घेऊन निघालेले कर्मचारी बीड शहराजवळ कुठे तरी धाब्यावर जेवले. गर्दीमुळे त्यांना बसायला खुर्ची व ताट ठेवायला टेबल मिळाले नाहीत. त्यांनी ही गरज भागवण्यासाठी चक्क रिकाम्या मतपेट्याच बाहेर काढल्या. जेवण झाल्यानंतर एक–दोन मतपेट्या ते तेथेच विसरले. 'बातमी' पत्रकारांपर्यंत पोहोचली. पण त्या वेळी जिल्हा प्रशासन पूर्ण तयारीनिशी पत्रकारांना सामोरे गेले. औरंगाबाद कार्यालयाने लातूर कार्यालयालयाला पत्र देऊन मतपेट्या मागितल्या होत्या. या मागणीप्रमाणे लातूर कार्यालयाने पाठवलेल्या मतपेट्या आणि त्यांचे क्रमांक, सापडलेल्या मतपेट्यांचे क्रमांक ही सगळी माहिती पत्रकारांना देण्यात आली. घडली ती घटना गंभीर असली तरी मतपेट्या रिकाम्या आणि न वापरलेल्या होत्या. तसेच या मतपेट्या एका जिल्ह्यातील यंत्रणेकडून दुसऱ्या जिल्ह्यातील यंत्रणेला निर्धारित पद्धतीनुसार पाठवल्या जात होत्या, हे तेव्हा व्यवस्थित सांगितले गेले. ती वस्तुस्थिती असल्यामुळे सर्वांनाच ते पटले. नंतर मतदान यंत्रांचा जमाना आला. एका जिल्ह्यात कोणी तरी मतदानयंत्र ज्यात ठेवले जाते, ती पेटीच चोरली. यंत्र चोरीला गेले नव्हते, पण पेटी जागेवर नव्हती. पेटी हरवली म्हणून फिर्याद द्यावी तर त्याची बातमी झाली असती, कदाचित समज–गैरसमज निर्माण झाले असते. फिर्याद न देता तर ती सापडण्याची शक्यता नव्हती शेवटी फिर्याद दिली गेली आणि ती पेटीही सापडली.




निवडणूक खर्चावर निरीक्षकाची करडी नजर

**निवडणुका पारदर्शक आणि शांततेच्या वातावरणात पार पडाव्या म्हणून भारत निवडणूक आयोगाच्यावतीने विविध प्रयत्न केले जातात. त्यातीलच एक भाग, उमेदवाराच्या निवडणूक खर्चावर नियंत्रण हा आहे. मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च केला जाण्याची शक्यता असते. अशा खर्चावर आयोगाने निर्बंध आणले आहेत. लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांना ७० लाख रुपये इतकी खर्चाची मर्यादा असून, त्यापुढे खर्च करणाऱ्या उमेदवारांना आयोगाच्या कारवाईला सामोरे जावे लागू शकते.**

# खर्च करा पण सांभाळून...

**राजेश येसनकर**

निवडणूक खर्चावर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी मतदारसंघनिहाय निवडणूक खर्च सनियंत्रण कक्षाची स्थापना केली जाते. उमेदवारांकडून होणारा खर्च प्रत्यक्ष ठिकाणी / जागेवर तपासून त्याची पडताळणी करण्यासाठी विशेष पथकांचे गठन करण्यात येते. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून पाठवण्यात येणाऱ्या खर्च निरीक्षकांकडून या सर्व प्रक्रियेचे नियंत्रण होते. त्यांच्या मदतीला साहाय्यक खर्च निरीक्षक नेमले जातात.

## खर्च नियंत्रण कक्ष

लेखा व वित्त विषयातील वरिष्ठ अधिकारी खर्च नियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतात. त्यांच्या सोबतीला प्रत्यक्ष फिल्डवर उमेदवारांच्या खर्चाची पडताळणी करण्याकरिता खर्च तपासणी पथक, व्हिडिओ पाहणी पथक, व्हिडिओ सर्वेक्षण पथक आणि फिरत्या पथकाचा समावेश असतो. याशिवाय स्टॅटिक सर्व्हायलन्स टीमसुद्धा नेमली जाते. या विविध पथकांमध्ये पुरेसे अधिकारी, कर्मचारी नियुक्त केले जातात.

उमेदवाराचा निवडणूक खर्च हा नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापासून मतमोजणीच्या दिनांकापर्यंत गृहीत धरण्यात येतो. त्यासाठी उमेदवारांच्या निवडणूक प्रतिनिधींनी दर दिवशी झालेला खर्च दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत विहित नमुन्यात निवडणूक खर्च संनियंत्रण कक्षाला सादर करणे बंधनकारक आहे. यासाठी उमेदवाराला किंवा त्यांच्या खर्चविषयक बाब पाहणाऱ्या प्रतिनिधीला तीन रजिस्टर्स देण्यात येतात. यात दैनंदिन खर्चाची नोंदवही, रोकड नोंदवही आणि बँक नोंदवही याचा समावेश असतो. उमेदवारांच्या या रजिस्टरची केंद्रीय खर्च निरीक्षकांकडून संपूर्ण कालावधीत किमान तीन वेळा तपासणी करण्यात येते.

## खर्चाचा अहवाल

निवडणूक खर्चाकरिता उमेदवाराचे स्वतंत्र बँक खाते असणे आवश्यक आहे. याच बँक खात्यातून निवडणुकीसाठी खर्च करायचा असून १० हजार रुपयांपर्यंत रोखीने व्यवहार करता येतील. दहा हजारांवरील निवडणूक खर्च रेखांकित धनादेशाद्वारे करावा लागणार आहे. प्रत्येक उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचा अहवाल निकालानंतर ३० दिवसांच्या आत सनियंत्रण कक्षाकडे सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराने खर्चाचा अहवाल विहित नमुन्यात तसेच विहित मुदतीत सादर न केल्यास लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम १०–'ए' नुसार उमेदवाराला अपात्र ठरविण्याची तरतूद आहे.

## शॅडो ऑब्झर्व्हेशन रजिस्टर

याशिवाय खर्च संनियंत्रण कक्षाकडे शॅडो ऑब्झर्व्हेशन रजिस्टर असून सी–व्हीजील ॲप, निवडणूक कॉल सेंटर व विविध खर्चाबाबत येणाऱ्या तक्रारींची शहानिशा उमेदवारांनी दिलेल्या खर्चासोबत करण्यात येईल. यात तफावत आढळल्यास २४ तासांच्या आत उमेदवाराला नोटीस दिली जाते. उमेदवाराने सादर केलेल्या खर्चाच्या हिशोब तपासणीसाठी निवडणूक खर्च सनियंत्रण कक्षाच्यावतीने विविध बाबींची दरसूची तयार करण्यात येते. यात लाऊडस्पीकर, सीडीप्लेअर, भोंगे, मंडप, लाइट व्यवस्था, जाहिरात फलक, वृत्तपत्र व वृत्तवाहिन्यांचे दर, मल्टिकलर आणि सिंगल कलर हॅन्डबिल, भित्तिपत्रके, पोस्टर्स, लोखंडी फ्रेम होर्डिंग्ज, बिछायत संबंधित बाबी, मंगल कार्यालय, भोजनावरचा खर्च, ढोलताशे, वाहतुकीसाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या गाड्यांचा खर्च, सार्वजनिक सभा, मेळावे, मुख्य प्रचारकांचा प्रवास खर्च आदी बाबींचा समावेश आहे. निवडणूक खर्च सनियंत्रण टीममधील नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच विधानसभा क्षेत्रनिहाय नियुक्त सहायक खर्च नियंत्रक यांना प्रशिक्षण दिले जाते.

**प्र. जिल्हा माहिती अधिकारी, यवतमाळ**



**महिला मतदारांचा निवडणुकीतील वाढता सहभाग लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी महिलांच्या मताचे योगदान अधोरेखित करणारा आहे. देशात १९६० मध्ये दरहजारी पुरुषांमागे महिला मतदारांची संख्या ७१५ एवढी होती, ती २०११ मध्ये ९४० इतकी झाली. राज्यात २०१४ मध्ये ९०५ इतकी असलेली दर हजारी महिला मतदारांची संख्या, २०१९ मध्ये आतापर्यंतची सर्वाधिक म्हणजे ९११ इतकी झाली आहे. ही अभिमानास्पद बाब ठरते.**

# निर्णायक शक्ती

**मीनल जोगळेकर**


२०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी एका छोट्या खेड्यात घडलेली गोष्ट. मतदानाच्या दिवशी त्या खेड्यातील एक मुलगी मतदानाला निघाली तेव्हा तिच्या आईने तिला थांबवले. आई म्हणाली, 'मी तुला घराबाहेर पडू देणार नाही. मतदानाशी तुझा काय संबंध? चल, मला घरकामात मदत कर.' मुलगी म्हणाली, 'आई, माझ्या सगळ्या मैत्रिणी मतदानाला जात आहेत. गावातल्या इतर बायका जात आहेत. इतकेच नाही तर शेजारची ८० वर्षाची म्हातारी आजीसुद्धा जात आहे. मला पण जाऊ दे.' मुलीचा हट्ट ऐकून तिने प्रश्न केला, 'अगं, पण तुझे अजून लग्न झाले नाही, तू मतदान कशी करू शकते?' मुलीने समजावले, 'आई, मी अठरा वर्षांची झाली आहे. मैत्रिणींसोबत जाऊन मतदार ओळखपत्र काढले आहे, नाव मतदार यादीत असल्याची खात्री केली आहे. लग्नाचा आणि मतदानाचा काय संबंध? माझे मत स्वतःचे आहे आणि इतर कोणाच्याही मताएवढेच त्याला मूल्य आहे. मी मतदान करून येते, मग तुला घरकामात मदत करते.' मुलीच्या निर्धारापुढे आईचे काही चालले नाही व मुलीने आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

हीच गोष्ट आज देश आणि राज्यातील घराघरांत दिसते आहे. महिला मतदारांचा निवडणुकीतील वाढता सहभाग महत्त्वाचा असून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी महिलांच्या मताचे योगदान अधोरेखित करणारा आहे.

## महिला मतदानाचा प्रारंभ

जगातील अनेक लोकशाही राष्ट्रांपेक्षा भारतातील महिला मतदानाच्या हक्काबाबत सुदैवी ठरल्या आहेत. खरे तर, देशाला स्वातंत्र्य मिळून एकसंध भारत अस्तित्वात आला त्याच क्षणी भारतीय महिलांना मतदानाचा हक्क मिळाला होता. पण २६ जानेवारी १९५० या दिवशी राज्यघटना अस्तित्वात आल्यावर तो घटनात्मक अधिकार झाला. महिलांना मतदानाचा अधिकार मिळण्यासाठी अमेरिकेतील महिलांना १४४ वर्षे, ब्रिटनमधील महिलांना १०० वर्षे लागली, तर सौदी अरेबियातील महिलांना अगदी अलीकडे म्हणजे २०१५ मध्ये सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करता आले.

भारतीय महिलांनाही मतदानाचा हक्क काही सहजासहजी मिळाला नव्हता. भारतावर ब्रिटिशांचे राज्य होते त्या वेळी महिलांनी स्वातंत्र्य चळवळीत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढा उभारला. त्या वेळी देशात निवडणुका मर्यादित स्वरूपात होत्या. निवडक पुरुषांनाच मतदान करण्याची परवानगी होती. महिलांना सार्वजनिक जीवनात वावरण्याचा अनुभव नसतो, त्यामुळे त्यांच्यात न्यूनगंड असतो, त्यांना मताधिकार दिल्याने त्या कुटुंबीयांकडे दुर्लक्ष करतील अशा हास्यास्पद सबबी देत ब्रिटिश सरकारने महिलांना मताधिकार नाकारला. ब्रिटनमध्ये २ जुलै १९२८ रोजी महिलांना मोठ्या लढ्यानंतर पूर्णांशाने मतदानाचा अधिकार मिळाला. त्यापासून प्रेरणा घेत, भारतीय महिला संघटनांनी ॲनी बेझंट, सरोजिनी नायडू, रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई राजवाडे यांच्या नेतृत्वात मताधिकारासाठी चळवळ उभारली. त्याचे फलित म्हणजे १९२१ मध्ये तत्कालीन मद्रास प्रांतात सर्वप्रथम महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. त्यातही, निवृत्तिवेतन घेणारी विधवा, एखाद्या अधिकाऱ्याची पत्नी किंवा आई असणे, तिचा पती कर भरत असेल किंवा संपत्तीचा मालक असेल अशाच महिलांना मतदानाचा हक्क देण्याचा नियम या प्रांतामध्ये होता. त्यानंतर दशकभरात मुंबईसह सात प्रांतांतील महिलांना मताधिकार देण्यात आला. मात्र महिलांचे नाव मतदार यादीत येण्यासाठी प्रत्येक प्रांताचे आपापले वेगवेगळे नियम होते. भारतातील १९३५ च्या शेवटच्या वसाहतवादी कायद्यानुसार देशातील वयस्क लोकसंख्येतील पाच कोटी लोकांना मतदानाचा अधिकार देण्यात आला, त्यात महिलांची संख्या कमी होती. महिला मतदारांची पात्रता तिच्या पतीच्या सांपत्तिक, सामाजिक स्थितीवर अवलंबून होती. त्यामुळे घटस्फोटित विधवा आणि संपत्ती नसलेल्या महिलांची नावे मतदार यादीतून वगळण्याचा विचार तत्कालीन सरकारने केला.




## स्वातंत्र्योत्तर वाटचाल

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अस्तित्वात येऊन पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीची तयारी सुरू झाली. सुकुमार सेन या आयसीएस अधिकाऱ्याची देशाचे पहिले निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. प्रौढ भारतीय नागरिकांना मतदानाचा अधिकार वापरता यावा यासाठी मतदार याद्या तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले. परंतु या यादीत स्त्रियांची नावे ही कुणाची तरी पत्नी, आई, मुलगी किंवा विधवा अशी नोंदवली गेली होती. स्वतःच्या नावाने एक स्वतंत्र मतदार म्हणून त्यांची नोंद यादीत यावी, यासाठी सेन यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक आयोगाने महिलांना प्रोत्साहित केले. त्या वेळी सुमारे आठ कोटी महिला मतदारांची नोंदणी झाली. त्यापैकी ८५ टक्के महिलांनी पूर्वी कधीही मतदान केले नव्हते. त्यातील सुमारे तीस लाख महिला मतदारांची स्वतंत्र नावे नोंदली न गेल्याने, त्या मतदानापासून वंचित राहिल्या.

**कमी नोंदणी होण्याची संभाव्य कारणे:**

**दुय्यम दर्जा –** आपल्या पुरुषसत्ताक समाजरचनेत महिलांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात असल्याने स्त्रीभ्रूण हत्या, बालविवाह, कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक छळ अशा अनेक कुप्रथांमधून महिलेचे घटनादत्त अधिकार नाकारले जाणे. **अशिक्षितपणा –** महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने शासकीय कामात सहभागी होण्याबाबत भीती व उदासीनता. **जागरूकतेचा अभाव –** आपल्या अधिकार व हक्कांबाबत मुळीच जागरूकता नसणे. **रूढी-परंपरा –** पूर्वापार चालत आलेल्या जाचक रूढी-परंपरांच्या पगड्यामुळे मतदार ओळखपत्रांसाठी छायाचित्र काढू देण्यास कुटुंबीयांचा नकार. **सामाजिक बंधने –** मतदार यादीत नाव नोंदवल्याने मुलीचे वय सर्वांना कळेल व तिच्या लग्नात अडचण निर्माण होतील या भीतीने नाव नोंदले न जाणे, लग्न करून मुलीला सासरी पाठवावयाचे आहे, तेव्हा तिचे मतदार ओळखपत्र सासरचे काढत बसतील हा विचार. **सुरक्षितता –** अनेकदा महिला घरात व घराबाहेर पुरुषी जोर-जबरदस्ती व अत्याचाराला बळी पडावे लागत असल्याने तिला घराबाहेर पडू न देण्याची मानसिकता.

वरील काही प्रातिनिधिक कारणांसोबतच तत्कालीन परिस्थितीनुसार इतर अनेक करणे महिलांच्या मतदानाच्या अधिकाराच्या आड येत होती.

## चित्र पालटत गेले

वरीलप्रमाणे अनेक कारणांमुळे देशातील महिला मतदानाच्या अधिकारापासून वंचित होत्या. भारतात सुरुवातीपासून निवडणूक प्रक्रियेवर पुरुषसत्ताक पद्धतीचे वर्चस्व राहिले आहे. राजकीय पक्षांकडून उमेदवारी देणे असो, मतदान असो, निवडून येणे असो किंवा मंत्री होणे असो, पुरुषांचे आधिक्य व वर्चस्व राहिले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात हे चित्र पालटत गेले. वाढत गेलेली लोकसंख्या, शिक्षण, बदलत गेलेली सामाजिक परिस्थिती यानुसार एकूण मतदारांचे आणि महिला मतदारांचे प्रमाण वाढत गेले. निवडणूक आयोगाचे अथक प्रयत्न, शिक्षणामुळे आपल्या हक्कांबाबत स्त्रियांमध्ये आलेली जागरूकता, त्यामुळे त्यांचा सामाजिक ,आर्थिक विषयांमध्ये वाढलेला सहभाग, त्यातून त्यांना




आलेली राजकीयदृष्ट्या सजगता, यांसारख्या विविध कारणांमुळे महिला निवडणूक प्रक्रियेत मोठ्या संख्येने सहभागी होऊ लागल्या. १९६२ –२००४ या कालावधीतील लोकसभा निवडणुकांमध्ये देशस्तरावरील स्त्री–पुरुष मतदानाच्या टक्केवारीमध्ये ७ ते १२ टक्क्यांची तफावत होती, ती कमी–कमी होत २०१४ मध्ये २ टक्क्यांपेक्षा कमी झाली.

१९६२ मध्ये ४७ टक्के महिलांनी मतदान केले, २०१४ मध्ये ६६ टक्क्यांवर हे प्रमाण गेले. म्हणजेच चार दशकात हे प्रमाण १९ टक्क्यांनी वाढले. मात्र याच काळात पुरुष मतदारांचे प्रमाण फक्त पाच टक्क्यांनी वाढले. २०१४ मध्ये २९ पैकी १६ राज्यांमध्ये महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांपेक्षा जास्त होती, तर २००९ मध्ये सहा राज्यांमध्ये.

## आयोगाचे प्रयत्न

२००९ च्या निवडणुकीनंतर ही तफावत दूर करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने महिला मतदार जागृतीसाठी स्वीप (सिस्टेमॅटिक व्होटर्स एज्युकेशन अ‍ॅण्ड इलेक्ट्रॉल पार्टिसिपेशन) कार्यक्रमाच्या माध्यमातून देशभर विविध ठिकाणी अनेक उपक्रम हाती घेतले. यात मतदानपूर्व उपक्रम व मतदानाच्या दिवशीच्या सुविधा यांचा समावेश आहे.

### मतदानपूर्व उपक्रम

**माहिती –** मतदानाच्या अधिकाराची माहिती देणे, मतदार यादीत कुठे, कसे, कधी नाव नोंदवायचे, कोणती कागदपत्रे जोडायची याची माहिती देणे.

**प्रोत्साहन –** महिला मतदार रॅली काढून महिलांना मतदानासाठी प्रोत्साहित करणे, आदिवासी तसेच कमी महिला मतदार असलेल्या भागात आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांच्यामार्फत जनजागृती. उद्योग, शिक्षण, सामाजिक, साहित्य, कला–संस्कृती यांसह विविध क्षेत्रातील अग्रणी महिलांच्या माध्यमातून महिलांना मतदार नोंदणीसाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे.

### मतदानाच्या दिवशीच्या सुविधा

**महिला अधिकारी–कर्मचाऱ्यांची नेमणूक –** महिलांना मतदान करताना संकोच वाटू नये, म्हणून मतदान केंद्रावर सर्व महिला अधिकारी–कर्मचारी इतकेच नाही तर महिला पोलीस व महिला पोलिंग एजंट यांची नेमणूक करणे.

**रांगाविरहित मतदान केंद्र –** मतदान केंद्रांच्या ठिकाणी बसायला बाके ठेऊन रांगेत उभे राहण्याच्या त्रासापासून सुटका

आयोगाच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे आज संपूर्ण देशातील महिला, त्यातही नव–मतदार तरुणी मतदानासाठी उत्सुक दिसते आहे. २००९ मध्ये २९ पैकी ६ राज्यांमध्ये महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांपेक्षा जास्त होती, तर २०१४ मध्ये १६ राज्यांमध्ये.

मातृसत्ताक केरळ, ईशान्येकडील मेघालय, मणिपूर, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, तसेच गोवा, राज्यांमध्ये व पुद्दुचेरी, दिव–दमण या केंद्रशासित प्रदेशांमध्ये महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांपेक्षा जास्त होती. देशात दर हजारी पुरुषांमागे महिलांची संख्या वाढताना दिसते.

## राज्यातील आशादायक चित्र

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असल्याने महिला मतदारांची संख्या सुरुवातीपासूनच लक्षणीय राहिली आहे. राज्यात २००९ पासून महिला व पुरुष मतदारांची स्वतंत्र नोंद घेण्यास सुरुवात झाली. त्यानंतर महाराष्ट्रातील चित्र निश्चितच आशादायक आहे. राज्यात दर हजारी पुरुषांमागे महिलांची संख्या २०१९ मध्ये ९११, २०१४ मध्ये ९०५ होती.

गेल्या निवडणुकीच्या तुलनेत, यंदा १३ लाख नवीन महिला

## तृतीयपंथीय मतदारांच्या संख्येत दुप्पटीने वाढ

२००४ आणि २००९ च्या लोकसभा निवडणुकीत मतदार यादीत तृतीयपंथीयांची स्वतंत्र नोंद नव्हती. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर २०१४ साली तृतीयपंथीय मतदारांना प्रथम मतदानाचा अधिकार मिळाला. २०१४ च्या निवडणुकीदरम्यान पहिल्यांदाच पुरुष मतदार, महिला मतदारांबरोबरच तृतीयपंथी अशी तिसरी वर्गवारी करण्यात आली. २०१४ मध्ये या वर्गवारीमध्ये ९१८ मतदारांची नोंद करण्यात आली. पाच वर्षांनी करण्यात आलेल्या नोंदीमध्ये हा आकडा दुप्पटीने वाढला. आता ही संख्या २,०८६ इतकी झाली आहे. भिवंडी, कल्याण, मुंबई उत्तर आणि मुंबई पूर्व या चार मतदारसंघात अनुक्रमे ११३, १८४, ३२४ आणि १२३ तृतीयपंथीयांची नोंद झाली आहे. मुंबई उत्तर या मतदारसंघातून ३२४ सर्वाधिक तृतीयपंथीयांची नोंद झाली आहे.



**सदिच्छा दूत :** अधिकाधिक तृतीयपंथीयांची, शेवटच्या टप्प्यांतील नावनोंदणी करण्यास मदत होण्याच्या दृष्टीने आयोगाने पहिल्यांदाच गौरी सावंत या तृतीयपंथीय कार्यकर्त्याची निवडणूक सदिच्छा दूत म्हणून नियुक्ती केली आहे.

## सखी मतदान केंद्र




केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार यंदा प्रथमच प्रत्येक लोकसभा मतदारसंघात 'महिला व्यवस्थापित मतदान केंद्र' निर्माण करण्यात येणार आहे. ही केंद्रे 'सखी मतदान केंद्र' म्हणून ओळखली जाणार आहेत. सखी मतदार केंद्रावर अधिकारी, कर्मचारी महिला असतील. महिला मतदान केंद्र निवडताना केंद्राची सुरक्षितता लक्षात घेतली जाणार आहे.

मतदारांची भर पडली आहे. राज्यात दर हजारी पुरुषांमागे महिलांची संख्या वाढताना दिसत असून यंदा ती सर्वाधिक म्हणजे ९११ वर पोहोचली आहे.

### अमूल्य संधी

आज देशातील जवळपास निम्मी लोकसंख्या महिलांची असल्याने 'महिला', या घटकाकडे आता दुर्लक्ष करून चालणार नाही, याची जाणीव सर्व राजकीय पक्षांना करून देण्याची मतदान ही उत्तम संधी आहे. महिलांच्या वाढत्या मतदानाचे पडसाद राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात उमटू लागले आहेत. महिलांचे प्रश्न सोडवण्याबाबत, त्यांच्या विकासाबाबत, जाचक रूढी-परंपरांच्या जोखडातून मुक्त करून त्यांना बरोबरीचे स्थान देणारे कायदे आणण्याबद्दल जाहीरनामास्तरावर का होईना पण चर्चा होते, हा बदल महिलांसाठी निश्चितच स्वागतार्ह व आश्वासक असाच म्हटला पाहिजे. अधिक महिला उमेदवार उभे करणे, निवडून आल्यावर महत्त्वाच्या खात्यांची त्यांच्याकडे जबाबदारी देणे, हे त्याचे काही भविष्यकालीन दृश्य परिणाम ठरतील. भारतीय राज्यघटनेने महिलेच्या एका मताला इतर कोणत्याही भारतीय नागरिकाइतकेच समान मूल्य दिले असल्याने, आपला मताधिकार तिने निर्भयपणे वापरायला हवा. स्त्रीचे नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राचे भवितव्य बदलू शकणाऱ्या एका मताची ही किमया महिलांनी अनुभवायलाच हवी.

**संपादक, महाराष्ट्र अहेड**

**लोकसभा, विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रत्येकाने मतदान करावे. कार्यक्षम, प्रामाणिक उमेदवारांची निवड करून लोकशाही अधिक बळकट करण्यास साहाय्य करावे. संविधानाने दिलेल्या मताधिकाराद्वारे, लोकशाहीचे बळकटीकरण होणार आहे. आपल्या स्वप्नातील राष्ट्र हे फक्त आपल्या एका मताने पडू शकते. अपार कष्टाने प्राप्त केलेले स्वातंत्र्य, त्यातून प्राप्त झालेली लोकशाही टिकवणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. आपले एक मत संपूर्ण व्यवस्था व पर्यायाने आपले भाग्य बदलण्याचे साधन आहे..**



# अभिमान आहे मला, मतदार असल्याचा

**पल्लवी अनिल धारव**

स्वातंत्र्यानंतर नव्या व विशाल राष्ट्राचा उदय झाला. भारतात वसणारी विविधता राजकीय प्रक्रियेच्या आड येऊ शकली नाही, कारण आपण सर्व एका राष्ट्राचे नागरिक आहोत आणि म्हणूनच राष्ट्रीय एकात्मता दर्शवणारी पहिली सार्वत्रिक निवडणूक १९५२ साली पार पडली. या लोकशाही देशात नागरिक हा फक्त मतदार नाही तर मतदार राजा बनला.

या विशाल देशाची व्यवस्था लोकशाही पद्धतीने चालवावी या निर्णयावर एकमताने शिक्कामोर्तब झाले व संविधान निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली. अनेक देशांच्या संविधान पद्धतीचा अभ्यास करून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात घटना समितीने देशाचे लिखित संविधान पूर्ण केले. संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत अधिकार, निवडणूक प्रक्रिया व प्रणाली अशा असंख्य महत्त्वपूर्ण बाबींचा उद्देशिकेत समावेश आहे. संविधानाच्या अनुच्छेद ३२६ नुसार भारतातील नागरिकांना २१ व्या वर्षी करता येणारा मताधिकार प्रदान करण्यात आला. परिस्थिती व गरजेनुसार संविधानामध्ये अनेकदा घटनादुरुस्ती करण्यात आली. १९८९ साली घटनेतील कलम ३२६ मध्ये दुरुस्ती करून मतदानाचे वय २१ वरून १८ वर्षे करण्यात आले. मतदानाच्या अधिकार प्राप्तीमुळे भारतीय नागरिकांना फक्त एका राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याचाच अधिकार नाही तर राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत मोलाची





**बुलडाणा येथे ५००० विद्यार्थ्यांकडून मतदान जागृतीविषयी साकारण्यात आलेल्या मानवी रांगोळीचा 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये समावेश करण्यात आला असून त्याचे प्रशस्तीपत्रक स्वीकारताना बुलडाणाच्या जिल्हाधिकारी डॉ. निरुपमा डांगे, उप मुख्य निवडणूक अधिकारी शिरीष मोहोड आदी.**

भूमिका बजावण्याची जबाबदारीही देण्यात आली. म्हणजे 'मतदान' हा जसा अधिकार आहे. तसेच ते प्रत्येक भारतीय नागरिकाचे नैतिक कर्तव्यदेखील आहे. संविधानाने नागरिकांना मताधिकार देऊन राजकीय यंत्रणा तर स्थापित केली, पण न्यायाची प्रस्थापना करण्याची जबाबदारी मात्र नागरिकांवर टाकली. त्यासाठी राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची समान संधी व सर्वसमावेशक अधिकार संविधानाने सर्व नागरिकांना दिला.

## मतदार जागृती अभियान

संविधानाने दिलेल्या मताधिकाराच्या सामर्थ्यापासून नागरिक अनभिज्ञ होते. मागील कित्येक वर्षात देशातील नागरिकांनी हा अधिकार बजावावा, याबाबत जागरूकता आणण्यासाठी मतदार जागृती अभियान प्रभावीपणे राबवण्यात येत आहे व त्याची फलश्रुती म्हणजे मतदानाच्या टक्केवारीत झालेली वाढ होय. ही १०० टक्के आकडेवारी नसली तरी मतदानाबद्दलची अनास्था मात्र नक्कीच कमी झाली आहे. लोकशाही प्रणालीमध्ये निवडणूक व मतदाता अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. स्वातंत्र्यानंतर प्रत्येक निवडणुकीचा उदाहरणादाखल विचार केल्यास मतदारांची राजकीय समज व त्यांच्यातील व्यवहारज्ञानाचा आपल्याला प्रत्यय येतो. म्हणजेच मतदाराला आपल्या मताचे मूल्य व सामर्थ्याची कल्पना आली आहे असे म्हणता येईल.

## मतदान प्रक्रियेत सहभाग

मतदान प्रक्रियेत युवकांचा सहभाग असणे महत्त्वाचे आहे. १८ वर्षे पूर्ण केल्यानंतरही अनेक युवक-युवतींचे नाव मतदार यादीत नसल्याचे आढळते. मतदान यादीत नाव समाविष्ट करण्याच्या क्लिष्ट पद्धतीमुळे मतदानाबाबत अनास्था दिसून यायची. यावर उपाय म्हणून आयोगाच्या वतीने ठिकठिकाणी नोंदणी केंद्र, मतदान जागृती अभियान, शिबिरे, मोहिमा, घोषणा, स्पर्धा या माध्यमातून क्लिष्ट काम अतिशय सोपे करण्यात आले. मतदान जागृती अभियानांतर्गत ग्रामीण भागातील शिक्षणाची समस्या, आवश्यक कागदांची पूर्तता न होणे, स्थलांतरित समाजासाठी सहजरीत्या मतदार यादीत नावाची नोंद करता यावी, याकरिता आयोगाद्वारे सकारात्मक ठोस पावले उचलण्यात आली. पण या प्रयत्नांना प्रतिसाद देणे मतदारांच्याच हातात आहे. 'माझ्या एका मताने काय फरक पडणार आहे' ही नकारात्मक विचारसरणी बळावता कामा नये. संवेदनशील, अतिसंवेदनशील भागात निवडणूक व मतदान प्रक्रियेत सहभागी होताना नागरिकांना सुरक्षितता वाटणेही गरजेचे आहे. तरच मतदानाची अपेक्षित टक्केवारी गाठता येणे शक्य आहे.

## राष्ट्रीय मतदार दिवस

देशातील प्रत्येक नागरिक मतदान प्रक्रियेचा एक भाग आहे. मतदानाप्रति नागरिकांची असलेली उदासीनता व मतदानाचे घटते प्रमाण दूर करण्याकरिता वर्ष २०११ पासून भारत निवडणूक आयोगाने २५ जानेवारी हा दिवस 'राष्ट्रीय मतदार दिवस' म्हणून घोषित केला. २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची निर्मिती झाली. २५ जानेवारी हा दिवस सर्व मतदारांना आपल्या मतदानाच्या अधिकाराची जागरूकता, उत्साह व जबाबदारीची आठवण करून देणारा म्हणून अत्यंत महत्त्वाचा आहे. २६ जानेवारीला आपण प्रजासत्ताक दिन साजरा करतो. त्याच्या एक दिवस पूर्व म्हणजे २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून या दोन्ही दिवसांचे संबंध व महत्त्व शब्दातीत आहे.

**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

**भारतासारख्या खंडप्राय देशात निवडणुका घेणे हे मोठे आव्हान आहे. मात्र निवडणूक आयोग हे आव्हान प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीत यशस्वीपणे पेलत आहे. मोठ्या संख्येने मतदारांना मतदानासाठी आकृष्ट करण्यापासून मतदान प्रक्रिया पारदर्शक करण्यापर्यंत आयोगाने अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवले. ते राबवताना प्रत्येक टप्प्यावर नवे तांत्रिक बदल सुलभतेने स्वीकारले...**

# निवडणुकीतील परिवर्तन युग

**सुधीर पाठक**

भारतासारख्या खंडप्राय देशात सार्वत्रिक निवडणुका घेणे हे खूप मोठे आव्हान आहे. १९५२ पासून ते व्यवस्थितपणे स्वीकारले गेले आहे. पूर्वी मतपत्रिका असत, तेव्हा त्याच्या छपाईचे मोठे काम शासनाला करावे लागे. त्यात अचूकता ठेवणे, त्याचबरोबर गुप्तता पाळणे, फक्त नेमक्या संख्येची मतपत्रिका छापणे वगैरे बाबही राहत असे. सुरुवातीला एकत्र मतपत्रिका मतदाराला दिली जात असे व त्याने मतदान कक्षात जाऊन तिथे ठेवलेल्या अनेक मतपेट्यांपैकी आपल्या उमेदवाराच्या मतपेटीत ती टाकावी, अशी अपेक्षा होती. त्या वेळी मतपेट्याही खूप लागत. शिवाय मतदारांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे काही मतदार त्या मतपेटीवर मतपत्रिका ठेवून निघून जात असत. त्यात मागून येणारा एखादा चलाख मतदार त्या कक्षात जेवढ्या मतपत्रिका असतील, तेवढ्या सर्व उचलून आपल्या उमेदवाराला त्या टाकून मोकळाही होत असे. १९५७ किंवा १९६२ या मतदानाच्या वेळी ही पद्धत बंद झाली आणि एकच मतपेटी ठेवली जात असे. तेव्हापासून 'मतपत्रिकेवर शिक्के मारू नका' वगैरे मतदार प्रशिक्षणाचा भाग सुरू झाला. पण या मतपत्रिकेची घडी विशिष्ट प्रकाराने करणे सांगूनही अनेकांना जमत नसे. त्या वेळी अवैध मतदानाची संख्याही मोठी असे. मात्र तो कालखंड प्रतिभेला विलक्षण धुमारे फुटण्याचा असे. कुणी विनोद लिहीत कुणी उमेदवारांना सल्ला देत, कुणी काय बाहेर पडले, याचे विषय बातमीदारांना मिळत. पण मतदान यंत्र आल्याने प्रतिभेचा हा आविष्कार संपुष्टात आला. आता हातात शिक्का नाही, मतदान यंत्राचे बटन फक्त एकदाच दाबता येते.

## काळ बदलला

मतपत्रिकेद्वारे मतदान असताना सकाळी ८ वाजता मतमोजणी सुरू व्हायची व संध्याकाळपावेतो प्रत्यक्ष मतमोजणीला सुरुवातच होत नसे. किमान २० ते ७२ तासांपावेतोचा कालावधी निकाल घोषित व्हायला लागत असे. जे निर्वाचन अधिकारी व त्यांचे सहकारी असत त्यांची, त्यांच्या सहनशीलतेची परीक्षाच असे. राजकीय पक्षाची मंडळी मतमोजणीची जागा सोडू शकत होते. पण निर्वाचन आयोगाच्या मंडळींना निकाल घोषित झाल्याविना जागेवरून हलताही येत नसे. अनेक जिल्हाधिकाऱ्यांना या काळात अतिताणामुळे रुग्णालयात दाखल करावे लागत असे. आता ८ वाजता मतमोजणी सुरू होते. एका तासाच्या आत मतमोजणीचे कल घोषित केले जाऊ लागला. १२ वाजल्यापासून निकालही घोषित होणे सुरू होते. संध्याकाळी अनेक निकाल घोषित झालेले असतात.

पूर्वी मतदान केंद्रात उपस्थित असणाऱ्या राजकीय पक्षाच्या एजंटाने आक्षेप घेतला नाही तोवर, तो मतदार यादीत ज्याचे नाव आहे तोच मानला जात असे. पण आता मात्र असे होत नाही. मतदाराला आपले ओळखपत्र सोबत न्यावे लागते. मतदाराला निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र, आधारकार्ड, पासपोर्ट, सरकारी वा ज्या संस्थेत तो काम करीत आहे, त्याचे ओळखपत्र, पॅनकार्ड यापैकी काहीतरी एक जवळ बाळगावे लागते आणि त्याचा क्रमांक मतदान केंद्रावरील कर्मचारी नोंदवून घेतात.




## वाहनांवर निर्बंध

मतदार स्वतःचे वा मित्राचे वाहन घेऊन मतदान केंद्रावर जाऊ शकतो. पण राजकीय पक्ष वा उमेदवार यांच्या वाहनातून वा त्यांनी केलेल्या वाहनातून जाता येत नाही. पूर्वी राजकीय पक्ष सर्रास अशी वाहने मतदारांसाठी वापरत असत. कुणी निवडणूक याचिका केली की, मग पुरावे म्हणून अशा वाहनांचे फोटो याचिकेत लावले जात असत. गाडीचे नंबर व त्यावरून ती वाहने कुणाच्या मालकीची आहेत, यावरून भ्रष्ट मार्गाचा वापर उमेदवाराने केला की नाही, हे न्यायालय ठरवत असे, आता अशी वाहने वापरणे बंद झाले आहे, असे एखादे वाहन दिसले तर ते पोलिसांकरवी जप्त केले जाते. लागलीच मालकावर व वाहन चालवणाऱ्यावर कारवाई सुरू होते. प्रसंगी त्याला पोलीस स्टेशनात बंदही केले जाते.

## शेषन पर्व

सुकुमार सेन हे भारताचे पहिले निवडणूक आयुक्त होते. त्यानंतरही खूप जणांनी ते पद भूषवले आहे. टी. एन. शेषन यांनी १२ डिसेंबर १९९० ला दहावे निवडणूक आयुक्त म्हणून सूत्रे हातात घेतली आणि आपला प्रभाव दाखवणे सुरू केले. ते ६ वर्षे या पदावर होते. टी. एन. शेषन मुख्य निवडणूक आयुक्त असतानाच आचारसंहिता अतिशय

कठोरपणे राबवणे सुरू झाले. रात्री दहा वाजता प्रचारसभा बंद व्हायला लागल्यात. खर्च लिहिताना त्यात गैरव्यवहार होतात, हे लक्षात आल्यावर शेषन यांनी प्रत्येक खर्चाच्या बाबीचे दर ठरवून दिले. प्रचारयात्रा, सभा यांचे व्हिडीओ चित्रीकरण सुरू केले. खर्चाचा दैनंदिन हिशेब देताना जेवायला, नाश्त्याला किती जण होते वगैरे तपशील देणे त्यांनी बंधनकारक केले. त्यांच्या अनेक निर्णयांमुळे राजकीय पक्षांच्या नेत्यांनाही दिलासा मिळाला. पूर्वी रात्र रात्र सभा चालत. आता रात्री दहानंतर सभा नसल्यामुळे राजकीय पक्षांच्या नेत्यांना विश्रांती मिळणे शक्य झाले. टी. एन. शेषन् हे मुख्य निवडणूक आयुक्त होईपर्यंत एकच निवडणूक असे. १६ ऑक्टोबर १९८९ ते १ जानेवारी १९९० या काळात पहिल्यांदा तीन निवडणूक आयुक्त नेमले गेले. त्यानंतर निवडणूक आयोगाच्या नियमात बदल करण्यात आला आणि निवडणूक आयोग बहुसदस्यीय करण्यात आला. आता तीन निवडणूक आयुक्त असतात. त्यातील एक मुख्य निवडणूक आयुक्त असतो, पण उर्वरित दोघांचे अधिकारही मुख्य निवडणूक आयुक्तांएवढेच असतात. आयोगातील निर्णय बहुमताच्या आधारे घेतले जातात. व्ही. रमादेवी या पहिल्या महिला निवडणूक आयुक्त होत्या.




## प्रचार गंमत संपली

आचारसंहितेच्या कडक अंमलबजावणीमुळे पूर्वीची प्रचाराची गंमत मात्र कमी झाली. किंबहुना संपली असेच म्हणावे लागेल. पूर्वी प्रचाराच्या गाड्या खेडोपाडी येत तेव्हा बिल्ले वाटत असत. या बिल्ल्यांसाठी पोराटोरांची खूप गर्दी, झुंबड उडत असे. गाड्यांमागे पळत जाऊन जास्तीत जास्त बिल्ले मिळवण्याची चढाओढ असे. ती आता संपली आहे. आपल्याजवळ १००, १००० बिल्ले आहेत. यावरून त्या मुलाची गावातील श्रीमंती ठरत असे. आता ती श्रीमंती संपली आहे. राजकीय पक्षांनाही गाड्यांची धूळ उडवीत प्रचार बिल्ले वाटण्यावर आता निर्बंध आले आहेत. पूर्वी राजकीय पक्षांचे कार्यकर्ते अक्षरशः घरी खाऊन लष्कराच्या भाकरी भाजत असत. प्रचाराला आपल्या सायकल, बैलगाडी वा स्कूटरने बाहेर पडत असत. दौरे करीत. रात्री निवडणूक उमेदवार सभा घेऊन आढावा घेत असे. मतदानाच्या दिवशी कच्चा चिवडा तेवढा उमेदवारातर्फे पुरवला जात असे. आता तो आनंद गेला. मतदानाच्या आधी मतदारांच्या ओळखचिठ्ठ्या घरोघरी पोहोचवण्याचे कामही राजकीय पक्षांचे कार्यकर्ते करीत. मतदानाच्या दिवशी बुथ लावून बसत. आता ओळखचिठ्ठ्याही निवडणूक आयोगामार्फत पुरवल्या जातात.

पूर्वी १९६२, १९६७ च्या काळात स्टेन्सिल्स तयार करून त्याचे छापे भिंतीवर उमटवले जात. भिंती रंगवल्या जात. अनेक तरुण कार्यकर्ते भिंती रंगवत. रात्रभर फिरत असत. आता भिंती रंगवणे हा प्रकार थांबला आहे. ज्याची भिंत रंगवली जाते, त्याने जाहिरात वापराकरिता दिली आहे, असे समजून त्याचे शुल्क घेतले जाते. शिवाय रंगवलेल्या भिंती प्रचार संपताच स्वच्छ करून द्याव्या लागतात. हे सर्व नियम व त्याची कठोर अंमलबजावणी यासाठी शेषन् यांनाच श्रेय द्यावे लागेल. त्यांच्या काळातच मतदार ओळखपत्रेही तयार होणे सुरू झाले.

## कार्यकर्त्यांना रोजगार

कार्यकर्त्यांना या काळात रोजगार मिळाल्याचा आनंद मिळतो. कार्यकर्त्यांकडे उमेदवार पेट्रोल, डिझेल भरून गाडी पाठवतो. तो कार्यकर्ता दिवसभर प्रचार करतो. दिवसाच्या शेवटाला आपला मेहनताना खिशात घालून रवाना होतो. निवडणूक खूप महागडी झाली आहे.

पूर्वी माध्यमेही तेवढी प्रभावी नव्हती. आता राजकीय पक्षांचे नेते. कार्यकर्ते माध्यमस्नेही झाले आहेत. आपल्या बातम्या छापून याव्यात, यासाठी चाणक्यनीतीचा वापर करू लागले आहेत. पत्रकारितेला ज्ञात नसणारा 'पेड न्यूज' नावाचा प्रकार सुरू झाला आहे. आता सभा, संमेलने यापेक्षा समाज माध्यमांना महत्त्व प्राप्त झाले आहे. समाज माध्यमांवरील संदेश अक्षरशः वायुवेगाने मतदारांपर्यंत पोहोचतात व परिणाम करून जातात. दूरध्वनीच्या वापरातून प्रत्यक्ष उमदेवार आणि अगदी प्रधानमंत्रीही मतदारांशी थेट संपर्क करू लागले आहेत. या सर्व धामधुमीत मतदारांशी असलेला राजकीय पक्षांचा संपर्क संपला आहे. २८ मार्च १९८९ रोजी ६१वी घटनादुरुस्ती झाली. २१ ऐवजी १८ व्या वर्षीपासून मतदानाचा अधिकार मिळाल्याने मतदारांची संख्या वाढली.

## आक्षेपाची कसोटी

२०१४ च्या लोकसभेच्या निवडणुकांच्या वेळी मोठ्या प्रमाणावर सर्वत्र ईव्हीम मशिन अर्थात मतदान यंत्राचा मतदानासाठी वापर करण्यात आला. या यंत्राच्या वापरामुळे लोकसभेच्या निवडणुकांचे निकाल जलद गतीने लागले. मतदान यंत्राचा वापर नवीन होता, त्याच्या वापराबाबत अनेक संभ्रम राजकीय पक्ष, तसेच सामान्य जनतेच्या मनात होते. हे यंत्र हॅक करता येते असा आरोप होत होता. मात्र निवडणूक आयोगाने हा आरोप पूर्णपणे नाकारला आणि हॅक करून दाखवा, असे आवाहन सर्व राजकीय पक्ष, संगणकतज्ज्ञ दिले. त्यासाठी प्रत्येकाला अर्धा तासाचा वेळही देण्यात आला होता. पण ते आव्हान कोणीही पूर्णत्वाला नेऊ शकले नाही. मात्र याबाबत स्वतः मतदाराची खात्री व्हावी यासाठी व्हीव्हीपॅटचा उपयोग सुरू झाला. मतदाराने मतदान केल्यावर त्या मतदाराला व्हीव्हीपॅट यंत्रात सात सेकंदापावेतो आपण केलेले मतदान नेमके कुणाला झाले आहे हे पाहता येते. त्यानंतर हा संदेश 'क्लीअर' होतो. याशिवाय पेपर ड्रेसिंगची व्यवस्था झाली आहे.

मतदार मतदान केंद्रावर आला, त्याने उमेदवारांची यादी बघितली आणि त्याला कोणालाही मत द्यावेसे वाटले नाही तर तो 'नोटा' म्हणजे 'यापैकी एकही नाही' हा पर्याय. मात्र एक गोष्ट नक्की आहे की, पूर्वी जेवढा जिवंतपणा या निवडणूकीत होता, तो आता नवीन तंत्रा-मंत्राबरोबर संपत आला आहे, यांत्रिकता वाढली आहे.

**ज्येष्ठ पत्रकार**

# महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्त कार्यालय | | |
|---|---|---|
| पदनाम | अधिकाऱ्यांचे नाव | कार्यालयीन दूरध्वनी व फॅक्स |
| मुख्य निवडणूक आयुक्त | सुनील अरोरा | ०११-२३०५२३२३, २३०५२४२४, फॅक्स : २३०५२५२५ |
| निवडणूक आयुक्त | अशोक लवासा | ०११-२३०५२१३२, २३०५२१३४, फॅक्स : २३०५२२४९ |
| निवडणूक आयुक्त | सुशील चंद्रा | ०११- २३०५२१३७,२३०५२१३८, फॅक्स : २३०५२१३९ |

| महाराष्ट्र राज्य | | |
|---|---|---|
| पदनाम | अधिकाऱ्यांचे नाव | कार्यालयीन दूरध्वनी |
| अपर मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी | अश्वनी कुमार | ०२२-२२०२९९६५ |
| अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी | दिलीप शिंदे | ०२२-२२८५६६६५ |
| उप सचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी | अनिल वळवी | ०२२-२२८५६६६७ |
| अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी | शिरीष मोहोड | ०२२-२२८५५९४८ |
| अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी | शुभा बोरकर | ०२२-२२०२६४४१ |

## लोकसभा मतदार संघनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी

| मतदार संघ | निर्णय अधिकारी | भ्रमणध्वनी |
|---|---|---|
| १-नंदुरबार (अ.ज.) | बालाजी मंजुळे | ७४४८११३७९७ |
| २-धुळे | राहुल रेखावार | ८६०५८३३३०० |
| ३-जळगाव | अविनाश ढाकणे | ९८६९४८६६२४ |
| ४-रावेर | गोरक्ष गडीलकर | ९८५०५२४७५५ |
| ५-बुलडाणा | डॉ. निरुपमा डांगे | ९०११०१३७७८ |
| ६-अकोला | जितेंद्र पापळकर | ९४२०४८७०५५ |
| ७-अमरावती (अ.जा.) | शैलेश नवल | ८६९८८८६६११ |
| ८-वर्धा | विवेक भीमनवार | ९८९२६०४४६६ |
| ९-रामटेक (अ.जा.) | श्रीकांत फडके | ९४२२९६३१६६ |
| १०-नागपूर | अश्विन मुदगल | ९४२०४९२२७७ |
| ११-भंडारा-गोंदिया | शंतनू गोयल | ९४०४१४६४५२ |
| १२-गडचिरोली-चिमूर (अ.ज.) | शेखर सिंह | ८८०६९४६४४९ |
| १३-चंद्रपूर | डॉ. कुणाल खेमनार | ९७६५२२९६६८ |
| १४-यवतमाळ-वाशिम | अजय गुल्हाणे | ९५४५४६४००० |
| १५-हिंगोली | रुचेश जयवंशी | ७७७५०७२७२७ |
| १६-नांदेड | अरुण डोंगरे | ९४२२१५८९४३ |
| १७-परभणी | पी. शिव शंकर | ७०२०१५०९७० |
| १८-जालना | रवींद्र बिनवडे | ८८०६७४२८३५ |
| १९-औरंगाबाद | उदय चौधरी | ८४५१८०३१११ |

| मतदार संघ | निर्णय अधिकारी | भ्रमणध्वनी |
|---|---|---|
| २०-दिंडोरी (अ.ज.) | निलेश सागर | ९४२२२२७९९० |
| २१-नाशिक | सूरज मांढरे | ९४२२९८४१४१ |
| २२-पालघर (अ.ज.) | डॉ. प्रशांत नारनवरे | ९८५००५३५०३ |
| २३-भिवंडी | किशन जावळे | ९०११०१६९९९ |
| २४-कल्याण | शिवाजी कादबाने | ९४२२०१५६९१ |
| २५-ठाणे | अनिलकुमार पवार | ९५५२७८६४५५ |
| २६-मुंबई उत्तर | उध्दव घुगे | ९७६५००००१० |
| २७-मुंबई उत्तर पश्चिम | जीवन गलांडे | ९८९२७३१७२९ |
| २८-मुंबई उत्तर पूर्व | विवेक गायकवाड | ९८५०३५५९९८ |
| २९-मुंबई उत्तर मध्य | निलेश गटणे | ९८३३३३८०९० |
| ३०-मुंबई दक्षिण मध्य | शहाजी पवार | ८८८८८७३८४२ |
| ३१-मुंबई दक्षिण | बन्सी गवळी | ९८६७८७३८८८ |
| ३२-रायगड | विजय सूर्यवंशी | ९८१९५८१७४० |
| ३३-मावळ | कविता द्विवेदी | ९८२२४०९७३६ |
| ३४-पुणे | नवल किशोर राम | ७७२००१०७५१ |
| ३५-बारामती | सुभाष डुंबरे | ९९२२५०१५०६ |
| ३६-शिरुर | रमेश काळे | ९४२३५८०८८८ |
| ३७-अहमदनगर | राहुल द्विवेदी | ८८०६२६८८११ |
| ३८-शिर्डी (अ.जा.) | पी.एल. सोरमारे | ९९२१६९९९८१ |

| मतदार संघ | निर्णय अधिकारी | भ्रमणध्वनी |
|---|---|---|
| ३९–बीड | अस्तीक कुमार पांडे | ७०३०९१८८९९ |
| ४०–उस्मानाबाद | दीपा मुधोळ–मुंडे | ७०८३९३९४८३ |
| ४१–लातूर (अ.जा.) | जी. श्रीकांत | ९९२१०४४४६६ |
| ४२–सोलापूर (अ.जा.) | राजेंद्र बी. भोसले | ९८३३०२१९५५ |
| ४३–माढा | रामचंद्र शिंदे | ९४२२४०६६३६ |

| मतदार संघ | निर्णय अधिकारी | भ्रमणध्वनी |
|---|---|---|
| ४४–सांगली | अभिजित चौधरी | ९४६६५३२००१ |
| ४५–सातारा | श्वेता सिंघल | ७७३८९७२२७९ |
| ४६–रत्नागिरी–सिंधुदूर्ग | सुनील चव्हाण | ८६८९९८०४४४ |
| ४७–कोल्हापूर | दौलत देसाई | ८३०८२६६८८९ |
| ४८–हातकणंगले | नंदकुमार काटकर | ९८८१२२३३६६ |

## पोलीस आयुक्त

| क्षेत्र | कार्यालयीन दूरध्वनी |
|---|---|
| मुंबई | ०२२–२२६२०८२६ |
| मुंबई (सीएसएमटी रेल्वे) | ०२२–२३७५९२५१ |
| ठाणे | ०२२–२३५४४४९९ |
| नवी मुंबई | ०२२–२७५७२२०९ |
| पुणे | ०२०–२६१२५३९६ |
| पिंपरी–चिंचवड | ०२०–२६२०८२०१ |
| सोलापूर | ०२१७–२७४४६०१ |
| नाशिक | ०२५३–२३०५२३३ |
| औरंगाबाद | ०२४०–२२४०५०१ |
| अमरावती | ०७२१–२५५१००१ |
| नागपूर | ०७१२–२५६०६०१ |

## विशेष पोलीस महानिरीक्षक

| क्षेत्र | कार्यालयीन दूरध्वनी |
|---|---|
| कोकण क्षेत्र | ०२२–२७५६३२५७ |
| नाशिक क्षेत्र | ०२५३–२९७०७२० |
| कोल्हापूर क्षेत्र | ०२३१–२६५६५६८ |
| औरंगाबाद क्षेत्र | ०२४०–२३३१४७३ |
| नांदेड क्षेत्र | ०२४६२–२५१३१६ |
| नागपूर क्षेत्र | ०७१२–२५६०८११ |
| गडचिरोली नक्षली क्षेत्र | ०७१२–२५४४४३० |
| अमरावती क्षेत्र | ०७२१–२६६३२२६ |

## जिल्हा पोलीस अधीक्षक

| पदनाम | कार्यालयीन दूरध्वनी |
|---|---|
| ठाणे (ग्रामीण) | ०२२–२५३४३०२७ |
| रायगड | ०२१४१–२२२०९३ |
| रत्नागिरी | ०२३५२–२२५०७७ |
| सिंधुदुर्ग | ०२३६२–२२८२०१ |
| पालघर | ०२५२५–२५११०० |
| नाशिक (ग्रामीण) | ०२५३–२३०९७०० |
| अहमदनगर | ०२४१–२४१६१०१ |
| जळगाव | ०२५७–२२२०४११ |
| धुळे | ०२५६२–२८८२०० |
| नंदूरबार | ०२५६४–२१०१०१ |
| पुणे (ग्रामीण) | ०२०–२५६५७८७८ |
| सातारा | ०२१६२–२३२२२५ |

| पदनाम | कार्यालयीन दूरध्वनी |
|---|---|
| सांगली | ०२३३–२६७२३२३ |
| कोल्हापूर (ग्रामीण) | ०२३१–२६६२४३३ |
| सोलापूर (ग्रामीण) | ०२१७–२७३२००१ |
| औरंगाबाद (ग्रामीण) | ०२४०–२३८०८०८ |
| जालना | ०२४८२–२२५६०१ |
| बीड | ०२४४२–२२२३०१ |
| उस्मानाबाद | ०२४७२–२२७६२० |
| लातूर | ०२३८२–२४३००० |
| नांदेड | ०२४६२–२३४५०४ |
| हिंगोली | ०२४५६–२२१७४४ |
| परभणी | ०२४५२–२२३४४४ |

| पदनाम | कार्यालयीन दूरध्वनी |
|---|---|
| नागपूर (ग्रामीण) | ०७१२–२५६२१३९ |
| वर्धा | ०७१५२–२३२५०१ |
| चंद्रपूर | ०७१५२–२५५१०० |
| भंडारा | ०७१८४–२५२४४० |
| गडचिरोली | ०७१३२–२२२१५१ |
| गोंदिया | ०७१८२–२३६२९३ |
| अकोला | ०७२४–२४३५००२ |
| वाशिम | ०७२५२–२३२१३४ |
| अमरावती (ग्रामीण) | ०७२१–२६६४८०० |
| बुलडाणा | ०७२६२–२४२३९५ |
| यवतमाळ | ०७२३२–२४२४८२ |



**भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रौढ मताधिकाराचे कट्टर समर्थक होते. २७ जानेवारी, १९१९ रोजी साऊथबोरो कमिटीला दिलेल्या साक्षीमध्ये डॉ. आंबेडकरांनी प्रौढ मतदानाची मागणी केली. भारतीय संविधानने 'एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य' हे तत्त्व स्वीकारले. त्यामुळे देशातील प्रत्येक प्रौढ स्त्री-पुरुषास मतदानाचा अधिकार मिळाला, ही आपल्या संविधानाची फार मोठी उपलब्धी आहे.**

# एक मत, एक मूल्य

**डॉ. प्रदीप आगलावे**

१९२८ मध्ये भारतीय संवैधानिक आयोग भारतात आला. या आयोगाचे अध्यक्ष सर जॉन सायमन होते. म्हणून भारतीय संवैधानिक आयोग हा 'सायमन आयोग' (सायमन कमिशन) या नावाने ओळखला जातो. सायमन आयोगाला बॉम्बे प्रेसिडेन्सीच्या संविधानातील परिवर्तनाच्या संदर्भात विचार आणि शिफारसी देणारा एक सविस्तर अहवाल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२८ मध्ये सादर केला. या अहवालात प्रांतांच्या क्षेत्राचे पूनर्वितरण, प्रांतीय कार्यपालिकेची कार्यप्रणाली, प्रांतीय विधायिका, प्रांतीय स्वायत्तता आणि लोकसेवा याबाबत सविस्तर मांडणी केली.

## मताधिकाराचे महत्त्व

काही लोकांनी अशी शिफारस केली की, उत्पन्नावर आधारित असलेली शहरी क्षेत्रातील मताधिकारांची व्यवस्था तशीच ठेवून ग्रामीण क्षेत्रामधील मताधिकारांसाठी महसुलाची मर्यादा अर्धी करण्यात यावी. डॉ. आंबेडकरांनी यास असहमती दर्शवली. ते म्हणतात की, 'माझ्या सहकाऱ्यांनी मताधिकाराचा प्रश्न हा अधिकारापेक्षा मेहरबानी किंवा मर्जीचा मानला आहे. माझ्या मते हा दृष्टिकोन इतका घातक आहे की, तो राजकीय समजाच्या आधारावर स्वीकारला जाऊ शकत नाही.'

'मताधिकारविहीन लोकांची राजकीय मुक्ती पूर्णतः अशा मताधिकार असलेल्या लोकांच्या मर्जीवर राहील. असा निष्कर्ष स्वीकारणे म्हणजे गुलामी वाईट नाही असे मानणे होय. कारण गुलामीमध्ये अशी मान्यता असते की, सत्ताधारी वर्ग आपल्याला जे देईल, त्याशिवाय गुलामांचा कोणताही अधिकार नसतो,' हे स्पष्ट करून डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'असा निष्कर्ष असणाऱ्या सिद्धान्ताकरिता असे म्हणावे लागेल की, हे कोणत्याही लोक-निर्वाचित शासन प्रणालीसाठी घातक आहे.'

काही सहकारी मताधिकाराच्या संदर्भात असा विचार करतात की, ही काही मोठी गोष्ट नसून केवळ कागदाचा असा तुकडा मतपेटीमध्ये टाकण्याचा अधिकार आहे की, ज्यावर काही नावं लिहिली आहेत.

जर बहुसंख्याकांच्या डोक्यात मताधिकाराचे योग्य चित्र असते तर ते मताधिकाराचे महत्त्व समजू शकले असते. मताधिकार म्हणजे केवळ मतपत्रावर निशाण लावणे नाही तर ती अशी व्यवस्था आहे की, ज्यामध्ये त्या अटीच्या नियमनामध्ये प्रत्यक्ष किंवा क्रियाशील सहभाग असतो. ज्यावर सहजीवन आधारित आणि चांगल्या गोष्टी करण्याचा परवाना असतो, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. म्हणून त्यांनी उत्पन्न, शिक्षण इत्यादी अटींवर आधारित मताधिकाराचा विरोध केला. देशातील सर्व प्रौढ नागरिकांना मतदानाचा अधिकार असला पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

भारतीय संविधानात प्रौढ मताधिकाराचे तत्त्व मान्य करून देशातील सर्व प्रौढ नागरिकांस मतदानाचा अधिकार देण्यात आला. भारतीय प्रौढ नागरिकांना मतदान करण्याचा आणि योग्य उमेदवारास मत देण्याचा हक्क मिळाला. परंतु हा अधिकार भारतीय नागरिकांना सहज मिळाला नाही.

लोकांना शिक्षणापासून वंचित करणे म्हणजे पूर्णपणे अन्यायाची परिस्थिती निर्माण करणे होय. लोकांना निरक्षर ठेवणे आणि त्यांची निरक्षरता मताधिकाराकरिता अपात्र ठरविणे म्हणजे त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. आपला अशिक्षितपणा दूर करण्यासाठी त्यांच्याजवळ एकमेव उपाय मतदानाचा अधिकार हा आहे. त्यांना

## मताधिकाराचा निकष साक्षरता नसावा

निरक्षर लोकांना मतदानाचा अधिकार कसा द्यावा? असा प्रश्न उपस्थित केला जात असे. परंतु डॉ. आंबेडकरांनी प्रतिप्रश्न केला की, त्यांच्या निरक्षरतेसाठी कोण जबाबदार आहे? जर निरक्षरांची जबाबदारी सरकारची असेल तर मतदानाच्या अधिकारासाठी साक्षरतेची अट लावल्यास बहुसंख्य लोक मतदानाच्या अधिकारांपासून वंचित राहतील. कारण त्यात निरक्षरांचा कोणताही दोष नाही. कारण ज्या साक्षरतेची व्यवस्था करण्यात आली, त्यास प्राप्त करण्याची त्यांना कधी संधीच मिळाली नाही. समजा, असे मानले की, साक्षरता दूर झाल्यावर त्यांना मतदानाचा अधिकार मिळेल. परंतु, निरक्षरता दूर करण्यासाठी त्वरित प्रयत्न केले जातील, याची काही हमी आहे काय?

निरक्षर ठेवणे आणि त्यांचा अशिक्षितपणा सदैव कायम ठेवणे म्हणजे त्यांची मतदानाच्या अधिकार प्राप्तीची संधी अनंत काळापर्यंत स्थगित करणे होय, असे स्पष्ट मत डॉ. आंबेडकर मांडतात.

## साक्षरता, निरक्षरता आणि बुद्धिमत्ता

निरक्षर लोकांना मतदानाचा अधिकार प्रदान करायचा का ? या प्रश्नावर डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'हा साक्षरता किंवा निरक्षरतेचा प्रश्न नाही. हा प्रश्न केवळ बुद्धिमत्तेचा होऊ शकतो. जे लोक साक्षरतेचा निकष मानण्याचा आग्रह धरतात आणि जे हा आग्रह करतात की, मतदानाचा अधिकार प्राप्त करण्यासाठी साक्षर होणे आवश्यक आहे, असा विचार करणारे लोक दोन चुका करतात. त्यांची पहिली चूक हे मान्य करते की, निरक्षर व्यक्ती ही निश्चितपणे बुद्धिमान असू शकत नाही. परंतु हे सर्वश्रुत आहे की, कोणताही निरक्षर व्यक्ती ही बुद्धिमानदेखील असू शकते. भारतासह संपूर्ण जगात निरक्षर व्यक्तीलादेखील एवढी बुद्धी असते की, ते विचारपूर्वक आपले कामकाज करू शकतात. कायद्यानेदेखील हे मान्य केले की, एका विशिष्ट वयानंतर प्रत्येक व्यक्तीमध्ये इतकी बुद्धिमत्ता येते की, ती आपले कामकाज चालवण्याची क्षमता प्राप्त करते.

दुसरी चूक ही की, निरक्षराच्या तुलनेत साक्षर व्यक्तीला उच्च स्तराची बुद्धिमत्ता किंवा ज्ञान असते अशी मान्यता असणे. या संदर्भात डॉ. आंबेडकर, ब्राइस (Bryce) या विचारवंताचे मत उद्धृत करतात. 'आधुनिक लोकशाही' च्या आपल्या सर्वेक्षणात ब्राइस यांनी प्रश्न उपस्थित केला होता की, लिहिण्या-वाचण्याची योग्यता कुठपर्यंत नागरिक योग्यतेमध्ये साहाय्यक होते? त्याचे उत्तर असे आहे की, 'व्यावहारिक दृष्टिकोनातून हाच केवळ एकमेव निकष उपलब्ध आहे. आम्ही त्यास पर्याप्त किंवा योग्य निकष मानला. परंतु वास्तवात असे आहे का? इंग्लडमध्ये साठ वर्षांआधी खेड्यातील लोक हे चतुर होते. ते अशिक्षित होते. परंतु ते सहज बुद्धीचे धनी होते. खेड्यातील लोक आपली कुशाग्र बुद्धी आणि ठोस विवेकाच्या आधारावर मतदानाकरिता पूर्ण सक्षम आहेत.' ग्रीकमधील अथेनियन मतदाते नागरिक मताधिकाराकरिता आधुनिक लोकशाहीमधील मतदात्यांपेक्षा अधिक सक्षम होते. ग्रीक मतदाते राजकारण कोणत्याही छापील किंवा लिखित पुस्तकातून शिकले नव्हते, तर कुशल वक्त्यांची भाषणे ऐकून आणि आपापसातील चर्चेतून ते शिकले होते.


मतदात्याकडून अधिकाधिक अशी अपेक्षा केली जाऊ शकते की, मोठे प्रश्न समजण्याची क्षमता असावी. त्याने अशा उमेदवाराची निवड करावी, जो त्यांच्या मतानुसार त्याचे हित करू शकेल. असे स्पष्ट करून डॉ. आंबेडकर म्हणतात की, मी असा दावा करतो की, साधारण भारतीयांमध्ये ही क्षमता आहे.

प्रौढ मताधिकाराच्या संदर्भात अशा प्रकारचा युक्तिवाद सायमन आयोगाला सादर केलेल्या १९२८ च्या अहवालात डॉ. आंबेडकरांनी केला होता. या अहवालात प्रौढ मतदानाचा अधिकार मान्य करून अशी शिफारस केली होती की, २१ वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या सर्व प्रौढांकरिता मग ते स्त्री किंवा पुरुष असो, त्यांना मतदानाचा अधिकार देण्यात यावा.

## १९३५ च्या कायद्यात बाबासाहेबांचे योगदान

इंग्रज सरकारने भारतीय कायदा, १९३५ पास करून तो लागू केला. १९३५ च्या भारतीय कायद्याचा बराचसा भाग भारतीय संविधानात समाविष्ट करण्यात आला आहे. लंडन येथे १९३० मध्ये पहिली, १९३१ मध्ये दुसरी आणि १९३२ मध्ये तिसरी गोलमेज परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत वसाहतीचे स्वराज्य, प्रांतीय राज्यघटना, अल्पसंख्याक, मताधिकार, नागरी सेवा इत्यादी बाबींवर सविस्तर चर्चा होऊन त्या आधारावर १९३५चा भारतीय कायदा तयार करण्यात आला होता. हा कायदा तयार करण्यामध्ये डॉ. आंबेडकरांचे विशेष योगदान होते.

वसाहतीचे स्वराज्य असावे तसेच एक जबाबदार शासन पद्धती असावी. शासनाची निवड जनतेने करावी. त्याकरिता देशातील सर्व प्रौढ नागरिकांनाच मतदानाचा अधिकार असावा. असे स्पष्ट मत डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत मांडले होते. गोलमेज परिषदेतील मताधिकार-उपसमितीच्या बैठकीत २२ डिसेंबर, १९३० रोजी डॉ. आंबेडकरांनी



सुरुवातीलाच स्पष्ट केले होते की, 'या गोलमेज परिषदेत केवळ दोन महत्त्वपूर्ण प्रश्नांचा विचार केला जाईल, असे मी मानतो. पहिला म्हणजे भारताला जबाबदार सरकार असायला हवे काय? आणि दुसरा प्रश्न म्हणजे ते सरकार कोणाकरिता जबाबदार राहणार?'

काही सदस्यांनी प्रौढ मताधिकाराच्या प्रस्तावावर आक्षेप घेतला होता. प्रौढ मताधिकाराच्या विरोधात जे तर्क प्रस्तुत करण्यात आले होते. त्या सर्व तर्कांचे डॉ. आंबेडकरांनी आपल्या अभ्यासपूर्ण विचारांनी खंडन केले.

काही सदस्यांच्या मते प्रौढ मताधिकार हा एकदम लागू न करता, तो टप्प्याटप्प्याने लागू करावा. इंग्लंडमध्ये १८३२ ते १९१८ पर्यंत सर्वांना मतदानाचा अधिकार नव्हता. त्यामुळे भारतातदेखील प्रौढ मताधिकार टप्प्याटप्प्याने लागू करण्यात यावा असा आग्रह गोलमेज परिषदेतील काही सदस्यांचा होता. त्यास डॉ. आंबेडकरांनी कडाडून विरोध केला होता.

त्या सदस्यांच्या मतांचे खंडन करताना डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'जर या सदस्यांचा असा विश्वास आहे की भारताची जनता मताधिकारास पात्र नाही. तर त्यांनी वसाहतीचे स्वराज्य किंवा जबाबदार सरकारची मागणी न करता भारतातून वापस जावे. काही सज्जनांचे असे मत आहे की, भारतीय लोक मताधिकाराचा उपयोग करण्यास पात्र नाही. सरकारची जबाबदारी आपल्यावर घेण्यास पात्र नाही. तर ते कोणाच्या नावावर जबाबदार सरकारची मागणी करतात?'




पुढे ते म्हणतात की, जर माझे मित्र हे मानतात की, भारताचे लोक सरकारची जबाबदारी घेण्यास सक्षम नाही. यावरून हाच निष्कर्ष निघतो की, भारताच्या लोकांना शासनाधिकार देऊ नये तसेच कोणती जबाबदारीदेखील देऊ नये. जरी प्रौढ मताधिकार एक आदर्श असले तरी त्यास या वेळी लागू करू नये. कारण त्यास कार्यरूप देण्यासाठी आमच्याकडे आवश्यक यंत्रणा नाही. असा विचार करणाऱ्यांनी मताधिकाराचा खरा अर्थ लक्षात घेतला नाही, अशी डॉ. आंबेडकरांनी टीका केली.

## बचावाची शक्ती

विधान मंडळास या सर्वाधिक महत्त्वाच्या गोष्टींमध्ये आपल्या जीवनास प्रभावित करण्याची शक्ती प्राप्त होईल. तर हे निश्चित आहे की, प्रत्येक व्यक्ती या विधानमंडळापुढे प्रभावित होतील. अशा कायद्याच्या विरोधात लोकांकडे बचावाची शक्ती असली पाहिजे. त्यांच्या स्वातंत्र्यांचे हनन होऊ शकते. त्यांचे जीवन आणि त्यांच्या संपत्तीवर आघात होऊ शकतो. म्हणून हा केवळ मतपेटीचा प्रश्न नाही. हा मतदान केंद्राचादेखील प्रश्न नाही. असे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले.

मताधिकाराचा खरा अर्थ स्पष्ट करताना डॉ. आंबेडकर म्हणतात की, जर मी मताधिकाराचा योग्य अर्थ समजतो तर मी हेदेखील जाणतो की, त्या अटीच्या नियमनाचा अधिकार आहे, ज्या समाजात सम्मिलीत जीवन जगण्याच्या अटी असतात. हाच मताधिकाराचा सार आहे.

पुढे डॉ. आंबेडकर स्पष्टपणे मताधिकाराच्या संदर्भात असा निष्कर्ष मांडतात की, मताधिकार ही अशी गोष्ट आहे, ज्यास राज्यातील प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध अधिकार मानला पाहिजे. जर आपण मानले की, मताधिकार प्रत्येक पुरुष किंवा स्त्रीचा जन्मसिद्ध अधिकार आहे तर आपण लोकांच्या त्या जन्मसिद्ध अधिकारास आपल्या प्रशासनाच्या सुविधेकरिता आश्रित बनवू शकत नाही.

केवळ सीमित लोकांना मतदानाचा अधिकार असावा. या विचारावर डॉ. आंबेडकरांनी तीव्र आक्षेप घेतला. सीमित अधिकार हा चांगल्या राज्यकारभाराची आणि जबाबदार शासनाची कसोटी होऊ शकत नाही. असे त्यांचे स्पष्ट मत होते. शासनाला जर नागरिकांचे स्वातंत्र्य, जीवन आणि मालमत्तेबद्दल कायदा करण्याचा अधिकार असेल आणि त्या कायद्याचे पालन करणे नागरिकांवर बंधनकारक असेल तर व्यक्तीलादेखील शासनकर्ते निवडून देण्याचा अधिकार असला पाहिजे. असे डॉ. आंबेडकरांचे स्पष्ट मत होते. म्हणून त्यांच्यामते प्रौढ मताधिकाराचे तत्त्व हे केवळ मतदान केंद्रे आणि मतदान पेट्या पुरविणे इतकेच मर्यादित नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या आधारावर गोलमेज परिषदेतील सदस्यांना हे पटवून दिले की, जबाबदार शासन पद्धतीकरिता प्रौढ मताधिकार अनिवार्य आहे. त्यामुळे गोलमेज परिषदेने प्रौढ मताधिकाराचे तत्त्व मान्य केले. त्यामुळे १९३५ च्या भारतीय कायद्यात प्रौढ मताधिकार अंतर्भूत करण्यात आला. स्वतंत्र भारताच्या संविधान सभेने प्रौढ मताधिकारास मान्यता दिली. त्यामुळे संविधानाने देशातील सर्व प्रौढ नागरिकांस मतदानाचा अधिकार बहाल केला. देशातील सर्व प्रौढ नागरिकांस मतदानाचा अधिकार बहाल करण्याच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांचे विशेष योगदान असल्याचे आढळून येते.

**माजी प्रमुख, डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग आणि डॉ. आंबेडकर अध्यासन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ. संपर्क: ०९८८१२६२६६०**



ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या साहाय्याने
मतदान
कसे कराल?
१
मतदान केंद्रात प्रवेश करा
आपण मतदान केंद्रामध्ये प्रवेश केल्यावर मतदान केंद्रावर कार्यरत असलेले अधिकारी ही मतदान यंत्रणा कार्यान्वित करतील.
२
आपले मत नोंदवा
ईव्हीएम मशीनवर आपल्या पसंतीच्या उमेदवाराच्या नावासमोरील अथवा चिन्हासमोरील निळे बटन दाबा.
३
लाल दिवा पहा
आपण मत दिलेल्या उमेदवाराच्या नावासमोरील अथवा चिन्हासमोरील लाल दिवा लागेल.
४
मताची खात्री करा
मुद्रक, एक मतपावती मुद्रित करेल, ज्यावर आपण मत दिलेल्या उमेदवाराचा अनुक्रमांक, नाव आणि चिन्ह असेल.
मुद्रित मतपावती व्हीव्हीपॅटवरील काचेच्या माध्यमातून बघा, कारण मुद्रित मतपावती आपल्याला देण्यात येणार नाही.
मतदार ही मतपावती ७ सेकंदांसाठी पाहू शकतो.
नोंद घ्या!
जर आपल्याला मतपावती दिसत नसेल आणि मोठ्याने आवाज ऐकू येत असेल तर कृपया मतदान कक्षात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याशी संपर्क साधावा.
VVPAT
भारत निवडणूक आयोग
मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

महाराष्ट्र

# लोकसभा निवडणूक २०१९
# महाराष्ट्रात होणार ४ टप्प्यांत मतदान

राष्ट्रीय महोत्सव

**आपल्या मतदारसंघातील निवडणुकांचा दिनांक जाणा. अवश्य मतदान करा!**

## ११ एप्रिल, २०१९

८ - वर्धा, ९ - रामटेक (अ.जा.),
१० - नागपूर, ११ - भंडारा - गोंदिया,
१२ - गडचिरोली - चिमूर (अ.ज.),
१३ - चंद्रपूर, १४ - यवतमाळ - वाशिम

## १८ एप्रिल, २०१९

५- बुलढाणा, ६- अकोला, ७-अमरावती (अ.जा.),
१५- हिंगोली, १६- नांदेड, १७- परभणी,
३९- बीड, ४०- उस्मानाबाद,
४१- लातूर (अ.जा.), ४२- सोलापूर (अ.जा.)



## २३ एप्रिल २०१९

३ - जळगाव, ४ - रावेर, १८ - जालना, १९ - औरंगाबाद,
३२ - रायगड, ३४ - पुणे, ३५ - बारामती, ३७ - अहमदनगर,
४३-माढा, ४४-सांगली, ४५-सातारा,
४६-रत्नागिरी-सिंधुदुर्ग ४७-कोल्हापूर, ४८-हातकणंगले

## २९ एप्रिल २०१९

०१-नंदुरबार (अ.ज.), ०२-धुळे, २०-दिंडोरी (अ.ज.),
२१-नाशिक, २२-पालघर (अ.ज.), २३-भिवंडी,
२४-कल्याण, २५-ठाणे, २६-मुंबई उत्तर, २७-मुंबई उत्तर पश्चिम,
२८-मुंबई उत्तर पूर्व, २९-मुंबई उत्तर मध्य, ३०-मुंबई दक्षिण मध्य,
३१-मुंबई दक्षिण, ३३-मावळ, ३६-शिरूर, ३८-शिर्डी (अ.जा.)

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह